◆ जानेवारी २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक पहिला

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ७ |
| **संभाजी कादंबरीबद्दल :** शंकर सारडा | ३१ |
| **पुस्तक परिचय** | |
| **आभाळझुंज** : अनंत भोयर | ३७ |
| **टॉक्सिन :** अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४३ |
| **सन्स ऑफ फॉर्च्युन :** अनु. अजित ठाकूर | ५० |
| **समृद्ध अमेरिकेची वाचनसंस्कृती आणि आपण :** डॉ. सुवर्णा दिवेकर | ५८ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ६२ |
| **पुरस्कार** | ६८ |
| **श्रद्धांजली** | ८० |
| **दीप योजना** | ८२ |
| **बालनगरी** | ८७ |
| **वाचनालयांना आवाहन** | ९४ |

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### नव्यावर्षातील नव्या संधी, नवी आव्हाने

ग्रंथ प्रकाशनक्षेत्रात आणि संज्ञापन क्षेत्रातही भारताचा प्रभाव माहिती तंत्रज्ञान क्षेत्राप्रमाणेच वाढत आहे राहील प्रसादचिन्हे इ.स. २००६ या वर्षाचे स्वागत करताना जाणवत आहेत.

गेल्या दोन वर्षांत अमेरिका-इंग्लंडमध्ये तब्बल ४५ भारतीय लेखकांची पुस्तके प्रकाशित झाली. विक्रम चंद्रा यांच्या कादंबरीला साडेचार कोटी रुपयांचा ॲडव्हान्स मिळाला. सलमान रश्दींचे नाव नोबेल पुरस्काराच्या स्पर्धकांमध्ये विचारात घेतले गेले... योगशिक्षक अय्यंगार यांचा अमेरिका दौरा कमालीचा यशस्वी ठरला. त्यांच्या पुस्तकांना तेथे चांगली मागणी आहे. अमेरिकेत योगासने करणाऱ्या लोकांची संख्या १ कोटी ६० लाख ॲ१सून ते योगशिक्षण आणि साधने यावर ३ बिलियन डॉलर्स (तेरा हजार कोटी रुपये) खर्च करतात अशी माहिती देण्यात आली आहे. पुस्तकांबरोबर चित्रकला, चित्रपट, संगीत वगैरे क्षेत्रातही भारताचे अस्तित्व जाणवावे अशी परिस्थिती आहे. नलिन पान याच्या 'संस्कार' चित्रपटाने २.२ कोटी डॉलर्सची कमाई केली. (भारतात अजून हा चित्रपट प्रदर्शित केला गेलेला नाही). एम नाइट श्यामलनचा 'लेडी इन दि वॉटर' हा चित्रपट इ.स. २००६ मध्ये प्रदर्शित होणार आहे. शेखर कपूर, गुरिंदर चड्ढा यांचेही चित्रपट तयार होत आहेत. संगीतक्षेत्रात आशा भोसले आणि अनुष्का रविशंकर यांच्या अल्बम्सना ग्रॅमी ॲवार्डसाठी नामांकन मिळाले आहे. एफ. एन. डिसोझा यांच्या लव्हर्स या पेंटिंगला १४.८ लाख डॉलर्स अशी विक्रमी बोली लावण्यात आली; तर तर हुसेनच्या चित्रांनीही कोटी कोटी रुपयांचा भाव गाठला... पेंटिंगच्या लिलावातून गतवर्षी ८०० कोटी रुपये भारताला मिळाले. भारतीयांच्या या कामगिरीची नोंद आपण अभिमानाने घ्यायला हवी.

ग्रंथव्यवहाराच्या दृष्टीनेही भारताचे स्थान आणि योगदान यापुढच्या काळात अधिक वाढत राहणार आहे. मराठीपुरता वा कोणत्याही प्रादेशिक भाषेपुरता संकुचित विचार करून आता थांबता येणार नाही. प्रकाशनक्षेत्र हे सर्व भाषांना व सर्व देशांना व्यापून उरणारे आहे हे लक्षात घेऊन जागतिकीकरणाच्या आणि उदारीकरणाच्या या काळात आपण व्यूहरचना करायला हवी असा सरत्या वर्षाचा नि:संदिग्ध संदेश आहे. ज्ञानशक्तीचा प्रभाव व प्रचार हा यापुढच्या काळात




परवलीचा शब्द राहणार आहे आणि बुद्धिमान आणि मेहनती भारतीयांना त्यात मोठी भूमिका बजावण्याची संधी मिळणार आहे ही खूणगाठ मनाशी बांधून तशी ध्येयधोरणे आखण्याबाबत आपल्या शासनाने आणि विद्यापीठांनी जागरुक राहिले पाहिजे. भारतातील ग्रंथव्यवहाराची व्याप्ती नेमकी किती आहे याबद्दल नाना तर्क पेश केले जातात. रूपा आणि कंपनीच्या आर. के. मेहरा यांच्या मते भारतात दरवर्षी २००० ते २५०० कोटी रुपयांच्या आसपास ग्रंथविक्री होते; तर युबीएस पब्लिशर्सच्या सुकुमार दास यांच्या मते हा व्यवहार ७४०० कोटींच्या घरात जातो. अनेक परदेशी प्रकाशनसंस्था विशाल भारतीय बाजारपेठेकडे लक्ष देऊन आपली कार्यालये भारतात उघडण्यास उत्सुक आहेत. नव्या पुस्तक प्रकाशनाच्या दृष्टीने प्रकाशनक्षेत्रात आता भारत हा तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. मात्र पहिल्या दोन क्रमांकांच्या तुलनेत उलाढालीच्या दृष्टीने तो फारच मागे आहे हीही वस्तुस्थिती आहे. स्टॅनफोर्ड, हार्वर्ड, ऑक्सफर्ड, मिशिगन विद्यापीठांतील ग्रंथालये आणि न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररी यातील लाखो पुस्तकांचे डिजिटल रूपांतर करण्याचा प्रचंड प्रकल्प गूगल, मायक्रोसॉफ्ट आणि ॲमेझॉन यांनी आखला आहे, त्यामुळे मुद्रित स्वरूपातील पुस्तकांच्या भवितव्याबद्दल शंकाकुशंकांचे पेव फुटले आहे. असे असले तरी नजीकच्या भविष्यकाळात पुस्तकांचे स्थान व महत्त्व अबाधितच राहील असाही विश्वास संबंधित तज्ज्ञ प्रकट करीत आहेत.

भारतापुरता विचार करायचा तर प्रकाशनक्षेत्रात पुस्तके प्रसिद्ध करण्याबरोबर पुस्तकांचे आऊट सोर्सिंग करण्याच्या दृष्टीने, ऑफशोअर प्रकाशकीय सेवा देण्याच्या दृष्टीनेही आपल्याला फार मोठी संधी उपलब्ध आहे असे म्हणायला हरकत नाही. आजही अशा सेवा देण्याबाबत भारत पुढे येत आहे. पुस्तकाच्या संहितेचे संपादन करणे, आकृत्या-नकाशे-रेखांकने-फोटो टाकणे, ई-पब्लिशिंगच्या दृष्टीने संहितेचे डिजिटायझेशन करणे, या बाबतीतला सेवांचा पुरवठा करण्यास मोठा वाव आहे. आजही पब्लिशिंग आऊटसोर्सिंगवर सुमारे २.५ बिलियन डॉलर्सचा खर्च होतो; आणि तो पुढच्या दीडदोन वर्षांत साडेचार बिलियन डॉलर्सच्या घरात जाईल असा अंदाज आहे. भारताला अमेरिका-इंग्लंडमधून आउट सोर्सिंगसाठी एक हजार कोटींची प्राप्ती गेल्या वर्षी झाली असावी असे टेक्सबुकचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित सिंग यांनी म्हटले आहे. या कंपनीद्वारे अक्षररचना, डाटा कन्व्हर्झन आणि इ-लर्निंग सेवा पुरवल्या जातात. संहिता संपादनासाठी त्या-त्या क्षेत्रातील पीएच.डी. धारकांची योजना केली जाते आणि मुद्रितशोधनासाठी किमान पदवीधर तरी असावे लागते. क्वार्क एक्सप्रेस वगैरे सॉफ्टवेअर हाताळण्याची क्षमताही आवश्यक ठरते. वैद्यकीय, कायदेविषयक, विज्ञानविषयक आणि संगणकीय पुस्तकांच्या संपादनासाठी त्या-त्या विषयातील जाणकारांचीच योजना करावी लागते. एस. आर. नोव्हा या कंपनीचे प्रमुख साईबल मित्र यांची तक्रार आहे की अशी

जाणकार तज्ज्ञ मंडळी अजून प्रकाशनक्षेत्रातील आउट सोर्सिंगसाठी पुरेशी मिळत नाहीत. जी मोजकी माणसे आहेत ती वरचेवर नोकऱ्या बदलत राहतात. विज्ञान तंत्रज्ञानात्मक, वैद्यकीय आणि कायदेविषयक पुस्तकांचे काम करण्याबाबत एसआरनोव्हाची खासियत आहे. इंग्लिशचे उत्तम ज्ञान व इंग्रजी लेखनाची सवय असणाऱ्यांनाही चांगले मानधन मिळू शकते. हे सर्व काम सध्यातरी मुख्यत: इंग्रजी प्रकाशन संस्थांसाठी होते. परंतु यापुढे जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, जपानी, चिनी भाषांच्या दृष्टीनेही तज्ज्ञांची गरज भासेल.

चांगली सुसज्ज डीटीपी केंद्रे त्यासाठी विकसित होण्याची प्राथमिक गरज आहे. कोरल ड्रॉ, क्वार्क एक्सप्रेस, पेजमेकर वगैरे आज्ञाप्रणाली हाताळण्यातील कौशल्य, चित्रकार व मांडणीकार, मुद्रित शोधक, संपादक या सर्वच बाबतीत प्रशिक्षणाची सोयही व्हायला हवी. माहिती तंत्रज्ञानातील आउटसोर्सिंगद्वारे भारतीय कंपन्या आज अब्जावधी रुपयांची कमाई करीत आहेत; तशीच संधी आपल्याला प्रकाशनक्षेत्रातही आहे असे म्हणायला हरकत नाही. आपण त्यासाठी कशी पावले टाकतो यावर सर्व काही अवलंबून आहे.



## २००५ सालात सर्वोत्कृष्ट ठरलेले काही वैविध्यपूर्ण अनुवाद






| | | | |
|---|---|---|---|
| चाईल्ड ऑफ होलोकॉस्ट | ओमेर्ता | द डार्क क्रुसेडर | लेडीज कूपे |
| जॅक कूपर<br>अनुवाद<br>सिंधू जोशी | मारिओ पुझो<br>अनुवाद<br>अनिल काळे | ॲलिस्टर मॅक्लीन<br>अनुवाद<br>अशोक पाध्ये | अनिता नायर<br>अनुवाद<br>अपर्णा वेलणकर |
| १३०रु. | २२०रु. | २४०रु. | २५०रु. |



## साहित्यवार्ता

### * 'आभाळझुंज'चे प्रकाशन

अनंत भोयर यांच्या 'आभाळझुंज' या कादंबरीचा प्रकाशन सोहळा पारडसिंगा येथे नगराध्यक्ष चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ॲड. छत्रपती डांगोरे, तिरंगा मंडळाचे अध्यक्ष संजय डांगोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

'आभाळझुंज' कादंबरीमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकरी, शेतमजुरांच्या व्यथा, धरणग्रस्तांच्या समस्या, राजकीय, सामाजिक अन् सांस्कृतिक पडझडीसंदर्भात मांडणी केली आहे. पुणे येथील मेहता पब्लिकेशन हाऊस यांनी प्रकाशित केलेल्या या कादंबरीची पृष्ठसंख्या ३३० आहे. सूत्र संचालन स्वामी विवेकानंद मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर बोदाळे यांनी केले तर आभार मोहन डांगोरे यांनी मानले.

**'आभाळझुंज'चे प्रकाशन**

### * पेंग्विनची चार मराठी पुस्तके प्रकाशित...

गेली सत्तर वर्षे 'क्लासिक्स' आणि 'पेपरपॅक एडिशन'मुळे जगभर प्रसिद्ध असणाऱ्या 'पेंग्विन' प्रकाशनने चार मराठी पुस्तके काढली असून त्याचे वितरण प्रसिद्ध प्रकाशक मेहता पब्लिशिंग हाऊसकडे सोपवले आहे. जागतिकीकरणाचा

हा परिणाम असून मराठीबरोबरच हिंदी, बांगला आणि मल्याळममधील पुस्तकेही 'पेंग्विन' एकाच वेळी प्रकाशित करीत आहे.

इंग्रजीतल्या 'मॅकमिलन', 'ओरिएंट लाँगमन' पाठोपाठ आता 'पेंग्विन'नेही मराठी प्रकाशनात प्रवेश केला आहे. त्याची सुरुवात समकालीन मराठी कथाकारांच्या 'बदलते रंग' या निशिकांत मिरजकरांनी संपादित केलेल्या पुस्तकाद्वारे होत आहे. 'बदलते रंग' या पुस्तकात कमल देसाई, भारत सासणे, रंगनाथ पठारे, गौरी देशपांडे, विलास सारंग, मेघना पेठे, आशा बगे, सानिया, प्रिया तेंडुलकर, मिलिंद बोकील यांच्यापासून मुकुंद टाकसाळे यांच्यापर्यंत दर्जेदार लेखक घेतले आहेत. इतर तीन अनुवादित पुस्तकांमध्ये खुशवंतसिंग यांच्या 'स्वर्ग' या कथासंग्रहाचा अनुवाद संध्या पेडणेकर यांनी केला आहे. इंग्लिशमध्ये लिहिणाऱ्या नमिता गोखले यांच्या कादंबरीचा 'शकुंतला स्मृतीचा खेळ', तसेच गणपतीच्या दंतकथांवरील 'देवा तूचि गणेशा' या रॉयिना ग्रेवाल यांच्या पुस्तकाचा अर्चना मिरजकर यांनी केलेला अनुवादही प्रकाशित झाला आहे.

प्रत्येकी एक हजार पुस्तकांची आवृत्ती असणाऱ्या 'पेंग्विन'च्या या चार पुस्तकांची आकर्षक बांधणी आणि मांडणी पाहता ती येत्या सहा महिन्यांमध्ये संपावीत, असा विश्वास अनिल मेहतांनी व्यक्त केला. ते म्हणाले की, दरवर्षी किमान १२ मराठी पुस्तके काढण्याचे उद्दिष्ट 'पेंग्विन इंडिया'तर्फे ठेवण्यात आले आहे.

१९३५ मध्ये लंडनमध्ये सुरू झालेल्या 'पेंग्विन'ने प्रकाशनक्षेत्रात जगभरात मुसंडी मारली ती १९६० नंतरच, असे सांगून मेहता म्हणाले की, अॅगाथा ख्रिस्तीच्या डिटेक्टिव्ह कथांपासून ते सलमान रश्दीपर्यंत अनेकांची पुस्तके लोकप्रिय करणाऱ्या 'पेंग्विन'ने अंधांसाठी 'ऑडिओबुक्स'ही लाँच केली!

मराठी प्रकाशनाची २०० वर्षांची परंपरा लक्षात घेता 'पेंग्विन' मराठीत येणे याचा खास अर्थ आहे. मराठीतल्या समकालीन तसेच दर्जेदार साहित्यालाही एक चांगले मार्केट मिळेल असा विश्वास मेहतांनी व्यक्त केला आहे.

*** व्यंगचित्राला साहित्याची प्रतिष्ठा मिळवून देणारे सरवटे**

''व्यंगचित्रकलेसारखे चित्रकलेचे नाकारलेले दालन पुन्हा मूळ जागी स्थापित व्हावे, यासाठी वसंत सरवटे यांनी धडपड केलीच; पण व्यंगचित्राला साहित्याची प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठीही ते सदैव प्रयत्नरत राहिले.'' असे मत विख्यात नाटककार विजय तेंडुलकर यांनी व्यक्त केले. 'सरवटे हे केवळ मोठे व्यंगचित्रकार नाहीत; तर मोठे साहित्यिकही आहेत,' असेही तेंडुलकर यांनी नमूद केले.

पुलंच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या पुस्तकांमध्ये ज्येष्ठ हास्यचित्रकार वसंत सरवटे यांनी काढलेल्या मूळ रेखाचित्रांच्या 'चित्रमय पु.ल.' या प्रदर्शनाचे उद्घाटन तेंडुलकर यांच्या हस्ते झाले. सरवटे यांनी लिहिलेल्या 'सहप्रवासी' आणि 'व्यंगकला-चित्रकला' या पुस्तकांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध



चित्रकार सुहास बहुलकर, 'मॅजेस्टिक' प्रकाशनाचे अशोक कोठावळे, 'इंडिया आर्ट'चे मिलिंद साठे या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

'सरवटे यांचे काम चित्रकलेच्या हिशेबात मोठे आहे,' असे सांगून तेंडुलकर म्हणाले, ''व्यंगचित्रकार हा चित्रकार नसतो, हे म्हणणे अगदीच निराधार नाही. मात्र, तो उत्तम चित्रकार असू शकतोही. छापील मजकुरामध्ये चित्र आले, की ते दुय्यम ठरते. कित्येकदा चित्रे मजकुराला शोभा येण्यापुरती उरतात. एकप्रकारे पुस्तकात समाविष्ट होणे हा चित्रावर अन्यायच आहे. त्यातून पुलंचे लिखाणच चित्रमय; त्यामुळे सरवटेंनी खरे तर चित्रे काढायलाच नको होती. मात्र, आज हीच चित्रे पुस्तकांतून वेगळी काढली गेल्यामुळे सरवटेंच्या प्रतिभेचे, कलेचे चीज झाले आहे. सरवटे जे बोलत नाहीत, ते त्यांच्या व्यंगचित्रांमध्ये उमटते. आज प्रकाशित झालेल्या 'व्यंगकला-चित्रकला' पुस्तकाद्वारे सरवटेंनी व्यंगचित्रकलेला न्याय दिला आहे. या पुस्तकाचा इंग्रजीमध्ये अनुवाद व्हावा.''

*** सोळावे जैन मराठी साहित्य संमेलन**

साहित्यातून सामाजिक मूल्यांची जोपासना होऊन त्यांची प्रतिष्ठा वाढवली पाहिजे, असे मत प्रसिद्ध कवी विठ्ठल वाघ यांनी व्यक्त केले. सोळाव्या अखिल भारतीय मराठी जैन साहित्य संमेलनाचे उद्घाटन श्री. वाघ यांच्या हस्ते उस्मानाबाद येथील पुष्पक मंगल कार्यालय प्रांगणात झाले.

श्री. वाघ म्हणाले, ''सध्या निर्माण होणाऱ्या साहित्याला दिशा व दृष्टी नाही, भरकटलेले साहित्य आहे, म्हणूनच साहित्य संमेलन घेण्याची उठाठेव करावी लागत आहे. या जैन साहित्य संमेलनाशी संबंधित कोणताही वाद नाही. जैनविद्याविषयक लिहिलेले असते, तेच जैन साहित्य होय. धर्म, शेती, राजकारण यापासून साहित्य वेगळे नसतेच. दूरचित्रवाणी मालिका व कथा कादंबऱ्यांत महिलांच्या व्यक्तिरेखांमधून दिसणारे सूड, आकस, कट-कारस्थाने हे समाजाचे प्रतिबिंब समजायचे का? माणसातला माणूस जागा करणे हे धर्माचे काम आहे. हिंदू धर्मासारख्या अंधश्रद्धा जैन धर्मातदेखील आहेत, त्यांना हात घालणारा लेखक जैन धर्मात आहे का? अपरिग्रह, सत्य, शांती काय आहे, याची कथा लिहिणार का? सामान्य माणसाच्या मनाला भिडेल, असे लिहावे.''

व्यासपीठावर भट्टारक लक्ष्मीसेन महाराज, संमेलनाध्यक्ष आमदार राजेंद्र दर्डा, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले, संमेलनाच्या मावळत्या अध्यक्षा सुरेखा शहा, 'सकाळ' सोलापूर आवृत्तीचे निवासी संपादक अरुण खोरे, स्वागताध्यक्ष डॉ. राजेश फडकुले आदी उपस्थित होते. श्रीमती सुरेखा शहा यांनी अध्यक्षपदाची सूत्रे आमदार राजेंद्र दर्डा यांच्याकडे सुपूर्त केली.

*** 'दासबोध' हा व्यवस्थापनाची तत्त्वे सांगणारा पाठ्यग्रंथ**

'दासबोध' हा केवळ एक धार्मिक ग्रंथ नसून आधुनिक व्यवस्थापनशास्त्राची

तत्त्वे सांगणारा एक पाठ्यग्रंथ आहे,' असे उद्गार मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे संचालक श्रीनिवास रायरीकर यांनी काढले.

'दासबोध'मध्ये एकंदर एकतीस समास व अकराशे ओव्या अशा आहेत, की ज्यामध्ये आधुनिक व्यवस्थापनाची अनेक तत्त्वे विशद केली आहेत. सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वीच्या ग्रंथात असे विवरण सापडते, ही मोठ्या आश्चर्याची व आनंदाची गोष्ट आहे. आपण सर्वांनी 'दासबोध'चे पारायण, मनन व चिंतन करावे. त्यायोगे आपण आपल्या व्यवसायात नक्की यशस्वी व्हाल. अनेक गोष्टी आपल्याजवळ असतात; पण आपल्याला त्याची जाणीव नसते. तोच प्रकार 'दासबोध' बाबतीत घडला आहे. समर्थांना केवळ परमार्थ सांगावयाचा नव्हता. आधी प्रपंच करावा नेटका, असे त्यांचे सांगणे असे. परकीय सत्ता नाहीशी व्हावी, अशी त्यांची आकांक्षा होती आणि त्यामुळे ते सांगण्याच्या ओघात त्यांनी व्यवस्थापन कसे करावे, याची चर्चा केली. त्यांनी संपूर्ण देशभर अकराशे मठ स्थापन केले. तेथे महंत नेमले. महंत म्हणजे मोठा माणूस. त्याने आपल्यासारखेच महंत निर्माण करावेत व देशोदेशी पाठवून द्यावेत, असा त्यांचा उपदेश होता. हे करीत असताना अगदी बारीकसारीक गोष्टींचे वर्णन त्यांनी केले आहे. 'दासबोध'चे लेखन सुमारे अठ्ठेचाळीस वर्षे सुरू होते. समर्थांना जसजसे अनुभव येत गेले तसतसे त्यांनी लेखन केले. हा सर्व अनुभवाचा विषय आहे. म्हणून सर्वांनी 'दासबोध'चा अभ्यास करावा.''

*** आनंद यादव नाबाद ७०**

''आजच्या ग्रामीण तरुण लेखकाकडे दारिद्र्य भावनात्मकपणे रेखाटण्याची क्षमता आहे; पण त्याची सामाजिक मीमांसा करण्याइतपत तो प्रौढ नाही. या नव्या पिढीला मार्गदर्शक ठरेल असा ग्रंथ लिहिण्याचा माझा विचार आहे,'' असे मनोगत ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी एकाहत्तराव्या वर्षात पदार्पणाच्या निमित्ताने व्यक्त केले.

''सध्या मी मराठी संस्कृतीतील वास्तवाला वळण देणारे आदर्श शोधतो आहे, साहित्यक्षेत्रात येताना करावा लागलेला संघर्ष आणि कटू अनुभव सामाजिक संदर्भात मांडण्याच्या मी विचारात आहे. माझी भाषा ही कधीच दलितांची म्हणजे विद्रोहाची नव्हती. बहुजनांनी विद्रोहाची भूमिका घेण्याऐवजी समाजाशी एकजीव होऊन सुधारणा केल्या पाहिजेत, अशी माझी भूमिका आहे. १९७४-८६ या काळात महाराष्ट्रातील ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे नेतृत्व मी केले. आज ग्रामीण कथांतून खेड्यांचे चित्रण येऊ लागले आहे; हे पाहून बरे वाटते. मात्र, ते सांस्कृतिक केंद्र आणि अर्थसत्तेपर्यंत पोहोचत नाही. 'ग्रामीण' साहित्य हा वेगळा प्रकार नव्हे; तर ते केवळ विशेषण आहे. ग्रामीण समाजच चळवळ करू शकतो; कारण तो बहुसंख्य, असंघटित आहे आणि त्याचे जगण्याचे प्रश्न



तातडीचे आहेत.''

*** महाराष्ट्र सरकार मोडी लिपीचे पुनरुज्जीवन करणार**

मोडी लिपीचे पुनरुज्जीवन करण्याचे महाराष्ट्र सरकारने मनावर घेतले असून, गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्र पुराभिलेख संचालनालयातर्फे चालविलेल्या १४ प्रशिक्षण वर्गांमधून १३९९ जण 'मोडी साक्षर'च नव्हे, तर प्रशिक्षित झाले आहेत.

मोडीच्या पुनरुज्जीवन मोहिमेमुळे शासकीय व न्यायालयीन कामात वेळेची बचत होईल, इतिहासाच्या अभ्यासकांचीही मोठी सोय होईल, असे मानले जाते. आतापर्यंत मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, जळगाव, धुळे, नगर व सांगली यांसह विविध ठिकाणी मोडी लिपीचे १४ प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले आहेत. पुण्या-मुंबईत दरवर्षी हे वर्ग घेतले जातात. जमीनजुमल्यांची जुनी कागदपत्रे वाचण्यास या प्रशिक्षण वर्गांमुळे फायदा झाला असल्याचे राज्य पुराभिलेख विभागाचे संचालक भास्कर धाटावकर यांनी सांगितले.

या प्रशिक्षण वर्गात २६ व्याख्याने दिली जातात. प्रशिक्षणार्थींना मोडीच्या सरावासाठी शिवकालीन, पेशवाई व पेशवाईच्या उत्तरकाळातील उतारे दिले जातात. राज्य पुराभिलेख विभागातर्फे शंभर गुणांची परीक्षा घेतली जाऊन उत्तीर्ण व्यक्तींना प्रमाणपत्र दिले जाते. अनेक जुनी शासकीय कागदपत्रे व जमीनजुमल्यांच्या व्यवहाराच्या नोंदी मोडी लिपीत आहेत. १८८४ पर्यंतच्या काळातील जन्म-मृत्यूंच्या नोंदी मोडीमध्ये आहेत. मोडी लिपी जाणकारांच्या अभावामुळे शासकीय, ऐतिहासिक व अन्य कामांसाठी आवश्यक त्या कागदपत्रांचे 'लिप्यंतर' करणे अवघड जात असे. लिप्यंतर नेमके व योग्य आहेच कशावरून, असाही प्रश्न उपस्थित होत असे. श्री. धाटावकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जुनी कागदपत्रे विस्मृतीत जाऊ नयेत, ऐतिहासिक ठेवा नष्ट होऊ नये, म्हणून या कागदपत्रांच्या लिपींचे पुनरुज्जीवन करावे, असा ठराव १९७८ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या 'इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड कमिशन'च्या अधिवेशनात मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार, राज्य सरकारने मोडीचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय २००३ मध्ये केला. तीन डिसेंबर २००३ ला मुंबईत ५० व्यक्तींसाठी पहिला प्रशिक्षण वर्ग आयोजित केला असता, १३९ जणांनी मोडी लिपी शिकण्यास उत्सुकता दर्शविली. यामध्ये इतिहासाचे विद्यार्थी, वास्तुशास्त्रज्ञ, वकील व मोडीचे जाणकार यांचा समावेश होता.

*** 'पुणे ग्रंथोत्सवा'उत्तम प्रतिसाद**

शासकीय अधिकारी आणि राजकीय नेत्यांनी पुणे ग्रंथोत्सवाला दिलेली भेट व पुस्तकखरेदी हे यंदाच्या 'अक्षरधारा' आयोजित 'पुणे ग्रंथोत्सव'चे मुख्य वैशिष्ट्य ठरले.

आंध्र प्रदेशचे राज्यपाल सुशीलकुमारे शिंदे, आमदार उल्हास पवार, जिल्हाधिकारी प्रभाकर देशमुख, 'सकाळ'चे संचालक-संपादक डॉ. अरुण टिकेकर, यांच्यासारख्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या प्रदर्शनाला भेट देताना आपल्या आवडीच्या

पुस्तकांची खरेदीही केली. पुण्याचे जिल्हाधिकारी प्रभाकर देशमुख यांनी माण तालुक्यातील लोधवडे या आपल्या मूळ गावातील कृष्णाजी पांडुरंग देशमुख स्मृती वाचनालयासाठी ग्रंथ प्रदर्शनातून सोळा हजार रुपयांची पुस्तकांची खरेदी केली. सध्या हैदराबादमध्ये असलेल्या श्री. शिंदे यांनी विनोबांच्या गीताईची आणि पद्मजा फाटक संपादित 'बापलेकी'या पुस्तकाची खरेदी केली.

'अक्षरधारा'ने बाराव्या वर्षात पदार्पण केले असून यंदाचे २२५ वे ग्रंथ प्रदर्शन होते. यंदाच्या 'पुणे ग्रंथोत्सवा'त संदीप खरे यांची 'मौनाची भाषांतरे' हा काव्यसंग्रह, मेघना पेठे यांची 'नातिचरामि' ही कादंबरी तसेच, 'बापलेकी', 'शाळा', 'डॉलर बहू', 'वाइज-अदरवाइज', 'वाटचाल', 'जगण्यातील काही' या पुस्तकांना अपूर्व प्रतिसाद लाभला. डॉ. ह. वि. सरदेसाई यांच्या 'दिनचर्या' व 'प्रकृतिस्वास्थ्य' या पुस्तकांनाही मोठी मागणी होती. पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, रणजित देसाई यासारख्या लेखांची लोकप्रियता अजूनही कायमच असल्याचे जाणवत राहिले.

*** दिवाळीची 'अंक'लिपी अमेरिकेतही!**

महाराष्ट्रातील दिवाळीचे वैशिष्ट्य असलेली नव्याकोऱ्या दिवाळी अंकांची फडफड आता सातासमुद्रापार, अमेरिकेत जोरकसपणे ऐकू येत असून त्यामुळे मराठी साहित्याचे लेणे अगदी जवळून निरखण्याची संधी 'अनिवासी महाराष्ट्रीयन मंडळीं'ना मिळाली आहे.

नोकरी तसेच व्यापारउदीमाच्या निमित्ताने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील अनेक मंडळींनी राज्याचाचे नव्हे तर देशाचाही उंबरा ओलांडला. महाराष्ट्राशी आणि अर्थातच मराठीशी असलेले अंतरीचे नाते ही मंडळी विविध मार्गांनी जपत आहेत. याच मार्गांवरून अमेरिकेत प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकांची पालखी मोठ्या दिमाखात वाटचाल करत आहे.

उत्तर अमेरिकेतील मराठी मित्र मंडळाने 'सावली'चा दुसरा दिवाळी अंक विनोद विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला. गंगाधर गाडगीळ, सुभाष भेंडे, दीपा गोवारीकर, मंगला गोडबोले, गिरिजा कीर आदींनी फुलवलेली विनोदाची कारंजी या अंकात प्रकटली आहेत. विजय कापडी, बाळ गाडगीळ, ललिता गंडभीर आदींचीही त्यास साथ आहे. व्यंगरेषेवर हुकुमी पकड असलेले शि. द. फडणीस यांचे मुखपृष्ठे आणि हास्यलेखमालेने अंकांची खुमारी वाढवली आहे.

न्यूयॉर्कमधील 'महाराष्ट्र मंडळ' आणि न्यू जर्सी येथील 'मराठी विश्व' यांच्या 'रंगदीप'चे तर हे पंधरावे वर्ष आहे! वसंत घाग, छाया आराणके, डॉ. उषादेवी कोल्हटकर, सुषमा येरवडेकर आदींच्या मेहनीतून या दिवाळी अंकाची निर्मिती झाली आहे.

*** केशवसुतांचे स्मारक**

कृष्णाजी केशव दामले अर्थात केशवसुत यांच्या स्मृतींची आठवण म्हणून त्यांच्या मालगुंड या जन्मगावी त्यांचे स्मारक उभारण्यात आले आहे.



कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक-अध्यक्ष आणि ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या पुढाकारातून रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड येथे हे स्मारक उभारण्यात आले आहे. स्मारकाच्या संकल्पित प्रकल्पांपैकी केशवसुत काव्यशिल्प आणि केशवसुत स्मृती उद्यान साकारले आहे. मराठी काव्य संदर्भालय, तीन ग्रंथालये आणि मालगुंड पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांचा विकास आदी उपक्रम पुढे हाती घ्यायचे आहेत. १९९४ मध्ये ज्येष्ठ साहित्यिक व नाटककार वि. वा. शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांच्या हस्ते या स्मारकाचे उद्घाटन करण्यात आले होते. 'हे स्मारक म्हणजे मराठी साहित्याचे काव्यतीर्थ आणि मराठी कवितेची राजधानी व्हावी', असे मत कवी कुसुमाग्रज यांनी या वेळी बोलताना व्यक्त केले होते. मालगुंड येथे केशवसुत यांचे योग्य प्रकारे जतन करण्यात आले असून तेथे केशवसुत यांच्या 'तुतारी', 'शिपाई' आणि अन्य काही प्रमुख कविता संगमरवरी दगडावर रेखाटण्यात आल्या आहेत. तसेच मराठीतील काही प्रमुख कवींची रेखाचित्रे आणि त्यांच्याबद्दलची माहितीही देण्यात आली आहे. या स्मारकासाठीच्या खर्चातील प्रमुख वाटा महाराष्ट्र शासन आणि केशवसुत कुटुंबीयांचा आहे. राज्यातील काही महापालिका आणि नगरपालिकांनीही या स्मारकासाठी देणग्या दिल्या आहेत.

*** परदेशी लोकांनीही गौरव करावा असे नाटक हवे**

''असे मराठी नाटक जगासमोर मांडा की, परदेशी लोकांनीही म्हटले पाहिजे,'' असे आवाहन ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांनी पुणे येथे केले.

ज्येष्ठ अभिनेत्री सुमन धर्माधिकारी यांना 'संवाद' आणि 'मध्यप्रदेश मित्रसंघा'तर्फे श्री. कोल्हटकर यांच्या हस्ते मानपत्र देण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. ज्येष्ठ गायक अरुण दाते, अभिनेते श्रीकांत मोघे, अभिनेत्री आशा काळे, समीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे आदी उपस्थित होते.

श्री. कोल्हटकर म्हणाले, ''नाटक करताना यंत्र-तंत्राची मदत घेण्यापेक्षा नाटककाराचे मंत्र आत्मसात करून शरीर त्यात उभे करावे लागते. गणपतराव जोशी पूर्वी 'हॅम्लेट' करायचे, तेव्हा परदेशातील लोकही कौतुकाने म्हणायचे, की असा 'हॅम्लेट' आम्ही पाहिलेला नाही. परदेशी नाटके येथे लावण्यापेक्षा मराठी नाटक परदेशात दाखवले जाईल, असे नाटक तयार केले पाहिजे.''

सुमनताईंबरोबर काम केल्याने मला वेगळी उंची मिळाली, अशा शब्दांत त्यांनी सौ. धर्माधिकारी यांचा गौरव केला. सौ. धर्माधिकारी म्हणाल्या, ''हा माझ्यापेक्षा मला शिकवणाऱ्या गुरूंचा गौरव आहे. बाबा डिके, मो. ग. रांगणेकर, आत्मारामे भेंडे अशा अनेकांमुळे मी येथवर येऊ शकले. पती गोविंद धर्माधिकारी यांचे प्रोत्साहनही मोलाचे ठरले.''

*** प्रा. राम शेवाळकरांचा अमृतमहोत्सवी सोहळा**

विदर्भ नागरी सत्कार समितीच्या वतीने एका देखण्या समारंभात लतादीदींच्या

हस्ते १९ नोव्हेंबर रोजी प्रा. राम शेवाळकर यांचा अमृतमहोत्सवी हृद्य सत्कार करण्यात आला. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या समारंभाला व्यासपीठावर विजयाताई शेवाळकर, प्रख्यात संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, प्रख्यात नाटककार प्रा. महेश एलकुंचवार, स्वागत समितीचे अध्यक्ष खासदार दत्ता मोघे, कार्याध्यक्ष नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री विलास मुत्तेमवार उपस्थित होते. कार्यक्रमात लतादीदींच्या हस्ते प्रा. शेवाळकर यांना शाल, श्रीफळ आणि ज्ञानेश्वरांच्या नेवासे येथील पैसाचा खांब देऊन सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना प्रा. शेवाळकरांनी आपण आतापर्यंत सद्भावनांच्या माधुर्याची मधुकरी मागत जगलो, असे म्हटले. सद्भावनेच्या वृत्तीचा अधिकाधिक प्रसार करण्याचा प्रयत्न व्हावा, एवढीच भिक्षा मागतो, म्हणून प्रणाम केला. तेव्हा सारे उपस्थित भारावून गेले. त्यानंतर लतादीदींनी गायलेल्या 'मोगरा फुलला'ला उपस्थितांनी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात दाद दिली. या वेळी झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीने नागपूरकरांच्या मनातील आनंद व्यक्त झाला.

आज समाजात धर्म, वर्ग, जाती पक्षांच्या आणि पक्षांतर्गत गटांच्या चिरफळ्या झाल्या आहेत. माणसाला माणसापासून तोडण्याचे प्रयत्न होत आहेत. आपला धार्मिक, तात्त्विक, पक्षीय विचारसरणी अबाधित ठेवून राष्ट्रीय हिताच्या प्रश्नावर एकत्र येऊ शकत नाही काय पंतप्रधान जवाहरलाल नेहरू म्हणायचे, त्याप्रमाणे मतैक्याचे क्षेत्र वाढवून मतभेदाचे क्षेत्र संकुचित करणे शक्य नाही काय? असा सवाल प्रा. शेवाळकर यांनी केला. आज समाजात चांगले काम आहे; पण त्याची स्थिती बेटांसारखी आहे. अशा स्थितीत आपल्यापेक्षा काम मोठे मानून एकत्र येऊन या बेटांवर रहदारी सुरू करता आली तर खऱ्या अर्थाने समाजाचे भले होईल, असे ते म्हणाले.

बाबासाहेब पुरंदरे यांनी हा सत्कार कीर्तन परंपरेचा असल्याचे सांगितले. तर स्वरांचे साम्राज्य संपते तेथे रामभाऊंच्या शब्दांचे साम्राज्य सुरू होते, अशी टिप्पणी हृदयनाथ मंगेशकर यांनी केली. दुसऱ्यांना भरभरून देता-देता रामभाऊ अधिक समृद्ध झाले आहेत, असे प्रा. महेश एलकुंचवार यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन मंगला खाडिलकर यांनी केले.

*** माणिक वर्मा यांच्या आठवणींचे चांदणे!**

मूर्तिमंत सोज्वळता आणि सात्त्विकता ज्यांच्या स्वरात आणि व्यक्तिमत्त्वात भरून राहिली होती, त्या माणिक वर्मा यांच्या 'अमृताहुनि गोड' अशा आठवणी स्वरांसह जागवताना श्रोत्यांची अवस्था 'हसले मनी चांदणे' अशी होऊन गेली.

सुविख्यात गायिका माणिक वर्मा यांच्या ९ व्या स्मृतिदिनानिमित्त 'बहरला पारिजात दारी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या चारही कन्या भारती आचरेकर, अरुणा जयप्रकाश, वंदना गुप्ते आणि राणी वर्मा यांच्या सहभागाने आणि माणिक वर्मा यांच्या शिष्या शैला दातार यांच्या गायनाने आठवणींचा पारिजात श्रोत्यांच्याही मनात बहरला. माणिकताईंच्या स्वरातून बहरलेला 'श्यामकल्याण' ऐकवत भारती आचरेकर यांनी, 'मी गायिका व्हावे, अशी आईची इच्छा होती; पण तिच्यातला धीर, निष्ठा माझ्यात नव्हती,' अशी कबुली दिली.

नटमल्हारमधील 'उमडघुमड घन घिरी आए' ही बंदिश ऐकवत राणी वर्मा म्हणाल्या, ''मला गाणे आवडायचे; पण माझा आवाज बारीक असल्याने शास्त्रीय संगीत मला जमले नाही. मी सुगम संगीताकडे वळले याचेही आईने कौतुकच केले.'' अरुणा जयप्रकाश म्हणाल्या, ''आईच्या मैफलीला गेले तरी माझे लक्ष बाहेर खाण्यापिण्याकडेच असायचे.''

'सर्व बहिणींत मी सर्वात व्रात्य, मस्तीखोर होते आणि याचा आईला खूप त्रास व्हायचा,'' अशी कबुली वंदना गुप्ते यांनी दिली. गायिका शैला दातार यांनी शहाणा कानडा रागातील 'मोरे आएँ कुँवर कन्हाऊई' आणि 'गगरी मोरी भरन नाही देत' यांचे सादरीकरण केले. तसेच 'अमृताहुनि गोड' आणि श्रोत्यांच्या आग्रहास्तव 'हसले मनी चांदणे' ही पदे पेश केली. माणिकताईंची गाजलेली गीतेही सादर करण्यात आली. वंदना गुप्ते यांनी म्हटलेल्या लावणीलाही भरघोस प्रतिसाद मिळाला.

'माणिक वर्मा प्रतिष्ठान'तर्फे देण्यात येणारा 'माणिकरत्न पुरस्कार' स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांना ज्येष्ठ गायिका सरस्वतीबाई राणे यांच्या हस्ते देण्यात आला. ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचा स्वीकार करताना भीमसेन जोशी म्हणाले, ''माझा सत्कार केल्याबद्दल मी प्रतिष्ठानचा ऋणी आहे.'' मनोगत मांडताना सरस्वतीबाई राणे म्हणाल्या, ''माझ्या हातून पंडितजींचा सत्कार होत आहे, याचा मला अतिशय आनंद आहे.''

*** एलकुंचवार यांच्या मौनरागचे प्रकाशन**

प्रसिद्ध नाटककार महेश एलकुंचवार यांचे ललितलेखन हा योगायोग नाही, तर हा एक प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आहे, असे मत ज्येष्ठ समीक्षक पुष्पा भावे यांनी व्यक्त केले.

मौज प्रकाशनतर्फे महेश एलकुंचवार यांचे 'मौनराग' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध लेखक श्रीनिवास कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. अभिनेता अतुल कुलकर्णी यांनी महेश एलकुंचवार यांच्या 'उत्खनन' या लेखाचे अभिवाचन केले.

पुष्पा भावे यांनी सांगितले की, ललित लेखाविषयी बोलणे फारसे सोपे नाही. अभिरुचीत इरावती कर्वे यांचा 'तू ती, मीच का गं' हा लेख लिहिला त्यावेळी ललितलेखनाचा आयाम उलगडला. नेणीवेला स्पर्श करणारे अनुभव इरावती कर्वे यांच्या लेखनात आले. ललितलेखनाची पद्धत वेगळी आहे. प्रत्येक ललितलेखकाचा अनुभव वेगळा असतो. त्यातून एक शैली निर्माण होते.

महेश एलकुंचवार यांचे लेखन आत्मचरित्रात्मक अजिबात नाही. एलकुंचवार

यांनी लेख लिहिले, हा एक योगायोग नाही, तर हा एक प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

श्रीनिवास कुलकर्णी यांनी सांगितले की, कोणत्याही लेखनाचा मूळ स्रोत हा बालपण व जन्मभूमी यात असतो. व्यक्तींची असंख्य चित्रे एलकुंचवार यांच्या लेखनातून येतात. त्यांच्या लेखनातून जीवन समजावून घेण्याचा ध्यास दिसतो. त्यांचे हे ललितलेखन नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

*** 'इरावती कर्वे कर्तबगारीने दीपस्तंभ'**

इरावती कर्वे कर्तबगारीने दीपस्तंभ होत्या, त्यांचे व्यक्तित्व व कार्य जाणून घेण्यासाठी त्यांनी लिहिलेले मूलभूत समाजशास्त्रीय प्रमेय व ललित लेखन यांचे वाचन झाले पाहिजे, असे उद्गार ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक द. भि. कुलकर्णी यांनी काढले.

इरावती कर्वे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र साहित्य परिषद व गुरुकुल अभ्यास मंडळ यांच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक द. भि. कुलकर्णी यांनी केले. चर्चासत्रामध्ये अनेक अभ्यासकांनी भाग घेतला.

प्राध्यापक शौनक कुलकर्णी, डॉ. उषा कोटबागी, डॉ. सुभाष वाळिंबे, समाजशास्त्राचे अभ्यासक मिलिंद बोकील यांनी इरावती कर्वे यांच्या विचारांचा आढावा घेतला.

डॉ. कुलकर्णी यांनी 'इरावती कर्वे- व्यक्तित्व आणि कार्य' हा विषय मांडला. कर्वे यांच्या ललितलिखाणाबद्दल डॉ. कोटबागी म्हणाल्या की, कर्वे या ललितगद्याच्या अग्रदूत होत्या. समाजशास्त्र, मानवशास्त्र लिखाणाबरोबरच त्यांनी लिहिलेले प्रवास व व्यक्तिवर्णने ललितसाहित्याला लाभलेले अजोड लेणे आहे. इरावती कर्वे यांचे व्यक्तिमत्त्व बुद्धिनिष्ठ व भावनिष्ठ होते. त्यांनी स्त्रीविषयक विचारही मांडले आहेत.

डॉ. वाळिंबे यांनी 'मानवशास्त्र, संस्कृती आणि इरावती कर्वे' या विषयावर निबंध सादर केला, तर डॉ. बोकील यांनी 'इरावती कर्वे यांचा समाजशास्त्र विचार' हा विषय मांडला.

*** विचारोत्तेजक नाटकेच हवीत**

मराठी नाटकाला आज प्रेक्षक नाही, ही ओरड करण्यापेक्षा विचार देणारी नाटके आणण्याचा विचार मराठी नाट्यनिर्मात्यांनी गांभीर्याने करायला हवा. मराठी नाट्यजगताला आलेली मरगळ झटकायची असेल तर गल्लाभरू व्यावसायिक नाटकांपेक्षा प्रेक्षकाला विचार करायला लावणारी नाटकं आणण्याची गरज आहे. अशा नाटकांचा प्रेक्षक आजही आहे आणि या प्रेक्षकांबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी झी मराठीवरील 'या सुखांनो या' या मालिकेच्या सेटवर दिली.



या मालिकेत विक्रम गोखले महत्त्वपूर्ण भूमिकेत काम करीत असून बऱ्याच दिवसांनी मराठी मालिकेत त्यांचे दर्शन प्रेक्षकांना घडते आहे. याबद्दल बोलताना ते म्हणाले की, मराठी मालिकांमध्ये जोवर मूल्यांचा आधार असलेल्या भूमिका मला ऑफर केल्या जातात तोवर मी मालिका करेन.

सभोवतालची असुरक्षित परिस्थिती आणि घरबसल्या मिळणारे टीव्ही मनोरंजन या स्थितीत आपल्या अंगभूत गुणांनी खेचून घेणारे शक्तिशाली नाटक नसेल तर मराठी रंगभूमीचे वैभव टिकून राहणे कठीण आहे, अशी खंत गोखले यांनी यावेळी व्यक्त केली. या मालिकेतील दादा अधिकारींची भूमिका भारतीय मूल्यांचा मान ठेवणारी, संस्कार, परंपरा, नीतिमत्ता यावर ठाम विश्वास असलेली असल्याने मला ती आवडली आणि ही भूमिका मला अत्यंत जमिनीवरची वाटते, अशा शब्दांत त्या भूमिकेचे त्यांनी कौतुक केले.

*** विश्वकोश मंडळाच्या अध्यक्षपदी विजया वाड**

मराठी विश्वकोश मंडळाच्या अध्यक्षपदी कथालेखिका विजया वाड यांची तर साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदावर डॉ. यू. म. पठाण यांची नेमणूक करण्यात आली आहे.

नवे सरकार येऊन एक वर्ष झाले तरी मराठी विश्वकोश, साहित्य संस्कृती, रंगभूमी प्रयोग पक्षिनिरीक्षण या मंडळांची पुनर्रचना झाली नव्हती. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात यासाठी सरकारला मुहूर्त सापडला. मराठी विश्वकोश मंडळावर जयंत नारळीकर, भालचंद्र नेमाडे, प्रा. विलास खोले, अरुण टिकेकर, भा. ल. भोळे, नामदेव ढसाळ, सदानंद मोरे, मिलिंद मालशे, शारदा साठे, दिनकर गांगल, दत्ता भगत, अरुणा ढेरे, श्रीमती जिचकार, ब्रह्मानंद देशपांडे, स. दि. महाजन, मधुकर भावे वगैरे एकूण २४ सदस्य नेमण्यात आले आहेत.

साहित्य संस्कृती मंडळावर ३९ सदस्यांची नेमणूक झाली आहे. यात द. ता. भोसले, मधु मंगेश कर्णिक, गो. मा. पवार, प्रा. रावसाहेब कसबे, विद्या बाळ, डॉ. विठ्ठल वाघ, अर्जुन डांगळे, अरुण साधू, सतीश आळेकर, गो. पु. देशपांडे, नरेंद्र जाधव या ज्येष्ठांबरोबच मेघना पेठे, सानिया, अरुण म्हात्रे, अशोक नायगावकर, वाहरु सोनावणे, प्रज्ञा लोखंडे, अतुल देऊळगावकर, मिलिंद बोकील, अनुपमा उजगरे या तरुण साहित्यिकांनाही स्थान देण्यात आले आहे.

*** शब्दप्रधान गायकी कार्यशाळेचे बडोद्यात उद्घाटन**

ज्येष्ठ गीतकार-संगीतकार मा. यशवंत देव यांच्या 'शब्दप्रधान गायकी' या अनोख्या गायन कार्यशाळेचे बडोद्यातील मराठी वाङ्मय परिषदेतर्फे आयोजन करण्यात आले होते. 'महाराज सयाजीराव गायकवाड स्मारक न्यास' सहप्रायोजक होता.

तत्पूर्वी मा. यशवंत देव यांचा जाहीर सत्कार व मुलाखतीचा कार्यक्रम घेण्यात आला. मा. देव यांची मुलाखत स्वत: देव यांच्या पत्नी व प्रसिद्ध

निवेदिका सौ. करुणाताई देव यांनीच घेतली.

मा. यशवंत देव यांच्या 'शब्दप्रधान गायकी' या संकल्पनेचा प्रयोग सर्वत्र गाजतो आहे. पुणे, मुंबई, नागपूर, भोपाळ, जळगाव येथे आयोजित केलेल्या कार्यशाळांतून तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना गायनकलेचे प्रशिक्षण दिले गेले आहे. बडोद्यातील कार्यशाळेचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवी, गझलकार मकरंद मुसळे यांनी केले. या प्रसंगी बडोद्यातील मराठी अकादमीचे ॲड. सदाशिवराव भोसले, महाराजा सयाजीराव गायकवाड स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष उज्ज्वलसिंह गायकवाड, बडोद्यातील मराठी वाङ्मय परिषदेच्या अध्यक्षा डॉ. वनिता ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेतील विद्यार्थी कलाकारांना 'शब्दप्रधान गायकी'चा अर्थ अगदी सोप्या भाषेत समजावून दिल्यावर यशवंत देव यांनी गळ्याचा व्यायाम कसा करावा, श्वास केव्हा, किती व कसा सोडावा या प्राथमिक बाबींपासूनच सप्रयोग मार्गदर्शन केले. दोन दिवसांतील एकूण तीन सत्रांमध्ये विविध रचना तयार करून, त्या सादर केल्या.

*** नवसारी, गुजरात येथे बालवाचकांसाठी अभिनव वाचन स्पर्धा**

गुजरात राज्यातील नवसारी येथे 'श्री सयाजी वैभव सार्वजनिक ग्रंथालया'तर्फे बालवाचकांसाठी एक अभिनव वाचनस्पर्धा दि. २५ ते २८ नोव्हेंबर रोजी आयोजित केली गेली. यात मराठी भाषिक वाचनप्रेमींचाही उत्स्फूर्त सहभाग होता. वक्तृत्व, सुविचार, निबंधमाला, चित्रकला व जीवनकार्य या पाच विषयांवर आधारित असलेल्या या स्पर्धेला बालवाचकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

नवसारी येथील हे ग्रंथालय खूप जुने आहे. बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी इ.स. १८१८ मध्ये या ग्रंथालयाची स्थापना केली. या ग्रंथालयाने आयोजित केलेल्या या स्पर्धेत नवसारी शहरातील एकूण ४७ शाळांमधील एकोणीस हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून वाचनावरील आपली आवड स्पष्ट केली. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी भव्य ग्रंथयात्रा काढण्यात आली.

*** 'शुद्धतेच्या दुराग्रहामुळे मराठीची अधोगती'**

इंग्रजी भाषेने जगातल्या प्रत्येक भाषेतील चांगले शब्द आत्मसात केले. मात्र मराठीत आपण शुद्धतेचा अधिक आग्रह धरल्याने मराठी भाषेची अधोगती झाली, असे मत डॉ. अरुण टिकेकर यांनी व्यक्त केले.

मराठी अभ्यास परिषद आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात येणारा महाबँक भाषाविषयक लेखन पुरस्कार डॉ. द. दि. पुंडे यांच्या 'भयंकर सुंदर मराठी भाषा' या पुस्तकाला डॉ. टिकेकर यांच्या हस्ते देण्यात आला. त्यानंतर 'मराठी भाषा- काही प्रश्न' या विषयावर ते बोलले. या वेळी प्रा. प्र. ना. परांजपे, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. विजया देव आदी उपस्थित होते. मराठी भाषेबाबत दोन टोकाची मते मांडली जातात. ती म्हणजे हजारो वर्षाची परंपरा असलेल्या मराठीला काहीही धोका नाही, तर दुसरीकडे मराठीचे अस्तित्वच



धोक्यात आहे असे मानणारा एक गट आहे. मराठीच्या भवितव्याविषयीच्या दोन्ही चिंता या भावनात्मक प्रतिक्रिया आहेत. त्यात भविष्यातील घटनांचा वेध घेतलेला नाही असे टिकेकर यांनी सांगितले.

*** वन्यजीवनाबाबत अचूक शब्द आवश्यक**

वन्यजीवनाबाबत वृत्तसंकलन करताना सखोल वाचनाबरोबर शब्दांबाबतही जागरूक राहावे, असे आवाहन प्रख्यात निसर्गलेखक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मारुती चितमपल्ली यांनी केले.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या ६६ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून सुरू करण्यात आलेल्या 'मीडिया सेंटर'चे उद्घाटन चितमपल्ली यांनी केले.

'आज प्रसिद्ध लेखक अशी आपली ख्याती आहे. त्याचा पाया वृत्तपत्रेच आहेत,' असे नमूद करून चितमपल्ली म्हणाले की, आपल्या लेखनाची सुरुवात वृत्तपत्रांपासूनच झाली. वरिष्ठ अधिकारी, पोलीस, मूर्ख माणसे आणि पत्रकार या समाजातील चार घटकांपासून सावध राहा, या मित्राच्या सल्ल्याचे गेली ६० वर्षे काटेकोर पालन केल्यामुळे आज हे यश आपल्याला मिळाले आहे. विविध वृत्तपत्रांतून लिखाण करतानाच त्यांच्या संपादकांनी दिलेल्या सूचनाही आपण अमलात आणल्या. 'धर्मयुग' या हिंदी पत्रिकेमधील लिखाणामुळे आपले नाव देशभरात झाले. अर्थात, लिखाणाबरोबरच आपल्या वेगळ्या नावामुळेही मी सगळ्यांच्या लक्षात राहिलो.

वन्यप्राण्यांविषयी वृत्तपत्रांमध्ये येणारे लिखाण फार मोघम असते, अशी खंत व्यक्त करून चितमपल्ली म्हणाले,'नवीन लोकांना अनेकवेळा शब्दांची माहिती नसते. त्यामुळे त्यांनी शब्दकोश जवळ बाळगावा आणि शब्दांच्या बाबतीत जागरूक राहावे.'

*** ऑनलाईन शब्दकोशामुळे इंग्रजी शब्दसंपत्तीत वेगाने भर**

इंग्रजी भाषेतील शब्दसंपत्ती काळानुरूप वाढतच आलेली आहे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र भाषेत नवीन शब्दांची भर टाकण्यात सर्वसामान्य लोकांचा मोठा प्रतिसाद असल्याचे २००५ सालातील शब्दकोशावरून दिसून आले आहे. दररोज बदलत राहणाऱ्या ऑनलाईन शब्दकोशात दरदिवशी नवीन शब्दांची भर पडत आहे. यातूनच 'टॉक्सिक सूप', 'कार्बक' अशा काही वेगळ्या शब्दांची उत्पत्ती झाली.

ताज्या घडामोडींच्या संदर्भात सार्थ वर्णन करण्याकरिता लोकांनीच काही चपखल शब्द तयार केल्याचे ब्रिटिश शब्दकोश गटाकडे आलेल्या प्रस्तावांवरून लक्षात येते. न्यू ऑर्लिन्समध्ये आलेल्या विध्वंसक कॅटरिना वादळानंतर आलेल्या पुराच्या दूषित पाण्याला उद्देशून 'टॉक्सिक सूप' असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. तसेच पॅरिसमध्ये झालेल्या वांशिक दंगलीमध्ये जमावाने मोठ्या संख्येने गाड्या जाळल्या, या प्रकाराला 'कार्बक' असा शब्द सुचविण्यात आला आहे.

कॉलिन्स डिक्शनरीचे प्रमुख संपादक जेरेमी बटरफिल्ड याबाबत म्हणतात

की, 'ग्रुप्स ऑनलाईन वर्ड एक्स्चेंज' सारख्या संकेतस्थळांमुळे अशा प्रकारे शब्दकोशात भर घालण्याची प्रक्रिया सोपी आणि वेगवान झाली आहे. शब्दकोशात एखादा नवा शब्दप्रयोग सुचविण्यासाठी पूर्वी लोक शब्द आणि त्याची सुचविलेली व्याख्या यांच्या चिठ्ठ्या पाठवायची. आता २१ व्या शतकात हीच पद्धत 'इन्स्टंट' झाली आहे. दररोज या ऑनलाईन संकेतस्थळांवर हजारो शब्द सुचविण्यात येतात, त्यांची पारख करून निवडक शब्दांची थेट शब्दकोशात भर पडते. ही पद्धती सर्वसामान्यांना खुली आहे. तिला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभतो. मात्र बऱ्याचदा येणाऱ्या शब्दांचे अर्थ किंचित अश्लीलतेकडे झुकणारे आणि असभ्य भाषेत दिलेले असतात. अशा वेळी शब्दाच्या व्याख्येत थोडाफार बदल करण्यात येतो. मात्र शक्यतो नव्या शब्दाची व्याख्या तीच ठेवण्यावर भर दिला जातो, असेही बटरफील्ड यांनी सांगितले. यावर्षी अनेक राजकीय, सामाजिक, नैसर्गिक घटनांविषयीचे नवे शब्दप्रयोग भाषेत आले आहेत. जर्मनीच्या चॅन्सेलरपदाच्या निवडणुकीत यंदा प्रथमच अँजेला मार्केल या स्त्रीचा सहभाग असल्याने 'मर्केलिअन' असे नवे विशेषण तयार झाले.

बर्ड फ्लूच्या पार्श्वभूमीवर 'ट्रोजन डक्स' आणि 'सेंटिनल चिकन्स' असे शब्द तुलनेने आरोग्यपूर्ण अशा पोल्ट्रीसाठी वापरण्यात आले.

*** दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन**

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने येडेनिपाणी येथे झालेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी कादंबरीकार बाबा कदम होते. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य भोसले यांच्या हस्ते झाले.

गतवर्षी नागठाणे येथे झालेल्या संमेलनाचे अध्यक्ष वामन होवाळ होते.

कविसंमेलनाचे अध्यक्षपद विठ्ठल वाघ यांनी भूषविले. सूत्रसंचालन सुरेश मोहिते यांनी केले. 'ग्रामीण साहित्यात उमटलेले शेतकरी जीवनाचे प्रतिबिंब' या विषयावरील परिसंवादात प्रा. वैजनाथ महाजन, आमदार राजू शेट्टी, श्रीपाद जोशी व प्रा. एकनाथ पाटील यांचा सहभाग होता.

*** सामाजिक जाणिवांशी बांधिलकी जपली पाहिजे – नेमाडे**

''जाणिवा या वैयक्तिक नसतात. त्या सामाजिकच असतात. समाजातून प्रेरणा घेऊनच आपण जगत असतो. जगण्यातूनच साहित्यनिर्मिती होते. या परस्परपूरक गोष्टींशी बांधिलकी जपली पाहिजे,'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. भालचंद्र नेमाडे यांनी व्यक्त केले.

स. प. महाविद्यालयाच्या 'नवति महोत्सवा'निमित्त प्रा. नेमाडे यांची प्रकट मुलाखत प्रशांत बागड यांनी घेतली, त्या वेळी ते बोलत होते. ''सामाजिक जाणिवांचा आदर केला पाहिजे,'' असे सांगून प्रा. नेमाडे म्हणाले, 'व्यक्तिवादाची भारतीय व्याख्या झाली पाहिजे. लेखक हा समाजाच्या प्रमाणात मोठा होत असतो. शेक्सपिअरच्या पाठीमागे साम्राज्यवादी ब्रिटिश समाज होता; त्यामुळे तो



महान बनला. मराठी लेखकाचे अनुभव कमी दर्जाचे आणि अर्नेस्ट हेमिंग्वेचे अनुभव उच्च दर्जाचे, असे नसते. मात्र, दुर्दैवाने युरोपातील 'सांस्कृतिक चलन' जगभरात सगळीकडे चालते. सध्या मराठी साहित्यात खालच्या दर्जाचे वातावरण आहे. समीक्षा, पुरस्कार या किरकोळ लाटा आहेत. लेखकाचे महत्त्व त्याच्याच भाषेत मोठे असते. अन्य भाषेत त्याला तेवढी किंमत राहत नाही. अनुवाद ही कृत्रिम उलाढाल आहे. तिला साहित्यिक कसोट्या लावू नयेत.''

'कोसला'च्या धक्क्यातून काहीजण अजूनही सावरलेले नाहीत, असे नमूद करून प्रा. नेमाडे म्हणाले, ''अशी कादंबरी पुन्हा लिहायची नाही, असे मी ठरविले होते. त्यामुळेच 'चांगदेव' हा 'पांडुरंग सांगवीकर'पेक्षा वेगळा झाला. विषमता दिवसेंदिवस वाढतेच आहे; त्यामुळेच 'कोसला' आजही लोकप्रिय आहे. मी बरीच वर्षे डायरी लिहित असे; त्यामुळे 'कोसला' १३ दिवसांमध्ये लिहून झाली. प्रकाशक एखाद्या लेखकाकडे कादंबरी लिहून घेण्याकरिता लकडा लावतो, ही मराठी माणसाला अभिमान वाटावा अशी गोष्ट होती. तांबडं फुटल्याप्रमाणे 'कोसला'नंतरच्या कादंबऱ्या लिहिल्या. मात्र, 'हिंदू'चं तांबडं लवकर फुटत नाहीये. कादंबरीत इतका अडकलो, की कवितेचे दालन हाताळायचे राहूनच गेले. सध्या कादंबरीपेक्षा अभिजात साहित्यप्रकार अधिक वाचले जाताहेत. समीक्षेची पाश्चात्त्य पद्धत कशीबशी मराठी साहित्यावर लादणारे आपले समीक्षक आहेत.'' 'श्यामची आई' चित्रपट 'पथेर पांचाली' इतका दर्जेदार बनू शकला असता; पण कॅमेऱ्याचा गंध नसलेल्या आचार्य अत्रेंमुळे एक चांगली पटकथा बिघडली,'' अशी परखड टीका प्रा. नेमाडे यांनी केली.

*** नवलकरांच्या सदर लेखनाची ५० वर्षे**

भ्रमंतीकार नवलकरांचे शब्द बोचणारे नाहीत तर डोळे उघडणारे आहेत. निंदकाचे घर असावे शेजारी असे म्हणतात, आमच्या शेजारी तर कलानगरात अख्खी पत्रकार कॉलनीच आहे. हल्लाचे पत्रकार कसली शोधपत्रकारिता करतात; ती करावी तर नवलकरांनीच, त्यांचे लिखाण सुवर्णालंकारासारखे आहे, अशा शब्दांत शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रमोद नवलकर यांचा गौरव केला. नवलकरांच्या 'भटक्याची भ्रमंती'च्या लिखाणाला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल चर्चगेट येथील क्रिकेट क्लब ऑफ इंडिया क्लबमध्ये आयोजित सत्काराला शिवसेनेचे नेते मनोहर जोशी, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष प्रा. अरुण गुजराथी, आरबीआयचे सल्लागार डॉ. नरेंद जाधव, शिवसेना नेते दत्ताजी नलावडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

नवलकरांनी 'सामना' व 'मार्मिक' मध्येही लिखाण केले. त्यांच्या 'भ्रमंती' या दिवाळी अंकाची तर आपण फटाक्यांप्रमाणे वाट पाहायचो. त्यांनी सदासर्वदा रात्री-अपरात्री भटकंती केली. त्यांच्या लिखाणाला ५० वर्षे झाली आहेत असे

वाटतच नाही. असे मनोहर जोशी म्हणाले.

*** दुसरे ग्रामजागरसाहित्य संमेलन**

कष्टकरी... दीन दुबळ्या... उपेक्षित आणि पिचलेल्या शेतकऱ्यांच्या मुक्या भावनांना वाट करून देणारे दुसरे यशवंतराव चव्हाण ग्रामजागर साहित्य संमेलन देहू येथे संपन्न झाले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. विठ्ठल वाघ अध्यक्षस्थानी होते.

संमेलनाचे उद्घाटन समाजसेवक अण्णा हजारे यांनी केले. सकाळी देहूगावातून ग्रंथ दिंडी काढण्यात आली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. वाघ म्हणाले की, शोषित, उपेक्षित ग्रामीण जीवनाच्या व्यथा वेदना साहित्यातून मांडल्या जाण्याची आज खरी गरज आहे. यशवंतरावांना गांधीजींप्रमाणेच भारत हे राष्ट्र खेड्यापाड्यांतूनच खऱ्या अर्थाने वसलेलं आहे असं वाटत होते. ते समर्थ, संपन्न आणि वैभवशाली व्हावे ही त्यांची तळमळ होती. त्याचा प्रत्यय त्यांच्या लेखणीतून पदोपदी येतो.

ज्ञानाविना जीवन उभे राहात नाही. डोळे असले तरी दृष्टी येत नाही म्हणून अडाणी, अज्ञानी शेतकऱ्यांच्या घरात ज्ञान गेले पाहिजे. यशवंतरावांनी खासगी शिक्षण संस्थांचे मोठे जाळे विणले. घरोघरी शिक्षण जावे म्हणून शाहू महाराज, ज्योतिराव फुले, डॉ. आंबेडकर, पंजाबराव देशमुख, यशवंतरावांनी जीवाचा आटापिटा केला. त्यामुळे खेड्यापाड्यांनी कूस पालटली. त्यातूनच काही प्रज्ञावंत, विद्यावंत घडले. पण आज ती दारं धडाधड बंद करण्याचे अमानुष धोरण राबविले जात आहे. डी. एड., बी. एड., डॉक्टर, इंजिनिअर होण्यासाठी जे शुल्क घेतले जात आहे ते शेतकऱ्यांच्या कोणत्याही मुलामुलींना भरता येत नाही.

**आम्ही जलमलो मातीत किती होणार गा माती ।**
**खापराच्या दिव्यात ह्या पेटणार वाती ।**

अशा काव्यपंक्तीतून त्यांनी आपली व्यथा मांडली.

संमेलनात बाळू सातव (येलवाडी), पार्वती गणाजी काळोखे (देहू), मारुती केसू गाडे (सुदुंबरे), बापूसाहेब हगवणे (देहू), मारुती दत्तात्रेय गोंडे पाटील (भोसे), सहादू मारुती जाधव (नेरे) आणि विश्वनाथ अनाजी काळोखे (देहू) या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच जगद्गुरू संत तुकाराम साहित्य पुरस्कार संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांना व यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार बाळासाहेब काशिद यांना प्रदान करण्यात आला.

*** ज्ञानेश्वरी 'ब्रेल लिपी'त प्रकाशित करणार**

श्री ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान दृष्टीहीनांना समजावे यासाठी श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ 'ब्रेल लिपी'तून प्रकाशित करण्याचा प्रयत्न 'आळंदी देवस्थान' तर्फे करण्यात येईल असे आश्वासन संस्थान समितीचे विश्वस्त वसंतराव पाटील यांनी दिले.

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधीला सन २००७ मध्ये ७११ वर्षे होणार आहेत. त्या निमित्त चिन्मय रंगावली प्रशिक्षण आणि प्रदर्शन या माध्यमातून दान पेटीत जमा होणाऱ्या निधीतून अनाथ बालके, मतिमंद, मूकबधिर, कुष्ठरोगी, अंध बालके - बाल विधवा आणि वृद्धांसाठी काम करणाऱ्या राज्यातील सुमारे ७११ आश्रमांना श्री ज्ञानेश्वरी पारायण प्रत, हरिपाठाच्या पुस्तकांसह ध्वनिफीत आदी संत साहित्य देण्यात येणार आहे. रंगावलीकार वसंत थिटे परिवाराने आळंदी येथील अंधशाळेत कार्यक्रमाचे आयोजन केले होते. थिटे यांच्या उपक्रमाला राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी शुभेच्छा दिल्या असे विश्वस्त पलांडे यांना सांगितले.

*** जयकर ग्रंथालयात इंटरनेट केंद्र**

विविध विषयांतील प्रमुख आंतरराष्ट्रीय नियतकालिके, संदर्भग्रंथ, नवनवे संशोधन आदींची थेट इंटरनेटद्वारे माहिती घेण्यासाठी पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात सर्व सुविधायुक्त 'विजया देशमुख इंटरनेट केंद्र' सुरू करण्यात आले आहे.

निवृत्त सनदी अधिकारी बी. जी. देशमुख यांनी त्यांच्या पत्नी विजया यांच्या स्मरणार्थ दिलेल्या वीस लाख रुपयांच्या देणगीतून हे केंद्र उभारण्यात आले आहे. इंटरनेटशी जोडलेले चाळीस संगणक या केंद्रात आहेत. विविध 'ऑन लाइन नियतकालिके', विद्यापीठ अनुदान मंडळाच्या (यूजीसी) 'इन्फ्लिबनेट' अंतर्गत मिळणारी संशोधनविषयक नियतकालिके आणि ग्रंथ विद्यार्थ्यांना या केंद्राद्वारे उपलब्ध होणार आहेत.

''ग्रंथालयांतून विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान मिळायला हवे. त्यासाठी इंटरनेटसारखे अत्याधुनिक माध्यम सहजगत्या उपलब्ध व्हायला हवे. या केंद्रामुळे ते साध्य होईल,'' असे श्री. देशमुख यांनी नमूद केले.

*** डॉ. आंबेडकर – श्रीमती एफ यांच्या पत्रव्यवहाराचे पुस्तक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व श्रीमती एफ यांच्या प्रेमपत्रांचे संकलन नवी दिल्ली येथील रॉली प्रेस या कंपनीतर्फे प्रकाशित होत आहे. प्रकाशनाबाबतचे सर्व अधिकार कायद्याने महाराष्ट्र सरकारकडे असल्याने, या पुस्तकाच्या प्रकाशनावर बंदी आणण्याची विनंती सरकारने उच्च न्यायालयाला करावी, अशी मागणी बांधकाममंत्री छगन भुजबळ यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे केली आहे.

डॉ. आंबेडकरांचे वारस आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात १७ फेब्रुवारी १९८७ रोजी करार झालेला असून या करारानुसार डॉ. आंबेडकर यांचे साहित्य छापण्याचे सर्व अधिकार राज्य सरकारकडे आहेत. त्यांचे साहित्य, त्यांनी इतरांना लिहिलेली पत्रे अथवा इतरांनी डॉ. आंबेडकरांना लिहिलेली पत्रे छापण्याचे सगळे कायदेशीर अधिकार सरकारला आहेत, असे भुजबळ यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणले आहे.

इंग्लंडमधील श्रीमती एफ नावाच्या महिलेने डॉ. आंबेडकरांना पत्रे लिहिली असून अशी पत्रे छापणे, हा कराराचा भंग ठरतो. त्यामुळे या संवेदनाक्षम

प्रकाराची ताबडतोबीने दखल घेऊन रोली प्रेसच्या पुस्तकाच्या प्रकाशनास स्थगिती मिळावी, यासाठी राज्य सरकारने उच्च न्यायालयात दावा दाखल करावा, अशी विनंती भुजबळ यांनी केली आहे.

*** डॉ. जयंत नारळीकर**

आपल्याला खगोलशास्त्राची आवड कशी लागली? बिग बँग सिद्धांत योग्य की स्टेडी स्टेट? पृथ्वीवरील जीवसृष्टी बाहेरून आली आहे का? अशा काही वैयक्तिक काही वैज्ञानिक प्रश्नांची उत्तरे देत जगप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

नेचर वॉक आणि राज्याच्या वनविभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ. प्रकाश तुपे यांनी प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात त्यांच्याशी संवाद साधला.

श्री. तुपे यांनी विचारलेल्या प्रश्नांतून नारळीकरांनी आपल्या आयुष्यभराच्या आठवणी जाग्या केल्या, ''बालपणी माझा सर्वात आवडता विषय गणित होता आणि भूगोल हा विषय फार कंटाळवाणा वाटतो. गणितावरील माझे प्रेम वडील विष्णुपंत नारळीकर यांच्यामुळे अधिक वृद्धिंगत झाले आणि यातूनच पुढे रँग्लर होण्यास मदत झाली. आईमुळे मला संस्कृत आवडू लागले. लहानपणीच मी कालिदासाचे साहित्य वाचले.'' पुढे डॉ. नारळीकर म्हणाले, केंब्रिजमधील माझे गणिताचे शिक्षण चालू असताना प्रोफेसर फ्रेड हॉएल यांची व्याख्याने ऐकण्याचा योग आला आणि यातूनच मी खगोल शास्त्राकडे अधिक खेचला गेलो. पुढे पीएच. डी. साठी मार्गदर्शक म्हणून स्वत: फ्रेड हॉएल असल्यामुळे माझ्या प्रबंधाला एक वेगळेच वजन प्राप्त झाले. त्यांनी ३ वर्षांसाठी दिलेला प्रकल्प मी सहा महिन्यांत पूर्ण केला आणि नंतर 'स्टेडी स्टेट' सिद्धांतावर संशोधनाला सुरुवात केली. रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीमध्ये जगभरातील दिग्गज शास्त्रज्ञांसमोर मी प्रथमच उभे राहून स्टेडी स्टेट सिद्धांताची बाजू मांडली. हा माझा जीवनातील एक अविस्मरणीय प्रसंग होता.

श्रोत्यांनी खगोल शास्त्रावर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना डॉ. नारळीकरांनी पृथ्वीवरील जीवसृष्टीचे मूळ कदाचित बाहेरचे असावे असे सांगितले. धूमकेतू, उल्कापात इ. गोष्टींमुळे हे जीव पृथ्वीवर आले असतील. सध्या इस्रोतर्फे यावर आकाशात 'बलून' सोडून संशोधन केले जात आहे. आपल्या संवादातून त्यांनी फलज्योतिषाचा चांगलाच समाचार घेतला आणि वैज्ञानिक दृष्टी ठेवून जीवनात वाटचाल करावी असा सल्लाही दिला.

*** युवक महोत्सव, लातूर**

प्रत्येकाच्या जीवनात यश असतेच. त्याच्या स्वागताची तयारी ही प्रत्येकाने करायची असते. हा क्षण पकडण्यासाठी त्याच्या स्वागताला सज्ज व्हा, असे आवाहन श्रेष्ठ रंगकर्मी प्रभाकर पणशीकर यांनी लातूर येथे केले.



नांदेडचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व अभिनव अध्यापक, महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभिनव २००५' युवक महोत्सव लातूर येथे घेण्यात आला.

''या युवक महोत्सवात मी तरुणाई बघायला आलो आहे. तुमच्यात उद्याचा सचिन तेंडुलकर, अशोक सराफ अथवा शिल्पकार, चित्रकार, पत्रकार आहे. तुमच्या हाती देशाचे भवितव्य सुरक्षित राहील. युवाशक्तीच राष्ट्रशक्ती आहे. या राष्ट्राचे वैभव वाढेल याची मला खात्री आहे. ज्येष्ठांनी समस्यांची काथ्याकूट करत बसण्यापेक्षा समस्या समजून घेतल्या पाहिजेत. आपले बोट धरून वाटचाल करणारा कर्तृत्ववान मुलगा पाहून अभिमान वाटला पाहिजे, त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे.''

जागतिकीकरणाच्या नावाखाली स्वत्व गमावले जात आहे. इंग्रजीतून मराठी बोलणारी व मराठीतून इंग्रजी सांगणारी पिढी निर्माण होत आहे. मातृभाषेची कुणाला चीड नाही ही खंत आहे. इंग्रजी ही जगाला जोडणारी भाषा आहे ती शिकलीच पाहिजे; मात्र मराठीही शुद्ध बोलता आली पाहिजे. परंपरेचा अभिमान म्हणजे बुरसटलेल्या विचारांचा अभिमान नव्हे. जे टाकून द्यायचे आहे ते टाकून द्या मात्र जे टिकले पाहिजे ते टिकविण्यासाठी धडपड करा, असा कानमंत्र पणशीकरांनी उपस्थित तरुणाईला दिला.

*** 'मराठी कवितेकडे पाहण्याची दृष्टी केशवसुतांनी शुद्ध केली'**

'केशवसुतांनी मराठी कवितेला संस्कृत काव्याच्या निकषांतून बाहेर काढले. मराठी कवितेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचेच केशवसुतांनी शुद्धीकरण केले,' असे प्रतिपादन 'राज्य मराठी विकास संस्थे'च्या संचालिका डॉ. वसुंधरा पेंडसे-नाईक यांनी केले.

कवी केशवसुत यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या 'काव्योत्सवा'मध्ये त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी राजेंद्र बनहट्टी होते.

'संत-पंत-तंत परंपरेत बुडून गेलेल्या मराठी कवितेला केशवसुतांनी नवी दिशा दिली,' असे सांगून डॉ. पेंडसे-नाईक म्हणाल्या, ''निसर्ग आणि पुराणासारख्या विषयांना छेद देण्याचे पहिले धैर्य या क्रांतदर्शी कवीने दाखविले आणि त्यांच्या अनुयायी कवींनी त्या मार्गाने वाटचाल केली. केशवसुतांचे वर्णन 'मराठी काव्यपीठाचे आद्य शंकराचार्य' असे करता येईल. प्रामाणिकपणा आणि हवे ते मांडण्याचा तेजस्वीपणा ही त्यांची वैशिष्ट्ये होती. मनात येईल ते त्यांनी प्रांजळपणे आणि अलंकरण टाळून मांडले. काव्यात विनोद वर्ज्य नाही, हे त्यांनी स्वत:च्या कवितेतून दाखवून दिले.

कार्यक्रमात काव्यलेखन स्पर्धेतील विजेते दिनेश शिंदे, ज्ञानदेव वटाणे आणि अतुल खोडे यांना गौरविण्यात आले.

❐

विशेष वार्ता

# चौखूर शब्द उधळत दौडला 'संभाजी'

प्रकाशनापूर्वीच दहा हजारी प्रतींची मनसबदारी मिळणारे महाकादंबरीकार विश्वास पाटील यांनी दख्खन मुलूखातल्या थोरल्या महाराजांच्या उत्तराधिकाऱ्याच्या बुलंद कहाणीचे अंश लखलखत्या विजेसारखे तळपवून श्रोत्यांसी जागीच खिळवोन टाकले. शिवाजी मंदिरातल्या सभागृहात शंभूराजांच्या आयुष्यातले अविस्मरणीय प्रसंग जिवंत करताना विश्वासराव गरजले. 'जी माणसे सशक्त आणि कर्तृत्ववान असतात, त्यांच्याच नशिबी वनवास आणि वधस्तंभ येतो. पण लक्षात ठेवा, अमरत्वाचा रस्ताही त्यांच्याच वाट्याला येतो.'

मराठीतल्या आणखी एका महाकादंबरीचे आगमन 'संभाजी'च्या रूपाने मंगळवारी सायंकाळी झाले. गंगाधर गाडगीळ, मधु मंगेश कर्णिक हे आधीच्या पिढीचे मोठे लेखक, मधुकर भावे आणि भारतकुमार राऊत हे ज्येष्ठ पत्रकार आणि 'लगान'साठी आपली घोडी ऑस्करच्या खिंडीत घालणारा आशुतोष गोवारीकर, अशा मान्यवरांच्या साक्षीने आणि तुडुंब प्रेक्षकफौजेसमोर पाटलांच्या 'संभाजी'चे प्रकाशन झाले. पहिली आवृत्ती कधीच संपली, अशी द्वाही फिरली! समस्तांच्या साक्षीने मेहता पब्लिशिंग हाऊसचे प्रकाशक सुनील मेहता यांनी तीन लाख रुपयांच्या मानधनाचा धनादेश विश्वास पाटलांना सुपूर्द केला.




*दीपप्रज्वलन*




गाडगीळ म्हणाले की, मराठीत ऐतिहासिक कादंबरीलेखनाची परंपरा मोठी. पण आपटे, नाथ माधव आणि हडपांनी काल्पनिक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. पाटलांनी मात्र इतिहासाला कल्पनेचे कपडे न चढवता मोठी कलाकृती कोरून काढली. पूर्वसुरींहून ते वेगळे ठरले. मराठी साहित्य नवेपणाच्या मागे लागून कधी कधी किरटे होते, पण भरघोस लिहूनही चांगले लिहिता येते, हे पाटलांनी दाखवून दिले आहे.

महाराष्ट्रातल्या एका शूरवीराला बदनाम करण्याचा डाव हाणून पाडण्याचे मोठे काम विश्वास पाटलांनी केल्याचे मधुकर भावे म्हणाले. बकुळीची फुले अलगद खुडावी, तसे पाटील शब्द खुडून कादंबरीच्या परडीत ठेवतात, असे ते म्हणाले. तर भारतकुमार राऊतांनी, विश्वासराव शब्दांशी प्रणय करतात, असे सांगितले. मधु मंगेशांना त्यांचे शब्द गडकऱ्यांच्या भरजरी भाषेची आठवण करून देणारे वाटले. आशुतोषने तर कादंबरीतला एक प्रसंगच सादर केला.

निवेदक कवी महेश केळुस्कर छुपे वार करीत होतेच, पण मोठा वार करत पाटील म्हणाले, मराठी नाटककारांना उघडपणे जाता येत नाही म्हणून त्यांनी संभाजीच्या आडून निरनिराळ्या बायांच्या माड्या चढून आपला आंबटशौक पुरा केला.

*म. टाईम्स मधून*



*'संभाजी'चे प्रकाशन करताना डावीकडून मा.विश्वास पाटील, प्रकाशक सुनील मेहता, अध्यक्ष मा. गंगाधर गाडगीळ, मा. मधु मंगेश कर्णिक*

विशेष वार्ता

# लोकार्पण सोहळा

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या 'संजीवन समाधि-दिनाचा' मुहूर्त साधून प्रख्यात कादंबरीकार डॉ. आनंद यादव यांनी दि. २९ नोव्हेंबर २००५ रोजी प्रत्यक्ष आळंदीला जाऊन ज्ञानेश्वरांच्या समाधीवरील पादुकांना कादंबरी अर्पण केली. त्यांच्याबरोबर 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे ज्येष्ठ प्रकाशक श्री. अनिल मेहता होते. तसेच यादवांचे लेखन सहाय्यक श्री. विलास कालेकर हेही होते. एम.आय.टी. कॉलेज (पुणे) या संस्थेचे प्राचार्य आणि 'आळंदी देवस्थान'चे प्रमुख ट्रस्टी डॉ. विश्वनाथ कराड यांनी या कार्यक्रमासाठी मोलाचे सहाय्य केले. त्यांच्यामुळेच हा सुवर्णयोग घडून आला. त्यांनीच समाधीस्थलाचे स्पर्शदर्शन घडवून आणले.

समाधीवर कादंबरी अर्पणाचा सोहळा पार पडल्यावर प्राचार्य कराड यांनी सर्वांना घाटावर नेले. ज्येष्ठ प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक आणि किर्तनकार शेलार मामा (वय वर्षे एकशेचार) यांच्या किर्तन स्थानी सर्वजण पोहोचले. तिथे शेलारमामा यांच्या चाललेल्या किर्तनाला शेलारमामांनी थोडा वेळ विराम दिला. त्यावेळात लाखो वारकरी श्रोत्यांच्या साक्षीने प्राचार्य डॉ. कराड यांनी कादंबरीचे जाहीररीत्या प्रकाशन करून कादंबरीविषयी गौरवोद्‌गार काढले. साहित्यिक आनंद यादव यांनी सर्वांचे आभार मानले. त्यानंतर प्राचार्य कराड यांनी आपल्या ट्रस्टतर्फे प्रकाशक श्री. अनिल मेहता यांचे आणि श्री. यादव यांचे भगवे वस्त्र, ज्ञानेश्वरांची प्रतिमा आणि श्रीफल देऊन जाहीर सत्कार केला. शेलार मामा यांनी हात उंचावून 'लोकसखा ज्ञानेश्वर' कादंबरीची प्रत वारकरी श्रोतावर्गाला दाखविली आणि लेखक प्रकाशकांना आशीर्वाद देऊन प्रकाशन सोहळा सुफलित, संपन्न केला.



*प्रकाशन करताना डावीकडून मा.अनिल मेहता, मा. डॉ. विश्वनाथ कराड, मा. शेलारमामा व मा. आनंद यादव*



आळंदी तीर्थक्षेत्री हा कार्यक्रम माध्यान्हीला संपन्न झाल्यावर त्याच दिवशी सायंकाळी चार वाजता प्रकाशक श्री. मेहता यांनी पुणे मुक्कामी पत्रकार परिषद आयोजित केली होती.

प्रस्तुत परिषदेत श्री. यादव यांनी पत्रकारांच्या अनेक जिज्ञासू प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. ती देताना प्रस्तुत कादंबरी लेखनामागची लेखकाची भूमिका स्पष्ट केली. तसेच कादंबरीचे वेगळेपण नेमके कशात आहे, तेही स्पष्ट केले. श्री. अनिल मेहतांनी सर्व पत्रकारांचे आभार मानले आणि अर्पण व प्रकाशन सोहळ्याची सांगता केली.



*'लोकसखा ज्ञानेश्वर 'ची प्रत समाधीस्थळावर अर्पण करताना डॉ. आनंद यादव, डॉ. विश्वनाथ कराड विलास कालेकर व अनिल मेहता*

**विशेष वार्ता**

## प्रकाशित होताच 'संभाजी'ला पुरस्कार जाहीर

सोलापूरच्या शंकरराव मोहिते पाटील पुरस्कार समितीने नुकताच 'संभाजी' या विश्वास पाटीललिखित महाकादंबरीस रुपये १००००चा पुरस्कार जाहीर केला. या समितीतर्फे देण्यात येणाऱ्या पुरस्कारांपैकी कादंबरी या वाङ्मयप्रकारासाठी असलेला पुरस्कार 'संभाजी' कादंबरीस घोषित करण्यात आला. गेली तीन वर्षे वर्षभरात प्रकाशित होणाऱ्या उत्कृष्ट साहित्यास हे पुरस्कार दिले जातात. मागीलवर्षी मारुती चितमपल्ली यांच्या 'चकवाचांदण' या पुस्तकास हा पुरस्कार प्राप्त झाला होता.

सदर पुरस्कार १४ जानेवारी २००६ रोजी सोलापूर येथे प्रदान करण्यात येणार आहे.

**श्री. विश्वास पाटील यांचे हार्दिक अभिनंदन.**

---

*''खरंच गावकऱ्यांनो, तुमच्या पूर्वजांची थोर पुण्याई म्हणून शिवाजीचा हा पराक्रमी बाळ चिरनिद्रा घेण्यासाठी तुमच्या गावमातीच्या मांडीवर आला! काही सालामागं समाजकंटकांनी तुकोबा माऊलींची अभंगगाथा तिच्या डोहात बुडवली होती. स्वत: इंद्रायणी मातेनं ती पाण्याबाहेर आणून दिली म्हणतात. तशीच काळाच्या डोहात भिजलेली आमच्या पराक्रमी शिवपुत्राची ही गाथा वर यायला किती वर्षं लागतील कोणास ठाऊक! पण आज, उद्या, परवा, तेरवा - काही शतकांच्या प्रवासानंतर का होईना, ती वर येईलच! कारण सत्याएवढी शाश्वत गोष्ट दुनियेमध्ये अन्य नाही! पण जेव्हा न केव्हा गैरसमजाचे, बदनामीचे तकलादू पडदे फाडून ही खरीखुरी हकीगत समाजमनाला कळेल, तेव्हा मात्र शेजारच्या देहू आणि आळंदीसारख्या इथे वढु गावातही, यात्रा भरतील! आपल्या देशासाठी, धर्मासाठी आणि मातीच्या अभिमानासाठी मृत्यूला मिठी मारणाऱ्या ह्या मर्दाच्या समाधीचं दर्शन घेण्यासाठी ह्या शक्तिस्थळाकडे दुनिया धावेल!!!''*

**'संभाजी' मधून...**



**विश्वास पाटील**
**यांची महाकादंबरी**

# संभाजी

**बदनाम वीरनायकाचे**
**वास्तव पुनर्प्रस्थापन!**

**शंकर सारडा**




**'पानिपत'** ही कादंबरी १९८७ मध्ये प्रसिद्ध झाली आणि कादंबरीकार म्हणून विश्वास पाटील यांची मराठमातीत जबरदस्त एन्ट्री झाली. पानिपतला प्रियदर्शनी पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार वगैरे दहाबारा पुरस्कार मिळाले आणि त्याच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत राहिल्या. 'पानिपत'वर आधारलेले 'रणांगण' हे नाटकही अल्पावधीत पाचशेवर प्रयोगांची मजल गाठणारे ठरले. एका वेगळ्याच प्रकारचा नाट्यानुभव 'रणांगण'ने दिला. नव्या दमाच्या तरुण नटनटींनी करून दाखवलेला तो खेळ पानिपतच्या भीषण शोकांतिकेची यथार्थ प्रतीती आणून देणारा होता.

रायगडाला जेव्हा जाग येते (वसंत कानेटकर), स्वामी (रणजित देसाई) या कृतींतून इतिहासातला माणूस जाणून घेण्याचा प्रयत्न वैशिष्ट्यपूर्ण ठरला. परंतु या कलाकृतीत काल्पनिक भाग बराच राहिला. 'पानिपत' आणि 'संभाजी' यामध्येही माणूस शोधण्याचा प्रयत्न आहे; परंतु त्याचबरोबर इतिहासाशी जास्तीत जास्त इमान राखले आहे. क्वचित् अपवाद वगळता बहुतेक व्यक्ती आणि घटना-प्रसंग यांना ऐतिहासिक कागदपत्रांचा आधार आहे. म्हणून ऐतिहासिक कादंबरीतील नव्या पर्वाचे श्रेय पाटील यांना द्यावे लागते.


'पानिपत'ला अभूतपूर्व यश लाभले तेव्हा विश्वास पाटील यांचे वय होते सत्तावीस... महाकाव्याच्या तोलामोलाची ही कादंबरी. ऐतिहासिक कादंबरी क्षेत्रात 'स्वामी'नंतर एक नवा मानदंड निर्माण करणारी ठरली. विश्वास पाटील यांनी या कादंबरीत एकही काल्पनिक पात्र वा प्रसंग टाकून तिची छुपी प्रेमकहाणी बनवली नाही. बखरी, दस्तऐवज, संदर्भग्रंथ साक्षेपाने बघून चौकस अभ्यासाद्वारे पानिपतची एकूणच मोहीम आणि अब्दाली-नजीबखान यांच्या रणनीतीचा तसेच अखेरच्या

संग्रामाचा त्यांनी उभा केलेला आलेख हा पूर्णतया इतिहासाशी इमान राखणारा होता. महाकाव्यात आवश्यक असे समग्र मानवी अस्तित्वाचे आणि गूढ भवितव्याचे भान देणारे, उदात्त अतिमानुष मूल्ये निर्भयपणे उद्घोषित करणारे वृत्तीचे ताटस्थ्य, ऐन तिशीच्या आतील या तरुण लेखकाने समर्थपणे प्रकट केले होते; आणि ग्रेट ॲक्शन अँड ग्रँड स्टाइल यांचा; महाकाव्यसदृश विशाल आशय आणि भव्य शैली यांचा अवाढव्य पट मांडून व्यक्तिरेखांची सजीव उभारणी करून तसेच संघर्षाची निर्भय हाताळणी करून, सव्वादोनशे वर्षांपूर्वीच्या त्या अभूतपूर्व संग्रामामध्ये त्यांनी आजच्या महाराष्ट्रातील राजकीय संघर्षाची अंत:सूत्रेही कशी प्रकट होतात हेही नेमकेपणाने ध्वनित करून दाखवले. 'पानिपत'मधील अस्सल ग्रामीण भाषेचा ठसका आणि बाज असा खणखणीत होता की कितीतरी तरुणांना ही संपूर्ण कादंबरी मुखोद्गत झाली. मदन बाफना हे त्यावेळी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात होते; त्यांनी 'पानिपत'मधील उतारेच्या उतारे एका भेटीत म्हणून दाखवले तेव्हा आश्चर्यचकित व्हायला झाले... पण असा अनुभव हा पुढेही येत राहिला.

'पानिपत'च्या या सर्वंकष यशानंतर विश्वास पाटील हे पुन्हा अशीच ऐतिहासिक कादंबरी लिहितील असे वाचकांना वाटणे स्वाभाविक होते. परंतु विश्वास पाटील यांची पुढची कादंबरी आली ती **झाडाझडती**. धरणग्रस्तांच्या व्यथावेदनांना चेहरामोहरा देणारी. प्रादेशिक कादंबरीत तिनेही नवा मानदंड निर्माण केला... साहित्य अकादमीचा पुरस्कार तिने मिळवला. वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी हा भारतीय पातळीवरचा पुरस्कार मिळवणारे पाटील हे सर्वात कमी वयाचे तरुण कादंबरीकार ठरले. 'झाडाझडती'नंतर सातआठ वर्षांच्या प्रचंड परिश्रमांनिशी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनचरित्राचा सर्वांगीण वेध घेणारी **महानायक** ही महाकादंबरी अवतरली; आणि तिनेही सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाची आणि झुंजार व्यक्तिमत्त्वाची यथार्थ ओळख करून दिली. आझाद हिंद सेनेच्या स्थापनेचा आणि पुढील मुसंडीचा आवाका प्रथमच इतक्या सुसूत्रपणे पेश केला गेला; आणि तोही अत्यंत साक्षेपी वृत्तीने! वसंत कानेटकर यांच्यासारख्या मातब्बर नाटककाराने विसाव्या शतकातील सर्वोत्तम मराठी कादंबरी म्हणून तिचा गौरव केला तर अग्रगण्य बंगाली कादंबरीकार सुनील गंगोपाध्याय यांनी त्या वर्षीची सर्वश्रेष्ठ- प्रथम क्रमांकाची कलाकृती म्हणून तिची निवड करून, सुभाषबाबूंना विश्वास पाटील यांनी खऱ्या अर्थाने न्याय मिळवून दिला, कोणाही बंगाली लेखकाला जे जमले नाही ते विश्वास पाटलांनी करून दाखवले असे म्हटले. 'महानायक' इंग्रजीसह आठ भाषांमध्ये अनुवादित झाली आहे आणि उत्तम प्रतिसाद मिळवत आहे.

'पानिपत'नंतर विश्वास पाटील पुन्हा ऐतिहासिक कादंबरीकडे वळले आणि त्यांच्या तळपत्या लेखणीने 'संभाजी'चे तेजस्वी, धगधगते संघर्ष-पराक्रमपर्व अस्सल कागदपत्रांच्या आणि संदर्भग्रंथांचा काटेकोर धांडोळा घेऊन साडेआठशे पृष्ठांच्या





महाकादंबरीद्वारे मराठी वाचकांपुढे उभे केले आहे.

शिवरायांच्या आकस्मिक निधनानंतर वयाच्या तेविसाव्या वर्षी संभाजीराजे दुसरे छत्रपती झाले; त्यांना राज्यसिंहासन मिळू नये असा अष्टप्रधानांचा कावा होता; परंतु तरी ते छत्रपती झाले; आणि पुढची नऊ वर्षे त्यांनी औरंगजेबाच्या सैन्याशी मुकाबला देत मराठी राज्य टिकवून धरले. दुर्दैवाने संगमेश्वरी ते १० फेब्रुवारीला पकडले गेले आणि चाळीस दिवसांनी त्यांना औरंगजेबाने निर्घृणपणे ठार मारले... बखरकारांनी आणि पुढे इतिहास अभ्यासकांनीही बदफैली, व्यसनी, शाक्तपंथी कवी कलशाच्या नादाने बहकलेला, शिवरायांशी फटकून वागणारा, आपल्या सावत्र आईला भिंतीत चिणून मारणारा अशी संभाजीची नकारात्मक प्रतिमा गेली दोनशे वर्षे दृढ केली आहे. ही प्रतिमा अशी व्हावी याचे मूळ चिटणीसाच्या बखरीत आहे आणि ही बखर शंभूराजांच्या मृत्यूनंतर १२२ वर्षांनी लिहिली गेलेली आहे; आणि लिहिणारा बखरकार मल्हारराव रामराव चिटणीस याच्या पूर्वजांना- म्हणजे बाळाजी आवजी आणि त्याचा पुत्र आवजी बाळाजी यांना संभाजीराजांनी हत्तीच्या पायाखाली तुडवून मारले होते, त्यामुळे ही बखर म्हणजे संभाजीवर सूड उगवण्याचा प्रयत्न झालेला आहे. या बखरीत कवी कलशाच्या अघोरी मैत्रीने संभाजी बहकला आणि त्याचे राज्य धोक्यात आले अशी बखरकाराची पूर्वग्रहदूषित भूमिका आहे. तीच पुढच्या अभ्यासकांनी प्रमाण मानली. रियासतकारांनीही सोयराबाई संभाजीकडून मारली गेली असा निर्देश केला आहे; खरे तर ती पुढे दीड वर्ष हयात होती असे कागदपत्रांवरून दिसते. त्यामुळे उग्रप्रकृती संभाजी हा रियासतीचा खंड संभाजीची प्रतिमा डागळवणारा असाच झाला आहे. बखरीचीच त्यात री ओढण्यात आली आहे. 'बेबंदशाही' सारख्या नाटकातून संभाजीचे शेवटी धर्मवीर म्हणून झालेले उन्नयन व उदात्तीकरणही जनमानसाला प्रभावित करणारे ठरले. परंतु ''तुझ्या कन्येशी लग्न लावून देणार असशील तर मी मुसलमान व्हायला तयार आहे'' हे संभाजीच्या तोंडी घातलेले विधान मुळात बिनबुडाचे आहे. लग्नाचे वय असणारी एकही शहजादी त्यावेळी औरंगजेबाला नव्हती; त्यामुळे हे विधान म्हणजे केवळ कल्पनारंजन ठरते...

विश्वास पाटील यांनी 'संभाजी'ची व्यक्तिरेखा विचारात घेताना या सर्व नकारात्मक बाबींचा परामर्श घेतलाच आहे; परंतु दुसऱ्या दृष्टीनेही संभाजीच्या कर्तृत्वाचा शोध घेतला आहे; आणि त्यामुळे त्यांचा संभाजी हा वेगळा ठरतो.

पाच लाख फौज, तीन लाख घोडे व हत्ती, उंट घेऊन औरंगजेब महाराष्ट्रात

आला. त्याचा सैन्याचा तळ पडे तेव्हा वीसबावीस मैलाचा भूभाग त्याला लागे. मराठ्यांचे सैन्य त्यावेळी पन्नाससाठ हजारापलीकडे नव्हते. एकेका किल्ल्याला दहावीस हजार मोगल सैनिकांनी वेढा दिला तर तो किल्ला रसद न मिळाल्याने आठपंधरा दिवसांत पडायला हरकत नाही, असा औरंगजेबाचा हिशोब... परंतु इतके सैन्य असूनही नाशिकजवळचा रामशेजसारखा किल्ला मिळवायला मोगल सैन्याला साडेपाच-सहा वर्षे लागली... तोपर्यंत मराठ्यांचा एकही किल्ला मोगलांना जिंकता आला नाही. त्यामुळे औरंगजेब फारच हताश झाला होता. काफरबच्चा संभाजी हाती लागत नाही तोपर्यंत आपण डोक्यावर मुकुट (किमाँश) घालणार नाही अशी प्रतिज्ञा औरंगजेबाने केली; आणि तसा तो पुढे सहासात वर्षे महाराष्ट्रात बोडका हिंडलाही!

संभाजी या काळात आपले सिंहासन जणू घोड्यावर घेऊन सर्वत्र संचार करीत होता. किल्ले, त्यावरील शस्त्रास्त्रे आणि रसद यांचा पुरवठा सुरळीत राहावा, म्हणून जागरुक होता. गनिमी हल्ले चढवून मोगली सैन्याला हतप्रभ करीत होता. पोर्तुगीज, कर्नाटक, इंग्रज, सिद्दी वगैरेंना तोंड देत होता आणि विजापूर व हैदराबादच्या मुस्लीम बादशहांशी दोस्तीचे संबंध ठेवून मोगलांना दूर ठेवत होता... आपले आरमारही अधिक बळकट करीत होता... त्रिचनापल्लीपर्यंत धडक मारून तेथील चक्कदेवरायाला त्याने शरणागती पत्करण्यास भाग पाडले होते. त्याच्या हल्ल्यामुळे हवालदिल झालेल्या पोर्तुगीज काउंट दि आल्व्होरने आपली राजधानी पणजीहून मार्मागोवा येथे नेली होती. इंग्रजांशी करार करून मुंबई बेट विकत घेण्याचीही तयारी केली होती... हे सर्व संभाजीच्या पराक्रमाचे, चोख कारभाराचे, जागरुकपणाचे पुरावे होत. एखादा व्यसनात बुडालेला, इष्कबाजीत रमणारा, शाक्तपंथी अघोरी साधना करणारा माणूस मोगलांच्या प्रचंड सामर्थ्याला नऊ वर्षे थोपवून धरू शकण्याएवढा जागरुकपणा दाखवू शकेल का?... औरंगजेबाला संभाजीराजांच्या निधनानंतरही पुढे अठरा वर्षे महाराष्ट्रातच राहावे लागले आणि येथेच त्याची कबर बांधली गेली... इतका बंदोबस्त संभाजीने करून ठेवला होता असे म्हणावे लागते. त्याच्या नऊ वर्षांच्या कालावधीत औरंगजेबाच्या हाती मराठ्यांचे फार थोडे किल्ले लागले; जे किल्ले मिळाले तेही फंदफितुरीमुळे मिळाले- असे पुरावे आहेत.

संभाजी पकडला गेला तोही खुद्द त्याचा मेहुणा गणोजी शिर्के याच्या फितुरीमुळे. त्यावेळी शिवाजीराजांचे तीनही जावई मोगलांच्या सेवेत गेलेले होते हेही येथे लक्षात घेणे आवश्यक आहे... तेव्हा पाच लाखांच्या शस्त्र-अश्वसज्ज अशा प्रचंड मोगली सत्तेला काही हजार मराठी मावळ्यांनी वर्षानुवर्षे सळो की पळो करून सोडावे- ह्यात संभाजीराजांच्या कुशल रणनीतीचे आणि पराक्रमाचे नक्कीच योगदान आहे हे मान्य करावे लागते. सतत लढायांत गुंतलेल्या संभाजीराजांना इष्कबाजी



आणि व्यसने करण्याएवढी उसंत मिळत असेल अशी समजूत करून घेणे त्यामुळे अनाठायी ठरते.

विश्वास पाटील यांनी म्हणूनच गोवा, कर्नाटक वगैरे मोहिमा, इंग्रज-सिद्दी वगैरेंशी केलेले करार व संघर्ष, वतनदारीला विरोध करून मराठा सरदारांचे ओढवून घेतलेले शत्रुत्व, मोगलांच्या अफाट सैन्याविरुद्ध गनिमी काव्याने दिलेल्या झुंजी; आरमाराकडे दिलेले लक्ष, करारमदार करताना दाखवलेले साक्षेपीपण, अष्टप्रधानांपैकी काहीजण कायम विरोधात असूनही त्यांना सत्तेत दिलेले स्थान; आपलेच जवळचे आप्तस्वकीय आपल्या विरोधात करीत असलेल्या कट-कारस्थानांची कल्पना असूनही दाखवलेले औदार्य... आपण सारखे भ्रमंतीवर... तेव्हा येसूबाईला रायगडावर कारभारासाठी **श्री सखी राज्ञी जयति** असा अधिकृत शिक्काही देण्याची दाखवलेली गुणग्राहकता... हे सर्व लक्षात घेऊन विश्वास पाटील यांनी संभाजीराजांची 'पुनर्प्रस्थापना'च या महाकादंबरीद्वारे केली आहे, असे म्हणावे लागते.

इतिहासाशी संपूर्ण इमान राखून, कागदपत्रातील पुरावे लक्षात घेऊन विश्वास पाटील यांनी शंभूराजांची ही संघर्षगाथा सिद्ध करताना एक कादंबरीकार म्हणूनही आपले सामर्थ्य प्रकट केले आहे. आरंभीच्या भागातून शिवाजीराजे आणि शंभूराजे, अष्टप्रधान आणि शंभूराजे, यांचे संबंध उलगडून दाखवत राज्याभिषेकापर्यंतचा प्रवास स्पष्ट केला आहे. राज्यकर्ता म्हणून असणारे संभाजीचे गुणविशेषही प्रकट केले आहेत. पुढे प्रत्यक्ष मोहिमा, गडदुर्गांचे संरक्षण आणि व्यवस्थापन, गाजवलेले पराक्रम, घरभेदी नातलगांचा सहन केलेला वैताग... आणि जमवलेले इमानी साथीदार... त्यांनी दाखवलेली स्वामीभक्ती... यांचे पानोपानी दर्शन घडत जाते.

संभाजीला वीरनायक दाखवायचे तर औरंगजेबाला खलनायक- असा मोह कोणालाही पडेल. परंतु विश्वास पाटील यांनी औरंगजेबाला कुठेही विदूषकी वा पूर्णतया खल दाखवलेले नाही. औरंगजेबाचे चित्रण करताना एक व्यक्ती, एक बादशहा, एक कुटुंबवत्सल गृहस्थ, एक पिता, एक सेनापती, एक चाणाक्ष मानसशास्त्रज्ञ व लढवय्या... म्हणून, एक माणूस म्हणून त्याचा वेध घेतलेला आहे. संभाजीला पकडून मराठ्यांचे राज्य संपवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे; त्यासाठी तो सर्व मार्ग बेधडक हाताळतो. मराठ्यांनाच फितुरी करायला लावून आपले उद्दिष्ट तो साध्य करू पाहतो; यात शंकाच नाही. विश्वास पाटील औरंगजेबाला एक व्यक्ती, राज्यकर्ता म्हणून पेश करतात. संभाजी आणि औरंगजेब यांच्या या संघर्षाला हिंदू विरुद्ध मुसलमान, हिंदू विरुद्ध इस्लाम असे स्वरूप ते देत नाहीत. दक्षिण हिंदुस्थानातील मुस्लीम राजे (विजापूर-हैदराबाद) हे संभाजीच्या बाजूने असतात; आणि ते या उत्तरेच्या आक्रमणाचे विरोधक असतात. औरंगजेबाचे 'आपण इस्लामी'चे आवाहनही ते धुडकावून लावतात. त्यामुळे संभाजीची प्रतिमा ही अधिक व्यापक बनते. धार्मिक नेत्यापेक्षा दक्षिणेकडील राज्यांचा समर्थक-

पाठीराखा म्हणून!

विश्वास पाटील यांनी आपल्या या संशोधनातून जुन्या कागदपत्रांतून हरवलेल्या काही वीरनायकांनाही पुन्हा प्रतिष्ठित केले आहे. सेनापती हंबीरराव मोहिते हे राजारामाचे मामा; पण ते राजारामाऐवजी संभाजीलाच राजसिंहासन मिळावे म्हणून त्याच्या पारड्यात आपले माप टाकतात; सिद्दीचा उच्छेद करावा म्हणून कोंडाजी फर्जंद आपल्या प्राणांची बाजी लावतो. त्याची वीरगाथा बाजीप्रभू, तानाजी यांच्याप्रमाणेच घरोघर पोहोचेल ती विश्वास पाटील यांच्या या कादंबरीमुळे! अणुस्कुरा घाट आणि मळेघाट- तेथील निबीड दुर्गम वाटा लीलया पार करणारी धनगर पोरेही आपल्या आदर-आत्मीयतेचा विषय होतील. संभाजीची पत्नी दुर्गाबाई आणि मुलगी कमळजा- मोगलांच्या तावडीतच असतात. त्यांची ती जगावेगळी भेट चटका लावून जाईल. शंभूराजांच्या दक्षिणेतील धडकेचेही वास्तव प्रथमच इतक्या समर्पकपणे या कादंबरीतून पुढे आले आहे.

सर्वात मनाला भिडेल ते संभाजीराजांच्या गिरफ्तारीचे आणि नंतरच्या चाळीस दिवसांतील अचाट मनोबलाचे दर्शन! 'महानायक'मधील आझाद हिंद सेनेच्या पुनर्रचनेप्रमाणेच संभाजीच्या या अंतिम पर्वाची विश्वास पाटील यांनी केलेली ही पुनर्रचना अचाट प्रतिभेची साक्ष पटवते. संभाजीराजांच्या आणि कवी कलशांच्या धीरोदात्तपणाचे अलौकिक पर्व उलगडून दाखवते.

'मृत्युंजय', 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'पानिपत', 'रायगडाला जेव्हा जाग येते'- या बेस्टसेलर मालिकेतले 'संभाजी' हे नवे पुष्प मराठीच नव्हे तर भारतीय वाचकांनाही नवा आत्मसन्मान देईल.

**शंकर सारडा**
ई-१०, पाटील रिजन्सी
१५, एरंडवणे, पुणे ४११००४
फोन नं. ९८२३२६१०२३

**या वर्षातील अजून एक ऐतिहासिक कादंबरी**




**छत्रपती राजर्षी शाहू महाराज**

तु. बा. नाईक



**पुस्तक परिचय**

# आभाळझुंज

**अनंत भोयर**




**धरणग्रस्तांच्या व्यथावेदनांचा अंतर्मुख व अस्वस्थ करणारा दस्तऐवज**

धरणग्रस्तांच्या समस्यांचा मागोवा घेणाऱ्या कादंबऱ्यांमध्ये 'आभाळझुंज' या नव्या कादंबरीची भर पडत आहे. विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीने 'तुमचे धरण आमचे मरण' ही धरणग्रस्तांची अवस्था कशी उद्ध्वस्त करणारी ठरते याचे विदारक दर्शन घडवले आहे. ते स्वत: शेतकरी आणि शासकीय अधिकारी असल्याने धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या कामातील अनेकविध गफलती आणि वातानुकूलित मंत्रालयातल्या उच्च शासकीय अधिकाऱ्यांची बेफिकिरी याचे अनेक नमुने त्यांनी दाखवले आहेत. धरणात गेलेल्या गावांतील समाजजीवन कसे उन्मळून पडते हे उत्तम प्रकारे त्यांनी दाखवले आहे.

विदर्भातील काटोल तालुक्यातील कचारी सावंगा येथील लेखक अनंत भोयर यांनीही विस्थापितांच्या या समस्यांवर लक्ष केंद्रित करून, धरणांमुळे आर्थिक, व्यावसायिक, मानसिक, कौटुंबिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरही कसे भरडले जातात, विस्थापितांची अवस्था त्यामुळे त्रिशंकूसारखी कशी होते, निसर्ग-पर्यावरण-कृषिव्यवस्था आणि एकूणच तत्संबंधित व्यवसाय या सगळ्यांवर होणाऱ्या परिणामांची गुंतवळ कशी क्लिष्ट व जटिल असते, विघटनकालातील तकलादू विकासामुळे समूहजीवनावर टोळधाडीसारखी अतिक्रमणे कशी होत राहतात- याचा एक व्यापक पटच अनंत भोयर यांनी आपल्यापुढे खुला केला आहे.

'आभाळझुंज'मध्ये आरंभीच आपल्याला ऐकू येतो तो नदीकाठावरचा भों भों आवाज; बुलडोझरचा आवाज आणि त्यामुळे बधिर झालेल्या वामनच्या अंगठ्यावर वस्तऱ्याला धार लावताना उमटलेली रक्ताची लाल रेघ...

हा वामन नाभिक हा या कादंबरीचा नायक... त्याचा मुलगा सागर. बापलेकांची हजामतीची पूर्वापार चालत आलेली एकच पेटी. बखोटीत मावण्याएवढी. तिच्यातली

चारपाच अवजारं... ती पेटी अवघ्या घरादाराला पोसत होती. भोवतालची घरं उठून गेल्यानं गिऱ्हाइकी कमी झालेली... सागरची बायको प्रगती शहरात वाढलेली. तिला अंगण सारवणं वगैरे कुठलं जमणार? तेव्हा सागरची बहीण तिच्या हातातलं पोतेरं घेऊन स्वत: सारवते. तेव्हा प्रगतीची उद्विग्न कॉमेंट : ''माझ्या हातचं काम पसंतच नाही येत मायलेकीले!''

नदीकाठावरच्या लोकांना घर खाली करायच्या नोटिसा आलेल्या. नदीकाठचे बरेचसे धरणपीडित जमिनीचा मोबदला घेऊन माथ्याकडच्या हेटीवर घरं बांधून रहायला गेलेले; पण काही कुटुंबे जुन्याच ठिकाणी ठिय्या देऊन बसलेली. वामन हा त्यापैकीच एक. पुनर्वसनाने नदीकाठची वस्ती लसणातल्या कळ्यांप्रमाणे निसून निघते... गावात न्हाव्यांची दोन घरं. त्यातला एक भोजराज. तो प्रकल्पपीडित म्हणून स्लॅबचं घर बांधतो. दुसरा धंदा सुरू करतो. वामन मात्र आपल्या जुन्या जागी आपला नखाबोटाचा प्रपंच चालवत राहतो. बापलेक एकाच वस्तऱ्यावर काम करत राहतात. वामन आणि त्याची बायको नर्मदा पत्रावळी करून विकतात. सून प्रगती मात्र त्या कामातही कधी मन घालत नाही. घरात टीव्ही नाही, सुखसोयी नाहीत; त्यामुळं नुकतंच लग्न करून आलेल्या तिची धुसफूस चालूच राहते. वस्ती कमी झाल्याने वामनकडचे गिऱ्हाईकही कमी होत जाते. कमाई कमी कमी होत जाते.

**सून प्रगती मात्र त्या कामातही कधी मन घालत नाही. घरात टीव्ही नाही, सुखसोयी नाहीत; त्यामुळं नुकतंच लग्न करून आलेल्या तिची धुसफूस चालूच राहते. वस्ती कमी झाल्याने वामनकडचे गिऱ्हाईकही कमी होत जाते. कमाई कमी कमी होत जाते.**

...पुढे सागरला वाटतं- इथं काही धंदा नाही. घरात सारखी वादावादी. बाप समजून घेत नाही; बायकोला दुखवता येत नाही. प्रगती नवऱ्याला म्हणते- ''काय बाई! कितीबी झाडालोटा, तरी गागरा तयारच होतो पुन्हा. नरकपुरीच वाट्टे जशी. तुमाले नरकाशिवाय गमत नाही, त्याले काय उपाय?'' सागरची घुसमट होत राहते. शेवटी तो बापाला सांगतो, ''गावाचे दोन तुकडे झाल्यापासून काही ढंग नाही राह्यले गिऱ्हाइकीत... दिवसभरात दोन कटिंगी अन् चार दाढ्या... सारे हेटीवरच पळतेत... बरसाद लागल्यावर कुत्रे हाल खानार नाई आपले... बाजारात दुकान टाकलं तर?'' गाय विकून हेटावरच्या दुकानासाठी पैसा उभा करावी ही सागरची सूचना... पण ती वामन धुडकावून लावतो. मुकी बहीण शकुन वाकळा शिवून जमवलेले पैसे सागरला देते. सागर बाजारात दुकान घेतो. सागरचा सासरा नागपूरचा. श्रीमंत. त्याच्याकडे जाऊन सागर रातोरात खुर्ची, बेंच वगैरे घेऊन



येतो आणि झोकात सलून सुरू करतो... गिऱ्हाइक चांगले मिळते. इकडे वामनचे गिऱ्हाईक कमी कमी होत जाते... अडलेनडले उधारीचे गिऱ्हाईकच त्याच्याकडे आले तर येते...

सागरच्या दुकानात बसायला खुर्ची... आरसा... झगमगाट...

वामनकडे हजामतीसाठी खाली जमिनीवर बसायला लोक काकू करतात...

वामनचे हाल सुरू होतात...

सागरची कमाई जोरात सुरू होते.

वामन पुढे बँकेचे कर्ज मिळवून आपल्या वस्तीत ग्रामपंचायतीच्या गाळ्यात दुकान सुरू करतो. मुलाशी स्पर्धा करण्याच्या नादात फर्निचरवरही बराच खर्च करतो... तरी गिऱ्हाईक फारसे येत नाही... शेवटी दुकान खाली करावे लागते... एका नाभिक कुटुंबाच्या ससेहोलपटीवर विस्थापितांच्या समस्येवर लक्ष केंद्रित केले जाते.

धरणाच्या कामात रोडरोलर खाली सापडलेल्या रमेशच्या हाडामासाचा चुरा होऊन जातो. पोलिस पंचनामा करताना लिहितात– ''हा मुलगा रोलरखाली काय करायला गेला होता- हा खरा सवाल आहे.''

वेडसर गुलब्या कमरेला एखादं पोत्याचं झिंगर गुंडाळून इकडेतिकडे भटकत राहतो. पोरं त्याची टिंगल करतात.

धरणावरचा सिमेंट इत्यादी माल चोरून विकण्याचा धंदाही बरकतीला येतो.

धरणात पुनर्वसन झालेल्या लोकांनी शासनाकडून पैसा कमी मिळाला या सबबीखाली पुनर्मूल्यांकनाचे दावे लावावेत म्हणून काही वकील आपल्या दलालांना गावात धाडतात. काही लोकांना त्यामुळे चांगला फायदा होतो.

**शकुनच्या लग्नाचा विचार त्याच्या मनात येतो. ''मुकं लेकरू. वय गेलं वाढू. कुठं कामाला गेली तरी काळजी आणि घरी राहिली तरी काळजी.'' तेव्हा शेजारची चिंधाई एका बिजवराचे स्थळ सुचवते. लग्न होते... पण नवरा मारतो म्हणून शकुन पुन्हा माहेरी येते.**

शकुन देवीदासच्या घरच्या कामावर जाऊ लागते. एकदा घरी येताना काही पोरे तिच्या मागे लागतात. एक छत्तिसगडी तिची छेड काढतो म्हणून ती रडत घरी येते. खुणेनेच काय झाले ते सांगते. वामन त्या छत्तिसगड्याला सुपरवायझरकडे घेऊन जायचे म्हणतो. रिपोर्ट करतो म्हणतो. त्या काळूरामशी तो झोंबी घेऊ लागतो. लोक वामनला आवरून धरतात. तेव्हा वामन रागाने धुमसत घरी येतो. शकुनच्या लग्नाचा विचार त्याच्या मनात येतो. ''मुकं लेकरू. वय गेलं वाढू. कुठं कामाला गेली तरी काळजी आणि घरी राहिली तरी काळजी.'' तेव्हा शेजारची चिंधाई एका बिजवराचे स्थळ सुचवते. लग्न होते... पण नवरा मारतो

म्हणून शकुन पुन्हा माहेरी येते.

अशा अनेक प्रसंगांतून धरणग्रस्तांच्या आयुष्यातल्या अडीअडचणींची नोंद करीत कथानक पुढे जाते.

सागर आणि वामन या पुत्र-पित्यातील स्पर्धाही त्यात रंग भरते. केशकर्तनातही नवे तंत्र, नवे पर्व येते. वामनने नवे फर्निचर आणले तरी त्याचे तंत्र जुनेच... नव्या जमान्यात त्याचा जम बसणे कठीण ठरते. कर्ज काढून केलेले दुकान- त्याच्या हलाखीत भर टाकते. आपली जमीन विकण्याची पाळी त्याच्यावर येते. जमिन विकून जे पैसे येतात त्यात वाटा मागायला त्याचा मुलगा सागर येतो... त्याला काही रक्कम देऊन शांत करावे लागते...

निवडणुकीच्या वेळी वामन विचारतो– या दोन्ही पक्षाच्या पुढाऱ्यांनी गावासाठी आत्तापर्यंत कोणते दिवे लावले? कोणालाही आता निवडून देऊ नये. मतदारांनी एकी करून बहिष्कार टाकावा. पण त्या मतामुळे वामन एकटा पडतो. जहागीरराव त्याला एक घडी देऊन घडीवर शिक्का मारायला सांगतो, तेव्हा ती घडी घेण्यास वामन नकार देतो.

सागर आणि वामन या पुत्र-पित्यातील स्पर्धाही त्यात रंग भरते. केशकर्तनातही नवे तंत्र, नवे पर्व येते. वामनने नवे फर्निचर आणले तरी त्याचे तंत्र जुनेच... नव्या जमान्यात त्याचा जम बसणे कठीण ठरते.कर्ज काढून केलेले दुकान- त्याच्या हलाखीत भर टाकते.

भिंत पडल्याच्या भरपाईदाखल वामनला शंभर रुपयाचा चेक पटवारी देतो. पण त्याच्या वटणावळीसाठी बँक, शंभर रुपये भरून खाते उघडायला सांगते आणि कमिशनचे तीस रुपये पडतील असे सांगते. तेव्हा वामन तो चेकच फाडून टाकतो. ''खातं गेलं चुलीत. सरकारे आमाले कुत्रे समजून ह्या चिमूटभर नुकसानभरपाईचा तुकडा फेकते का आमच्यापुढे?'' इतर लोक घरात नसलेल्या संडासाची भरपाई म्हणून तीन-तीन हजार रुपये मिळवतात.

न्यायाधीशापासून वकिलाच्या असिस्टंटपर्यंत ही सगळी साखळीच असते. वामनला ही कल्पनाच सहन होत नाही. ''आपल्याला नाई पाह्यचेन कोनाचा हरामाचा पैसा... आपला घामाचाच बरा!''

सागरला मुलगा होतो. वामन आजोबा होतो. नातू वामनच्या पायाकडे बघून विचारतो, ''तुमच्या पायाला काय झाले?'' वामन उत्तर देतो, ''माह्या पायात तरन्यावानी जोर राहता तर पुनर्वसनासाठी कुदलो असतो ह्या पुढाऱ्यांच्या आणि सरकारच्या छाताडावर!... ते चिच्चीचं खोड पाह्यलं? काय फरक राह्यला त्या मुक्या झाडात आणि आपल्यात? दोघांच्याही मुळात पाणी शिरलं ह्या धरणानं.



हे जहर धीरे धीरे चढत जाते. मी तर धरणाच्या पाण्यानं पार इरलो- या चिच्चीवानी... तुमी नवथळाईनं तरी पावलं उचलाले पाह्यजेत आता. नाईत एकाद्या रोजी त्या मोवाडावानी होईन आपलंबी...''

पावसाळ्यात नदीला पूर येतो. खूप नुकसान होते. शेतीवाडीकडे जायचा मार्ग बंद होतो. पूल अजून अर्धवटच बांधून झालेला असतो. नदीपल्याड जायचे तर मैलभर फेरा घ्यावा लागतो. देवळात श्रावणी गजबजा जाणवत नाही.

सागरची बायको म्हणते, ''घरात बसून कंटाळा येतो. मी एक ब्युटी पार्लर सुरू करते. त्यासाठी कोर्स करून येते. काटोलला कोर्स आहे. तीन महिन्यांचा... पार्लर गावात लावलं तर बायकांची गर्दी होईल. चांगली कमाई होईल.''

वामनला ते कळते- तेव्हा त्याची चिडचिड होते. ''तुमची सून तर घेऊन राह्यली बायकांचं हजामतीचं ट्रेनिंग...'' असं जो तो त्याला सांगतो.

धरणाच्या बाधित क्षेत्रातली नखुबुवाची जागा पंचायतीच्या मालकीची... म्हणून इमल्याचा पैसा त्याला मंजूर झाला. पण त्या घराचा इमला मारुतीच्या मालकीचा. तेव्हा मारुती त्याच्यावर दावा लावतो. तर नखुबुवा मारुतीवर दावा लावतो. असे कोर्टकचेऱ्यांचे हेलपाटे वाढू लागतात. पुढाऱ्यांपासून बेलिण्यापर्यंत पैसे चोरून ते दोघेही हातघाईला येऊ लागतात.

**काय फरक राह्यला त्या मुक्या झाडात आणि आपल्यात? दोघांच्याही मुळात पाणी शिरलं ह्या धरणानं. हे जहर धीरे धीरे चढत जाते. मी तर धरणाच्या पाण्यानं पार इरलो- या चिच्चीवानी... तुमी नवथळाईनं तरी पावलं उचलाले पाह्यजेत आता.**

पुनर्वसनाचा पैसा अल्पदराच्या मुदतीच्या ठेवीत ठेवून ठेवीदारांना जादा दराने कर्ज देऊन बँका आपला नफा वाढवू लागतात.

बांध पूर्ण झाल्यावरचा दुसरा पावसाळा... नदी तुडुंब भरते. शिवारात जाणाऱ्या गाववाटा बुजून जातात.

गावात दोन पक्ष. जहागिररावाच्या खांद्यावर एका आमदाराची धुरा तर हुकूमसेठ दुसऱ्या झेडपीच्या नेत्याच्या गटाचा आधारस्तंभ. दोघेही नेते काँग्रेसचेच. पण हवा पाहून तिवा मांडणारे.

सावेगावच्या लवणाकडच्या बाजूला घरांसाठी प्लॅन मंजूर होतो. माथ्याकडच्या भागात ग्रामपंचायत प्लॉट पाडून विक्रीला काढते. कार्यकर्ते व पुढारी ते प्लॉट हस्तगत करतात. पुनर्वसन थांबवण्यासाठी दोन्ही काँग्रेस गटात सुंदोपसुंदी सुरू होते. जहागिरराव आपल्या नदीकाठच्या पडीक जमिनीत संत्र्याच्या बागा लावतो. पुनर्वसनात फळझाडांच्या बागांच्या नावावर मोबदला म्हणून भरपूर पैसा मिळवण्यासाठी अशी नाटके सुरू होतात. घरतवाड्याच्या आजूबाजूला प्रकल्पग्रस्त गावांनी धरणग्रस्तांची

समिती स्थापन होते. सावेगावचे लोक या समितीत येण्याचे टाळतात. त्यामुळे त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होते. घरतवाड्यात फक्त शेतीच पाण्यात जाणार होती; सावेगावात घरेही पाण्यात जाणार होती. पण आंदोलनाचा फायदा सावेगावलाही मिळतो.

पावसात मोवाड गाव वाहून जाते. पुरापासून बचाव करण्यासाठी वामनलाही घर सोडून जाण्यास सांगितले जाते. त्याच्या घराची भिंत पाण्याने पडते. नंतर त्याची धावपळ होते. धर्मशाळेत आसरा घेणे भाग पडते.

धरणग्रस्तांच्या या उद्ध्वस्त होत जाणाऱ्या आयुष्यांचे, एक नाभिक कुटुंब केंद्रवर्ती ठेवून केलेले हे चित्रण वास्तव तर आहेच; अंतर्मुख व अस्वस्थ करणारे आहे. अटळ अशा शोकांतिकेची सर्व बीजे त्यात आहेत. त्यामुळे यंदाच्या उत्तम कादंबऱ्यांमध्ये 'आभाळझुंज'ला स्थान द्यायला हवे.

**पृष्ठे : २९६ ● किंमत : २००रु. ● सभासदांना : १५०रु. ● पोस्टेज : २०रु.**


## या वर्षातील मनाचा थरकाप उडवणारी रहस्यमय पुस्तके

**रत्नाकर मतकरी**




**कबंध**
१००रु.



**खेकडा**
८०रु.



**निर्मनुष्य**
१००रु.

**व. कृ. जोशी**




**निरपराध बळी**
१००रु.

**अनंत वासुदेव वाईकर**




**शोधकथा**
**इन्स्पेक्टर व्ही. अनंतांच्या**
१६०रु.




# टॉक्सिन

**रॉबिन कुक / अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर**

**रुग्णसेवेचे बाजारीकरण आणि रेस्टॉरंटमधील असुरक्षित खाद्यपदार्थ यांच्या विरोधी आवाज उठवणारी कादंबरी**




डॉ. रॉबिन कूक यांच्या वैद्यकीय पार्श्वभूमीवरच्या थरारकथांनी जगभरच्या वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. कोमा वगैरे थरारकथांवरचे चित्रपटही गाजलेले आहेत आणि व्यावसायिक दृष्टीनेही त्यांनी तुफान यश संपादन केले आहे.

'टॉक्सिन' या त्यांच्या थरारकथेचा एकूण भर अमेरिकेतील मांस-प्रक्रिया उद्योगावर आणि रुग्णालयातील संघटित सेवासुविधांच्या बाजारीकरणावर आहे; आणि हे काम त्यांनी अत्यंत आक्रमक अभिनिवेशाने केले आहे. अमेरिकेतील (आणि आता भारतासारख्या देशातही वेगाने फैलावणाऱ्या) मॅकडोनॉल्ड, वेंडी, अंकल जॉन्स, वगैरे अगणित शाखा असणाऱ्या रेस्टॉरन्टच्या शृंखलांमधून ठराविक चवीचे पदार्थ खाणाऱ्या ग्राहकांची संख्या फार मोठी आहे. या रेस्टॉरन्टस्मध्ये मिळणारे पदार्थ पोषणमूल्यांनी युक्त असतात आणि ते तयार करताना अत्यंत स्वच्छता तसेच दक्षता घेण्यात येते अशी जाहीरात प्रत्यही होत असते. त्यांच्या विश्वासार्हतेचा तो भाग असतो. डॉ. रॉबिन कूक यांनी अशा हॉटेल्समधील पदार्थांच्या आणि त्यांना मांस वगैरे पुरवणाऱ्या मोठ्या कंपन्यांच्या निर्दोषपणाच्या दाव्याबद्दल शंका उपस्थित केली आहे; आणि त्या सर्वांच्या विश्वासार्हतेबद्दलच अनेकविध प्रश्न उभे केले आहेत.

'टॉक्सिन'मध्ये किम रेगीस एका सेवाभावी डॉक्टरची दहा वर्षाची मुलगी बेकी प्रेअरी हायवेवरच्या 'ओनियन रिंग' या रेस्टॉरंटमध्ये बर्गरची ऑर्डर देते. त्या बर्गरबरोबर फ्राइज आणि व्हॅनिला शेकही घेते... तेथील बर्गर खाल्ल्यावर काही तासांनी बेकीचे पोट दुखू लागते. जुलाब होतात. जुलाबातून रक्त पडते. औषधे देऊनही बरे वाटत नाही तेव्हा किम तिला हॉस्पिटलमध्ये घेऊन जातो. पण त्या हॉस्पिटलमध्ये तो स्वत: तेथे डॉक्टर असूनही पेशंटकडे तातडीने लक्ष दिले जात नाही. ते हॉस्पिटल अमेरिकेअर या संस्थेतर्फे चालवण्यात येत असते

आणि त्याचे काम कोणालाही चीड यावी अशा पद्धतीने, खर्चात बचत करण्याच्या दृष्टीने, चाललेले असते. त्यामुळे बेकीकडे तातडीने लक्ष देण्यात कसूर होते... आणि तिचे दुखणे वाढतच जाते.

अमेरिकेतील अनेक हॉस्पिटल्सचे नियंत्रण आरोग्यविमा उतरवणाऱ्या व्यापारी संस्थांकडे गेले आहे; त्यामुळे त्यांच्या कारभारात काटकसरीच्या नावावर व कार्यपद्धतीच्या बडिवारावर अनेक चुकीच्या गोष्टींवर भर दिला जातो. डॉ. रॉबिन कूक यांनी त्याबद्दलची आपली चीड या कादंबरीत जागोजाग व्यक्त केली आहे. 'अमेरिकेअर' या संस्थेने काही हॉस्पिटल्सचे विलीनीकरण करून रुग्णसेवेचे बाजारीकरण केले; त्यामुळे रुग्णांना मिळणाऱ्या सेवेचा दर्जा खालावला, डॉक्टरही भाडोत्री बनले, पेशंटना लुटण्याचे नवे तंत्र विकसित झाले. त्याचे अत्यंत स्फोटक चित्रण या कादंबरीत बघायला मिळते. एका परीने अशा हॉस्पिटल्सवर चढवलेला हा मोठा हल्लाच आहे. काही वेळा एकांगी वाटावे असेही प्रसंग सर्वत्र पेरलेले आहेत.

**'अमेरिकेअर' या संस्थेने काही हॉस्पिटल्सचे विलीनीकरण करून रुग्णसेवेचे बाजारीकरण केले; त्यामुळे रुग्णांना मिळणाऱ्या सेवेचा दर्जा खालावला, डॉक्टरही भाडोत्री बनले, पेशंटना लुटण्याचे नवे तंत्र विकसित झाले.**

डॉ. रॉबिन कूक यांचे दुसरे लक्ष्य आहे ते रेस्टॉरंटसमध्ये पुरवल्या जाणाऱ्या प्रक्रिया केलेल्या मांसपदार्थांचा दर्जा हे! 'ओनियन रिंग'मधील हॅम्बर्गर खाल्ल्याने बेकी या तरुण मुलीच्या शरीरात मांसाद्वारे **इ-कोलाय ०१५७ : एच ७** हे टॉक्सिन प्रवेश करतात आणि ते तिच्या हृदयाभोवतीच्या पेरिकार्डियम या आवरणावर आणि हृदयाच्या स्नायूंवर हल्ला करून त्यांचा नाश करतात. हे टॉक्सिन हॅम्बर्गरमधील अर्धवट शिजवलेल्या मांसाद्वारे तिच्या शरीरात शिरलेले असणार अशी शंका डॉ. किम रेगीस याला येते आणि तो ज्या रेस्टॉरंटमध्ये ते हॅम्बर्गर खाल्लेले असते तेथील स्वयंपाकघराला तसेच, ते मांस जेथे ठेवण्यात येते त्या जागेला भेट देतो. 'मर्सर मीट्स. रजि. शून्य. एक. एल.बी. हॅमबर्गर पॅटी, जास्त स्नायू लॉट नं. ६, बॅच नं. ९-१४ उत्पादन जानेवारी १२. एप्रिल १२ पूर्वी वापरण्यास योग्य.' असे एक खोके त्याला तेथे दिसते.

ते त्याच दिवशी रेस्टॉरंटमध्ये आलेले असते; आणि आधी आलेल्या खोक्यातील पॅटी आधी वापरायच्या असा तेथील परिपाठ असतो. पण नव्यानेच कामाला लागलेल्या कर्मचाऱ्याने, या नव्या खोक्यातील पॅटी वापरायला काढल्याने त्याचा बॉस त्याला रागावतो. ती पॅटी ग्रिलमध्ये दुसऱ्या एका पॅटीवर पडून अर्धवट झाकली गेल्याने नीट शिजत नाही; आणि ती तशीच अर्धवट शिजलेली पॅटी



हॅम्बर्गरमध्ये टाकली जाते. बेकी ते हॅम्बर्गर खाताना त्याच्या मध्यभागी असलेली गुलाबी रंगाची पट्टी डॉ. किमला दिसते; ती कच्ची आहे हे त्याला जाणवते; पण तो त्यावेळी त्याकडे फारसे लक्ष देत नाही... आणि त्या कच्च्या राहिलेल्या पॅटीतूनच इ-कोलाय ०१५७ : एच ७ हे टॉक्सिन बेकीच्या आतड्यात शिरलेले असते.

डॉक्टर क्ष किरण फोटो बघतात तेव्हा त्यांना आतड्याच्या आतला म्युकोसा असणारा थर सुजलेला दिसतो; बेकीला ताप आलेला नाही त्या अर्थी हल्लेखोर जीवाणू अगोदरच तिच्या आतड्यातून गेलेले असणार हे स्पष्ट होते. रक्तामधील टॉक्सिनची तपासणी करण्याची सोय त्या 'अमेरिकेअर'च्या हॉस्पिटलमध्ये नसते... ही तपासणी महागडी असते. या टॉक्सिनवर अँटिबायोटिक्सचा उपयोग होत नाही. बेकीच्या रक्तवाहिन्यांमध्ये पट्टिकांच्या (प्लॅटेलेट्स) गुठळ्या बनतात; आणि लाल पेशींचा नाश होतो. त्याचा प्रतिकूल परिणाम अनेक अवयवांवर विशेषत: मूत्रपिंडावर होतो. हे टॉक्सिन पिसलेल्या मांसामुळे निर्माण होते; असे पिसलेले (ग्राउंड बीफ) मांस आतपर्यंत नीट शिजत नाही; संसर्गजन्य गायीच्या शेणाचा अन्नाशी संपर्क आल्याने गायीच्या आतड्यात या कोलायचे जीवाणू वास्तव्य करतात. सध्या शेती आणि पशुपालन यासाठी जी पद्धत वापरतात ती इ-कोलाय ०१५७ : एच ७ या टॉक्सिनच्या निर्मितीला कारण ठरते. प्राण्यांना स्वस्त दरातील प्रथिने पुरवण्याच्या हेतूने कत्तल केलेल्या प्राण्यांच्या अवयवांचा उपयोग केला जातो. गायीला गायीचेच मांस खायला देण्यात येते. कोंबड्यांपासून बनवलेल्या पेंडीचाही खुराक दिला जातो. प्राण्यांना अँटिबायोटिक्स देण्यात येतात; त्यामुळे प्राण्यांच्या आतड्यात अनेक प्रकारचे जीवाणू तयार होतात आणि पोटामधल्या पोकळीच्या अस्तराचा दाह होऊ लागतो. पोटात छिद्र पडत हे मांस खाल्लेल्या बेकीवर लगेच शस्त्रक्रिया करणे भाग पडते. ते छिद्र भरून यायला दोनचार आठवडे लागणार असतात... पण त्याआधीच तिला फार त्रास होऊ लागतो. श्वास घेणे जड जाते... तिच्या फुफ्फुसांवर परिणाम होतो. तिच्या रक्तातले ऑक्सिजनचे प्रमाण एकदम खाली येते. मूत्रपिंडे निकामी होतात. उदरकोशातून डायलिसिस करावे लागते. पण डायलिसिसचे यंत्रही त्या हॉस्पिटलमध्ये नसते. बेकीच्या यकृतातही बिघाड होतो... एकामागून एक अवयव निकामी होत जातात... तशात तिला पक्षाघाताचा झटका येतो; तिला दिसेनासे होते... कार्डियाक इफ्युजनमुळे टॅम्पोनेडची लक्षणे दिसू लागतात.

**प्राण्यांना स्वस्त दरातील प्रथिने पुरवण्याच्या हेतूने कत्तल केलेल्या प्राण्यांच्या अवयवांचा उपयोग केला जातो. गायीला गायीचेच मांस खायला देण्यात येते. कोंबड्यांपासून बनवलेल्या पेंडीचाही खुराक दिला जातो. प्राण्यांना अँटिबायोटिक्स देण्यात येतात; त्यामुळे प्राण्यांच्या आतड्यात अनेक प्रकारचे जीवाणू तयार होतात**

नफा वाढवण्यासाठी अमेरिकेअर ही संस्था समारिटन हॉस्पिटलमधला इमर्जन्सी विभाग बंद करून मुळातच गर्दी असणाऱ्या युनिव्हर्सिटी हॉस्पिटलमध्ये येणे पेशंटना भाग पाडते. हे हॉस्पिटल अमेरिकेअरच्या मालकीचे असते. तेथे पेशंटना हाताळण्याचे नियमही फायदा उकळण्याच्या दृष्टीने बनवलेले असतात. तेथे डायलिसिसची सोय नसते. प्लाझ्मा फोरेसिसला परवानगी नसते.

डॉ. किम रेगीस हा या थरारकथेचा अर्थातच नायक ठरतो. तो उत्तम कार्डिॲक सर्जन आहे. पेशंटचे हित हे त्याचे सर्वात महत्त्वाचे जीवनसूत्र. परंतु अमेरिकेअर या संस्थेने हॉस्पिटल विकत घेतल्यावर तेथे फायदा हा मुख्य उद्देश ठरतो. लागणाऱ्या खर्चिक उपकरणात कपात करण्यात येते. सोयीसुविधांमध्ये काटकसर सुरू होते. त्यामुळे डॉ. किमला तेथे नव्या वातावरणात काम करणे आत्मपीडक ठरते. परंतु तरीही तो आपले काम निष्ठेने करीत असतो.

'अमेरिकेअर'वर तो टीका करीत असतो. त्यामुळे त्या संस्थेचे संचालक व हॉस्पिटलचे प्रमुख त्याच्यावर रुष्ट असतात.

**डॉ. किम रेगीस हा या थरारकथेचा अर्थातच नायक ठरतो. तो उत्तम कार्डिॲक सर्जन आहे. पेशंटचे हित हे त्याचे सर्वात महत्त्वाचे जीवनसूत्र. परंतु अमेरिकेअर या संस्थेने हॉस्पिटल विकत घेतल्यावर तेथे फायदा हा मुख्य उद्देश ठरतो. लागणाऱ्या खर्चिक उपकरणात कपात करण्यात येते.**

आपल्या दहा वर्षांच्या मुलीच्या आजारपणात त्याच हॉस्पिटलमध्ये अक्षम्य हेळसांड होते; तो तेथे सर्जन असूनही त्याला तुच्छतेने, सर्वसामान्यासारखे वागवले जाते. त्यामुळे तो वैतागतो. चिडतो. सर्वांना फैलावर घेतो. त्यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती करतो... त्यामुळे त्याच्याबद्दलची नाराजी आणखीनच वाढते. रुग्णसेवा क्षेत्रातील अमेरिकेअर सारख्या संघटित बाजारीकरणाच्या विरोधात त्याचा आवाज त्यामुळे आणखीनच बुलंद होतो. टीव्हीवरील बातम्यांमध्ये त्याच्या या विचारांना काहीसे अतिरंजित रूप देण्यात येते.

डॉ. किम रेगीस आपल्या मुलीच्या आजारपणामुळे त्रस्त होतो; आणि त्या आजारपणाला कारण ठरलेल्या हॅम्बर्गरमधील पिसलेल्या मांसपट्टीच्या उत्पादकांच्या विरोधात तो दंड थोपटून उभा राहतो. दर्जानियंत्रणाच्या बाबतीत मर्सर मीट्स ही कंपनी पुरेशी दक्षता घेत नाही हे त्याच्या लक्षात येते. एक सामान्य कामगार म्हणून तो या कंपनीत काम करून, बेकीने खाल्लेल्या हॅम्बर्गरमधील मांसपट्टीच्या संदर्भातले रेकॉर्ड शोधून काढतो. मांसप्रक्रिया करणाऱ्या या कंपनीच्या कार्यपद्धतीची जी माहिती त्याला मिळते, ती कोणालाही हादरा देणारी अशीच असते.

ताजे व गोठवलेले मांस एकत्र पिसून, दळून निब्बर मांस व चरबी एकत्र करूने मऊ गोळा तयार केला जातो. मांस पिसून झाल्यावर ब्लेंडरमध्ये टाकले जाते. ग्राइंडरमधून ते बारीक केले जाते. ताजे मासं पाच दिवसांत वापरावे



लागते. ते पस्तीस डिग्रीखाली ठेवण्यात येते. ग्राइंडरमधून बाहेर पडलेले मांस पॅटी बनवणाऱ्या यंत्राकडे पाठवले जाते. त्यासाठी स्वतंत्र खोली असते. हे यंत्र रेग्युलर एकदशांश पौंडाच्या किंवा एक चतुर्थांश पौंडाच्या पॅटी बाहेर टाकते. त्या पॅटी पुढे द्रवरूप नायट्रोजन असलेल्या बोगद्यातून पुढे जातात आणि तेथे कमी तापमानाला गोठवल्या जातात. तेथून पुढे गेल्यावर हाताने उचलून खोक्यात भरल्या जातात... या सर्व बाबतीत कमालीची स्वच्छता बाळगण्यात येते. परंतु हे सर्व पाहूनही डॉ. किमची अस्वस्थता कायमच राहते. विशिष्ट पॅकमधील पट्टीवरून हे मांस कुठून आले याचा शोध घेता येतो का असा प्रश्न तो विचारतो; आणि त्यावर ही माहिती न देण्याचे कंपनीचे धोरण आहे असे त्याला सांगण्यात येते. मात्र अशा नोंदी ठेवल्या जातात; तशा नोंदी करण्याबाबत अमेरिकन सरकारच्या कृषिविभागाचा फतवाच असतो. त्यावर देखरेख करण्यासाठी त्या विभागाचा निरीक्षक अधूनमधून तेथे येत असते.

डॉ. किम तेथे जातो तेव्हा मार्शा बाल्डविन ही कृषिविभागाची प्रतिनिधी तेथे तपासणी करीत असते. डॉ. किम तिच्याशी नंतर चर्चा करतो. रेस्टॉरंटमधून मिळवलेला हॅम्बर्गर पट्टीच्या खोक्याचा क्रमांक देऊन तो तिला हे मांस कुठून आले असे विचारतो. या लॉटमधला माल कुठे कुठे गेला हे त्याला हवे असते; कारण ते मांस खाणाऱ्यांना बेकीप्रमाणेच त्रास होण्याची शक्यता आहे हेही तो स्पष्ट करतो. तिचा दंड पकडून तो म्हणतो, ''नियमांना आग लावा. लोकांचे रक्षण करण्यासाठी तुमची नेमणूक आहे. तशी संधी चालून आलेली आहे... मला तुमच्या मदतीची खूप खूप गरज आहे.''

**तो म्हणतो, ''नियमांना आग लावा. लोकांचे रक्षण करण्यासाठी तुमची नेमणूक आहे. तशी संधी चालून आलेली आहे... मला तुमच्या मदतीची खूप खूप गरज आहे.''**

मार्शा मदतीला तयार होते. अब्जावधी डॉलर्सची उलाढाल करणारा बीफ-गोमांस प्रक्रिया उद्योग राजकीय दबाव आणण्यातही अग्रभागी असतो हे ती मान्य करते... ती त्याला हवी ती माहिती देण्याचे मान्य करते. डॉ. किम तिला हॉस्पिटलमध्ये घेऊन आपल्या मरणासन्न मुलीचे दर्शन घडवतो. बेकीच्या हृदयाची हालचाल थांबल्याने डॉक्टर्स तिला मसाज करीत असतात. शॉक देऊन हृदयातल्या विद्युतक्रिया पुन्हा चालू करण्याच्या खटपटीत असतात. डॉ. किम म्हणतो, ''पुरेसा दाब देऊन मसाज करायला हवा. थांबा, मी बघतो...'' आणि त्यावेळी लक्षात येते की मसाजने हे काम होणार नाही. तो सरळ बेकीची छाती स्काल्पेलने चिरतो... रक्ताचा एक थेंबही बाहेर येत नाही... तो छातीच्या पोकळीत हात घालून हृदयाला मसाज देऊ लागतो... पण हृदयाचा पृष्ठभाग चिरडला जातो... बेकीच्या हृदयाच्या

मृत ऊती त्याच्या हाती येतात. टॉक्सिनने त्या खाऊन टाकलेल्या असतात...

मार्शा हे सर्व बघून सुन्न होते. बेकीची आई ट्रेसीही हताश होते. डॉ. किम उद्वेगाने, संतापाने तेथून बाहेर पडतो. ओनियन रिंग या रेस्टॉरंटकडे आपली कार सुसाट सोडतो. पण तेथे गेल्यावर मात्र तो स्वत:ला सावरतो...

मार्शाला घेऊन ट्रेसी घरी जाते. तेथे डॉ. किम तिला खुर्चीत बसलेला दिसतो... डॉ. किम रेगीसला मदत करण्याचे, त्या विशिष्ट पॅटीची रूम लॉगबुकातील नोंद बघून सांगण्याचे मान्य करते.

...अमेरिकेअर, मर्सर मीट्स यांच्या विरोधातील डॉ. किमचा संघर्ष मग वेग घेतो. त्याला हॉस्पिटलच्या कामात अडथळा आणल्याबद्दल, मर्सर मीट्समध्ये अनधिकृतपणे शिरल्याबद्दल पोलिस चौकीत जावे लागते.. आणखीही खूप काही घडते... डॉक्टर किमची हौशी गुप्तहेराची ही भूमिकाही कथानकातले ताणतणाव वाढवते.

डॉ. रॉबिन कूक यांची ही थरारकथा म्हणजे हॉस्पिटल्सचे संस्थात्मक बाजारीकरण, मांसप्रक्रिया उद्योग यांच्यावरचे जळजळीत टीका-अस्त्र आहे. कथानकात खूप तपशील येतात; घटना वेगाने घडतात त्या वेगाने कधी कधी वाचकांचा गोंधळही उडू शकतो. पण शेवटी जो संदेश ही कादंबरी देते, तो वाचकाला अस्वस्थ करणारा असतो.

**ही कादंबरी वाचल्यावर कुठल्याही रेस्टॉरंटमध्ये हॅम्बर्गर खाताना हात कापल्याविना राहणार नाही. मार्शा म्हणते, ''मी आधी अर्धीमुर्धी शाकाहारी होते. पण आता यापुढे कट्टर शाकाहारी झाले आहे.''**

ही कादंबरी वाचल्यावर कुठल्याही रेस्टॉरंटमध्ये हॅम्बर्गर खाताना हात कापल्याविना राहणार नाही.

मार्शा म्हणते, ''मी आधी अर्धीमुर्धी शाकाहारी होते. पण आता यापुढे कट्टर शाकाहारी झाले आहे.'' (१८९)

गाईगुरांच्या हाडांपासून कण न् कण मिळवण्यासाठी उच्च दाबाचा वापर करणारे यंत्र असते. त्याचा वापर केल्याने करड्या रंगाचा एक चिकट पदार्थ तयार होतो. त्याला लाल रंग देऊन तो हॅम्बर्गरमध्ये घालतात... त्याशिवाय प्राण्यांच्या मध्यवर्ती चेतासंस्थेचे भाग, पाठीच्या कण्यामधला भाग... हेही त्यात असतात. उष्णतेला दाद न देणारी प्रथिने तुमच्या शरीरात शिरतात आणि मॅड काऊ डिसीझप्रमाणे तुम्हाला खलास करतात. इंग्लंडमध्ये मॅड काऊ डिसीझ होण्याची जी कारणे आहेत ती अमेरिकेतही विद्यमान आहेत; बकऱ्यांचे मांस गाईगुरांना खायला घातल्याने स्क्रेपी नावाचा रोग बकऱ्यांमुळे गाईगुरांमध्ये येतो. **अमेरिकेत बकऱ्यांचे मांस गाईगुरांना खाऊ घालण्यास बंदी आहे; परंतु त्याची अंमलबजावणी कडकपणे होत नाही...** असे



तपशील जेव्हा येतात तेव्हा खरोखरच मांसाबद्दल आणि हॅम्बर्गरबद्दल शिसारी येते. मार्शासारखेच अनेक वाचकांना वाटू लागते. मांसाहाराबद्दल तिटकारा निर्माण होतो.

डॉ. रॉबिन कूक यांच्या या थरारकथेत या उद्योगाचे स्वरूप स्पष्ट करून त्यातील धोके दाखवले आहेत. एका परीने हे समाज जागृतीचेच काम आहे. थरारकथेच्या माध्यमातून आणि डॉ. किम रेगीसला हेरगिरी करायला लावून या कंपन्यांच्या कार्य-पद्धतीतील उणिवा व दोष वाचकांपुढे ठेवण्यात आले आहेत. अशा गौप्यस्फोटामुळे सरकारी यंत्रणा जाग्या होतात, चौकशी समित्या नेमतात आणि नवे कायदे करून गैरप्रकारांना आळा घालू पाहतात.

डॉ. रेगीस याची मुस्कटदाबी करण्यात येते, त्याला ठार मारण्याची सुपारी देण्यात येते; त्याला खोट्यानाट्या आरोपांवरून पोलिसांच्या ताब्यत देण्यात येते. एकीकडे आपल्या दहा वर्षांच्या गोड मुलीची मृत्यूकडे चाललेली वाटचाल त्याला असहायपणे बघावी लागते तर दुसरीकडे मृत्यूला जबाबदार असणाऱ्या रेस्टॉरंट-मर्सर मीट्स यासारख्या यंत्रणांशी त्याचा एकाकी संग्रामही चालू असतो. त्याच्या घटस्फोटित पत्नीची या प्रयत्नात त्याला साथ मिळते; तसेच मार्शासारख्या अधिकारी व्यक्तीही त्याच्या पाठीशी उभ्या राहतात.

मर्सर मीट्ससारख्या मोठ्या कंपन्या टेलिव्हिजनवर आपल्याला हव्या तशा सोयीच्या बातम्या पेरू शकतात; डॉ. किमसारख्या बिनबुडाचे आरोप करून त्याला बदनाम करू शकतात; आणि शेवटी सत्याला न्याय मिळतो असेही नाही...

**मर्सर मीट्ससारख्या मोठ्या कंपन्या टेलिव्हिजनवर आपल्याला हव्या तशा सोयीच्या बातम्या पेरू शकतात; डॉ. किमसारख्या बिनबुडाचे आरोप करून त्याला बदनाम करू शकतात; आणि शेवटी सत्याला न्याय मिळतो असेही नाही...**

डॉ. रॉबिन कूक याने मांसप्रक्रिया व्यवसायाविरुद्ध आणि संघटित वैद्यकीय सेवेतील बाजारीकरणाविरुद्ध जनजागृती करण्याचे उद्दिष्ट या थरारकथेच्या माध्यमातून साधण्याचा प्रयत्न केला आहे. कथानकात त्या दिशेने घटनाप्रसंग आणि व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. अमेरिकेतील मोठमोठ्या साखळी-रेस्टॉरंटमधील पदार्थ खाणे कितपत सुरक्षित आहे असा प्रश्न प्रत्येकाच्या मनात ही थरारकथा उत्पन्न करते; आणि यातच तिचे यश आहे. शेवट काहीसा अर्धवट सोडलेला आहे आणि तरीही थरारकथा आपल्याला काहीशी अगतिक करून सोडते. फास्ट फूड, संघटित वैद्यकीय सेवा आणि या सर्वांवर अंकुश ठेवणारे शासकीय विभाग या सर्वांबद्दलच संदेह निर्माण करण्यात 'टॉक्सिन' सफल होते.

**पृष्ठे : ३४४● किंमत : २५०रु. ● सभासदांना : १८८रु. ● पोस्टेज : २५रु.**




# सन्स ऑफ फॉर्च्युन

**जेफ्री आर्चर / अनु. अजित ठाकूर**

**जुळे भाऊ जन्मत:च वेगळे होतात आणि एकमेकांचे प्रतिस्पर्धी म्हणून गव्हर्नरपदासाठी समोर उभे ठाकतात.**

जेफ्री आर्चरच्या सन्स ऑफ फॉर्च्युन या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना अफलातून आहे असे जुळ्यांच्या ताटातुटीचे हिंदी चित्रपट पाहणाऱ्या भारतीय प्रेक्षकांना वाटणार नाही; परंतु जन्मत:च वेगवेगळ्या घरात गेलेल्या या दोन भावांची पुढची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वाटचाल ज्या प्रकारे जेफ्री आर्चरने रंगवली आहे, ती वाचकांना खिळवून ठेवेल अशी निश्चितच आहे.

कादंबरीच्या पहिल्याच पानावर कादंबरीच्या कथानकाची भावी दिशा करण्याचा जेफ्री आर्चरचा परिपाठ येथेही दिसतो.

''सुझाननं आइस्क्रीमचा गोळा लपकन् मायकेल कार्टराइटच्या डोक्यावर थापला. सुझान आणि मायकेल यांची ती पहिली भेट होती. **म्हणजे पुढे एकवीस वर्षांनी झालेल्या सुझान आणि मायकेल यांच्या लग्नात** जो करवला होता त्याच्या म्हणण्यानुसार या दोघांची पहिली भेट अशी झाली होती...'' पुढे वेगवेगळ्या कॉलेजमध्ये जाईपर्यंत माध्यमिक इन्शुरन्स कंपनीत अकाउंट एक्झिक्युटिव्ह होतो. सुझान हायस्कूलमध्ये शिक्षिका... या जोडप्याला जुळं होणार असं डॉक्टर ग्रीनवूड सांगतात तेव्हा मायकेल म्हणतो, ''बरं झालं, कमीत कमी एक प्रश्न तर सुटला.''

''कुठला प्रश्न?''

''म्हणजे एकजण रिपब्लिकन पक्षाचा होईल तर दुसरा डेमोक्रॅट पक्षाचा.''

पोटावर हात फिरवत सुझान म्हणते, ''यातलं काहीही होणार नाही असं मला वाटतं.''

परंतु मायकेलचे हे उद्गारही भविष्यसूचकच असतात हे पुढे स्पष्ट होते.

ज्या दिवशी सुझान बाळंतपणासाठी हॉस्पिटलमध्ये येते त्याच दिवशी



पस्तिशीतली रुथ डेव्हनपोर्टही बाळंतपणासाठी दाखल झालेली असते. दोनदा अकाली गर्भपात झाल्याने तिला मातृत्वाची ही शेवटचीच संधी आहे हे डॉक्टरांनी तिला बजावलेले होते. त्या हॉस्पिटलच्या विश्वस्त मंडळाची ती अध्यक्ष होती; पण हे तिसऱ्यांदा मिळालेले गरोदरपण व्यवस्थित पार पडावे म्हणून तिने अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन एक उत्तम नर्स हीदर निकॉल हिला दिमतीला घेऊन गर्भसंगोपनावर लक्ष केंद्रित केले होते...

त्या दिवशी या दोघी बाळंत होतात. आधी निदान केल्याप्रमाणे सुझानला जुळे होते. दोन्ही पुत्र. रुथला मुलगा होतो; पण तो जन्मत:च मृत असतो. नर्स हीदर निकॉल ही कोणाच्याही नकळत त्या मृत अर्भकाच्या पाळण्यात सुझानच्या एका मुलाला ठेवते आणि सुझानच्या एका मुलाच्या पाळण्यात ते मृत अर्भक ठेवते. ही अदलाबदल कोणाच्याही लक्षात त्यावेळी येऊ नये अशी दक्षता ती घेते.

सुझानकडील मुलाला नाव मिळते नॅथनील कार्टराइट.

रुथच्या मुलाला डेव्हनपोर्ट फ्लेचर अँड्र्यू असे नाव ठेवण्यात येते.

**तेथील वृत्तपत्रात या दोन्ही मुलांचे फोटो येतात, ते फोटो नर्स निकॉल बारकाईने बघते. दोघांचा जबडा वडिलांप्रमाणेच चौकोनी असतो. अँड्र्यूचे केस कुरळे, सोनेरी होते तर नॅटचे सरळ आणि काळसर. ही दोन्ही मुले आपापल्या कुटुंबांत वाढत राहतात.**

रॉबर्ट डेव्हनपोर्ट डॉ. ग्रीनवूड यांना म्हणतो, ''केनेथ, आम्ही तुमचे आयुष्यभर ऋणी राहू... हॉस्पिटलच्या नवीन प्रसूतिविभागासाठी हवा तेवढा पैसा देण्याचे आश्वासन मी प्रेस्टनच्या संचालक मंडळाकडून घेणार आहे...''

नर्स निकॉलला डॉ. ग्रीनवूड संधी बघून विचारतात, ''मला काय विचारायचं आहे, हे बहुधा तुला ठाऊक असेलच.''

ती उत्तर देते, ''हो सर, मला माहीत आहे.''

डॉ. ग्रीनवूड त्याबद्दल काय धोरण स्वीकारणार हे नंतर तिच्या लक्षात येते. रॉबर्ट डेव्हनपोर्ट तिला विचारतो, ''पुढे तुमचा काय विचार आहे?'' तेव्हा ती म्हणते, ''होय. तुमच्या कुटुंबात आया म्हणून काम करायला मला नक्की आवडेल.''

तेथील वृत्तपत्रात या दोन्ही मुलांचे फोटो येतात, ते फोटो नर्स निकॉल बारकाईने बघते. दोघांचा जबडा वडिलांप्रमाणेच चौकोनी असतो. अँड्र्यूचे केस कुरळे, सोनेरी होते तर नॅटचे सरळ आणि काळसर. ही दोन्ही मुले आपापल्या कुटुंबांत वाढत राहतात.

ते नोकरी-व्यवसायात स्थिर होऊनही अखेरपर्यंत एकमेकांना भेटणार नाहीत अशी काळजी लेखक घेतो.

शाळा, कॉलेज अशी प्रगती करत ही दोन्ही भावंडे आपापले कार्यक्षेत्र आणि प्रभावक्षेत्र निर्माण करतात. स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता दाखवतात.

नॅटची ओळख सिनेटर हॅरी गेट्सशी होते. नॅट शाळेत विद्यार्थीपरिषदेची निवडणूक लढवतो. तेव्हा त्याचे हितचिंतक हॅरी गेट्स त्याला निवडणुकीचा कानमंत्र देतात. ''फ्लेचर, मी माझी पहिली निवडणूक हरलो होतो. तेव्हा तूही तशाच चुका करू नकोस. पहिली गोष्ट म्हणजे तुझा प्रचार व्यवस्थापक...'' सिनेटरचाच मुलगा जिमी हा त्याच्या प्रचारव्यवस्थापकाची भूमिका बजावणार हे स्पष्ट होते. त्याबद्दल त्याची काही अपेक्षाही असते. अध्यक्षाला उपाध्यक्ष नेमायचा अधिकार असतो. जिमीला उपाध्यक्ष नेमले तर त्याला पुढे येल विद्यापीठात प्रवेश मिळणेही सुलभ जाईल- अशी सर्व व्यूहरचना सिनेटरच्या मनात असते. पुढे ते सांगतात, ''प्रथम आपला शत्रू वा प्रतिस्पर्धी कोण हे ठरवा. त्याचे गुणदोष ओळखा आणि आपले मित्र कोण हेही जाणून घ्या. मग प्रचाराला लागा. प्रचाराला किती दिवस आहेत यापेक्षा किती तास आहेत हे मोजा; आणि प्रत्येक तासाचा उपयोग करा. मतदार यादीचे विश्लेषण करा. आपण ज्यांना ओळखतो त्यांच्या नावापुढे लाल खूण करा... फ्लेचरला नक्की मत देणाऱ्यांच्या नावापुढे निळी खूण करा... नवीन मुलांवर पिवळी खूण करा... आपल्या समर्थकांचे धाकटे भाऊ जर खालच्या वर्गात असतील तर त्यांना तेथे प्रतिनिधी नेमून वर्गातील मते गोळा करायची व आपल्या मोठ्या भावाला तपशील द्यायचा. अशी कामगिरी त्यांच्यावर सोपवा.'' यासारखे रामबाण कानमंत्र खासदार देतात; आणि त्यांचा मुलगा जिमी हा एक उपजत प्रचार व्यवस्थापक असेच स्वत:ला मानून ती भूमिका भावी काळातही फ्लेचरच्या गव्हर्नरपदाच्या निवडणुकीपर्यंत मनोभावे पार पाडतो. स्वत: निवडणूक लढवायचे त्याच्या मनात कधीच येत नाही.

**''प्रथम आपला शत्रू वा प्रतिस्पर्धी कोण हे ठरवा. त्याचे गुणदोष ओळखा आणि आपले मित्र कोण हेही जाणून घ्या. मग प्रचाराला लागा. प्रचाराला किती दिवस आहेत यापेक्षा किती तास आहेत हे मोजा; आणि प्रत्येक तासाचा उपयोग करा. मतदार यादीचे विश्लेषण करा.**

कॉलेजमध्ये असतानाच रिबेकाशी नॅटचे प्रेमप्रकरण रंगते. तिला दिवस जातात; नॅट तिच्याशी लग्नाची तयारी दाखवतो. पण त्याचवेळी सैन्यभरतीसाठी त्याला बोलावणे येते, आणि १९६८ मध्ये तो सैन्यभरतीसाठी मुलाखतीला जातो. त्याची निवड होते. हवाईदलाचे प्रशिक्षण त्याला मिळते. व्हिएतनाम युद्धात तो पराक्रम गाजवतो. हेलिकॉप्टरमधून झाडावर पडतो. सार्जंट फोअरमनचे स्ट्रेचर ओढत सतरा दिवस तो व्हिएतनामच्या खेड्यातून चालत मैलांवरील



सायगाव येथे पोहोचतो. हॉस्पिटलमध्ये फोअरमनचा तीन दिवसांनी मृत्यू होतो. पण नॅट वाचतो. पूर्ण बरा होतो. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन त्याला व्हाइट हाऊसमध्ये बोलावून सत्कार करतात. अमेरिकेचे शौर्यपदक त्याला देण्यात येते. नॅटचे अपुरे राहिलेले कॉलेज शिक्षण पूर्ण करण्याची खास संधी त्याला मिळते. तेही नोकरीत सहा वर्षांचा बाँड देऊन... कॅप्टनचा पूर्ण पगार घेऊन...

नॅट परत विद्यापीठात हजर होतो. कॅप्टन नॅट कार्टराइट म्हणून त्याला सर्वजण आदराने वागवतात. हीरो मानतात. मुली तर त्याच्यावर जीव टाकतात. मात्र एक तरुण सू लिंग त्याला खडसावून म्हणते, ''तुला विद्यार्थीसभेचा अध्यक्ष व्हायचं आहे आणि केवळ मुलींबरोबर झोपणे हा तुझ्या प्रचाराचा एकमेव कार्यक्रम आहे.'' तेव्हा तो सांगतो, ''मी अध्यक्षपदासाठी उभा राहणार नाही... आणि आयुष्यात आजवर मी फक्त तीनच मुलींच्या सहवासात आलो आहे. यापेक्षा कोणी तसं म्हणत असेल तर माझी त्यांची ओळख करून दे. त्यांना भेटायला मला आवडेल... आणि तुझा हात तर मी रीतसर मागणी घालून, तुझ्या पालकांची परवानगी घेऊन, चर्चमध्ये विवाह करूनच हातात घेईन- तोपर्यंत कोरडाच राहीन...'' नॅटशी पुढे सू लिंग लग्न करते हे सांगायला नकोच!

**नॅट परत विद्यापीठात हजर होतो. कॅप्टन नॅट कार्टराइट म्हणून त्याला सर्वजण आदराने वागवतात. हीरो मानतात. मुली तर त्याच्यावर जीव टाकतात. मात्र एक तरुण सू लिंग त्याला खडसावून म्हणते, ''तुला विद्यार्थीसभेचा अध्यक्ष व्हायचं आहे आणि केवळ मुलींबरोबर झोपणे हा तुझ्या प्रचाराचा एकमेव कार्यक्रम आहे.''**

फ्लेचर कायद्याचा अभ्यास करीत असतो. त्याचे शिक्षक-मार्गदर्शक कार्ल अब्राहम्स वर्षात फक्त पाच व्याख्यानेच देतात. ते सरकार विरुद्ध अनिता कर्स्टेन केस चालवण्यासाठी फ्लेचरची निवड करतात. फ्लेचरची ती पहिलीच केस. न्यायाधीश विचारतात, ''माझ्या कोर्टात मान्य होईल अशी कायदेविषयक पदवी-पात्रता तुमच्यात आहे का?'' फ्लेचर म्हणतो, ''नाही... मी मेलमध्ये कायद्याच्या दुसऱ्या वर्षात शिस्त आहे. ही माझी पहिलीच केस आहे. माझे गुरु प्रो. अब्राहम्स.'' तेव्हा न्यायाधीश म्हणतात, ''मी व तुम्ही-यात एकच गोष्ट समान आहे. ती म्हणजे आपले गुरु...'' फ्लेचर खुनाचा आरोप असणाऱ्या मिसेस कर्स्टेनची ती केस चालवतो. ती निग्रो बाई आपल्या गौरवर्णीय नवऱ्याची हत्या करते; आणि पोलिसांना कबुलीजबाब देते. तिला वकील मिळत नाही. फ्लेचरची फीही कमी असते. म्हणून ती केस त्याच्याकडे आलेली असते... मिसेस कर्स्टेनने बीअरच्या बाटलीत क्युरारे हे विष घालून नवऱ्याचा मृत्यू घडवून आणलेला असतो... फ्लेचर ज्युरींपुढे आपल्या अशीलाची बाजू मांडतो... आपल्या

प्राध्यापकांशी त्याबद्दल चर्चा करतो. प्राध्यापक त्याच्या बाजूने कोर्टात पुढचा युक्तिवाद करण्यासाठी येतात. ज्युरींना त्या युक्तिवादामुळे निर्णय घेणे कठीण होते; आणि खटला नव्याने चालवण्याची सरकारची तयारी नसते. त्यामुळे अशिलाला मुक्त करण्याची फ्लेचरची मागणी न्यायाधीश मान्य करतात. ही पहिलीच केस अशी अभूतपूर्व ठरते.

आपापल्या करियरचा पाया अशा प्रकारे घालत हे दोघेही आपापल्या क्षेत्रात जम बसवून गाजत राहतात. राजकारणात निवडणुकांचा अनुभव दरवेळी नवीन काही धडे देत असतो; त्याचेही नमुने कादंबरीत दिसतात. निवडणुकीत गैरप्रकारही होत असतात; मतमोजणीतही घोटाळे होत असतात. व्यूहरचना करताना या सर्व बाबींकडे लक्ष द्यावे लागते.

फ्लेचरला अलेक्झांडर डू पॉंट अँड वेल या सॉलिसिटर्सच्या कंपनीत नोकरी मिळते; तीही खूप कसोशीच्या मुलाखतींच्या सत्रानंतर. ज्या दिवशी नोकरी मिळते त्याच दिवशी तो एका मुलीचा बापही झालेला असतो. वर्षभराच्या नोकरीनंतर त्याच्या लक्षात येते की कंपनीत भागीदारी मिळाली तरच चांगली प्राप्ती होऊ शकेल. एरव्ही नाही.

**फ्लेचरला अलेक्झांडर डू पॉंट अँड वेल या सॉलिसिटर्सच्या कंपनीत नोकरी मिळते; तीही खूप कसोशीच्या मुलाखतींच्या सत्रानंतर. ज्या दिवशी नोकरी मिळते त्याच दिवशी तो एका मुलीचा बापही झालेला असतो. वर्षभराच्या नोकरीनंतर त्याच्या लक्षात येते की कंपनीत भागीदारी मिळाली तरच चांगली प्राप्ती होऊ शकेल. एरव्ही नाही.**

नॅट मॉर्गन बँकेत परदेशी चलनाचे काम पाहतो. दहा लाख डॉलर्सचा निधी त्याच्याकडे हाताळण्यासाठी असतो. त्याच्या राजकीय पार्श्वभूमीमुळे त्याचा चलन बाजाराचा अंदाज इतरांपेक्षा नेमका असतो. ज्या दिवशी इतर बँकांनी डॉलर विकून पौंड घेतले, त्याच दिवशी नॅट वायदा बाजारात पौंड विकून टाकतो. त्याचे सहकारी त्याबद्दल त्याला व बँकेला नुकसान होणार म्हणून टाळू लागतात. नजर चुकवतात. पण एका महिन्यानंतर डॉलर्सचा भाव वाढत जातो आणि बँकेला तुफान फायदा होतो. इतर बँका नॅटला नोकरीसाठी मोठ्या पगाराच्या ऑफर्स देतात. नॅट आहे तीच नोकरी कायम ठेवतो. वर्षाच्या शेवटी त्याला आठ हजार डॉलर्सचा बोनस मिळतो. पत्नी सू लिंग हिला मुलगा होतो. नॅट तिला एक सुंदर चित्र पावणे सहा हजार डॉलर्स खर्चून भेट देतो. बोनसचा वापर तो नामवंत चित्रकारांची नवनवी पेंटिंग्ज घेण्यासाठी करतो.

एकदा फ्रँकचे अवमूल्यन होणार अशी कुणकुण लागते. फ्रेंच फ्रँक विका असा नॅट आदेश देतो. पण फ्रँकला ग्राहक मिळत नाही. सात टक्के फ्रँक



अवमूल्यन होते. बँकेचे पाच लाख डॉलर्सचे नुकसान होते. अनेक बँका दिवाळ्यात निघतात. नॅट राजीनामा देतो. आपले सामान घेऊन घरी येतो. त्याला हार्टफोर्ड येथील रसेल बँकेत उपाध्यक्ष म्हणून नोकरीची ऑफर येते.

सिनेटर हॅरी फ्लेचरला आपल्या मतदारक्षेत्रात उभे राहण्यास सुचवतो. सिनेटरचा मुलगा जिमी नेहमीप्रमाणेच निवडणूक प्रचार यंत्रणेचा व्यवस्थापक म्हणून काम करणार असतो. फ्लेचरच्या विरुद्ध मिसेस बार्बरा हंटर उभी असते. त्या दोघांच्या संयुक्त मुलाखतीचा कार्यक्रम होतो. टीव्हीवरून तो सर्वदूर पोहोचतो... त्या निवडणुकीच्या निमित्ताने अमेरिकेतील संसदीय निवडणुकीतले छक्केपंजे जेफ्री आर्चर नेमकेपणाने दाखवतो... निवडणुकीत तो २१२१६ विरुद्ध २१२१४ मतांनी निवडून येतो.

रसेल बँकेला एक घाईगर्दीच्या व्यवहारात ज्युलिया फर्क ब्रिज नावाची बाई छत्तीस लाख डॉलर्सला गंडा घालते... नॅट या प्रकरणात लक्ष घालून बँकेला वाचवतो. ते नुकसान भरून काढतो. तो प्रकल्प यशस्वी करून बँकेला फायदाही मिळवून देतो. त्यामुळे त्याचे नाव गव्हर्नरपदासाठी सुचवण्यात येते.

**नॅटचा खटला लढवण्यासाठी त्याचा गव्हर्नरपदाचा प्रतिस्पर्धी फ्लेचर याला पाचारण केले जाते. फ्लेचरही त्यासाठी राजी होतो... राल्फ इलियटला निवडणुकीत जिंकण्यासाठी स्वतःला गोळी लागल्याचे नाटक करायचे असते... त्यासाठी तो आपल्या पत्नीला गोळी झाडण्यास उद्युक्त करतो... दुर्दैवाने त्याचा मृत्यू होतो...**

बँकिंग क्षेत्र, राजकारण, प्रतिस्पर्ध्यांनी केलेले चारित्र्यहननाचे प्रयत्न हे सर्व यात येते. निवडणूक प्रचाराच्या दरम्यान नॅटवर या छत्तीस लाखांच्या फसवणुकीच्या संदर्भात प्रतिस्पर्धी इलियटकडून प्रश्न विचारले जातात; त्याच्या सू लिंग या कोरियन पत्नीच्या आईचा आधी गणिका पुरवण्याचा व्यवसाय होता वगैरे तपशील उघड केले जातात. त्यामुळे त्याचा सोळा वर्षांचा मुला ल्यूक आत्महत्या करतो.

नॅट संतप्त होऊन इलियटच्या घरी जाऊन त्याचा गळा धरतो. बंदूक उगारतो. पण तू जिवंत राहूनच यमयातना भोगायला हव्यात असे म्हणून राग आवरून तो परत फिरतो. तो दाराशी येतो तोच गोळीचा आवाज ऐकू येतो. राल्फने स्वत:वर गोळी झाडली असावी असे त्याला वाटते. पण नंतर पोलिस नॅटला पकडून नेतात... नॅटचा खटला लढवण्यासाठी त्याचा गव्हर्नरपदाचा प्रतिस्पर्धी फ्लेचर याला पाचारण केले जाते. फ्लेचरही त्यासाठी राजी होतो... राल्फ इलियटला निवडणुकीत जिंकण्यासाठी स्वत:ला गोळी लागल्याचे नाटक करायचे असते... त्यासाठी तो आपल्या पत्नीला गोळी झाडण्यास उद्युक्त करतो... दुर्दैवाने त्याचा

मृत्यू होतो... असे कोर्टात सिद्ध होते आणि नॅटची सुटका होते.

फ्लेचर आणि नॅट यांच्यातला हा पहिला संपर्क... परंतु त्यावेळीही त्यांना आपण भाऊ भाऊ आहोत हे ठाऊक नसते, ते दोघे गव्हर्नरपदासाठी एकमेकांचे प्रतिस्पर्धी म्हणून निवडणूक लढवण्याच्या दृष्टीने आखणी करीत असतात. एका बैठकीहून परतताना फ्लेचरच्या कारला अपघात होतो. त्याला रुग्णालयात दाखल केले जाते. तीन बरगड्या आणि घोट्याचे हाड यांना फ्रॅक्चर झालेले असते... फ्लेचरचा एबी निगेटिव्ह हा दुर्मिळ रक्तगट असल्याने इस्पितळात धावपळ होते. अपघाताची ती बातमी ऐकून नॅट लगेच इस्पितळात जातो. नॅटचे रक्त एबी निगेटिव्ह गटाचे असते; तो ते देण्यास तयार होतो. फ्लेचरचे प्राण वाचतात.

ज्या हॉस्पिटलमध्ये त्यांचा जन्म झाला होता; त्याच हॉस्पिटलमध्ये फ्लेचरवर उपचार चालू होते. तेथील डॉ. रेन्विक यांना नॅथनील व पीटर कार्टराइट यांची जन्माच्या वेळची ती फाइल मिळते. त्रेचाळीस वर्षांचे गुपित त्यांना कळते. डॉ. रेन्विक त्या दोघांना नंतर भेटीला बोलावतात आणि आपल्याला पडलेला नैतिकतेचा प्रश्न पेश करतात. "मी जी माहिती सांगणार आहे ती अतिशय गुप्त राहिली पाहिजे. अर्थात तुम्ही दोघांनी स्वेच्छेने वा ठरवून ती जाहीर केली तर गोष्टच वेगळी."

> **दुरावलेल्या दोन भावांच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील वाटचालीचा स्वतंत्र आलेख काढत, शेवटी त्यांना एकत्र आणल आहे; आणि यांच्यातील रक्ताच्या नात्यापेक्षाही 'व्यावसायिक' प्रतिमेला व स्पर्धेला झुकते माप दिले आहे. या दोघांच्या प्रेमप्रकरणांची, वैवाहिक जीवनाची आणि व्यावसायिक संघर्षाची ही नाट्यपूर्ण कहाणी वाचताना पुढे काय अशी उत्कंठा प्रत्येक क्षणी लागून राहते.**

"तुम्हा दोघांचे डीएनएचे नमुने तपासले... तुम्ही दोघे फक्त भाऊच नाही तर जुळे भाऊ आहात. डायझीगोटिक म्हणजे सारखे न दिसणारे जुळे आहात. तुमचे नैसर्गिक खरे आईवडील कोण, तुम्ही वेगवेगळ्या ठिकाणी कसे गेलात वगैरे प्रश्नांची उत्तरे तुम्हाला या फाइलमध्ये मिळतील."

ही वस्तुस्थिती जाणारी डॉ. ग्रीनवूडशिवाय एकच व्यक्ती होती. ती म्हणजे नर्स निकॉल... ती आणि डॉ. ग्रीनवूड दोघेही आता हयात नाहीत."

फ्लेचर म्हणतो, "आता भूतकाळ कशाला उकरून काढायचा?"

डॉ. रेन्विक त्यांच्या जन्माचा दाखला व ती फाइल श्रेडरमध्ये टाकून तिचे तुकडे करतात.

निवडणुकीत ते दोघे प्रतिस्पर्धी असतात.

मतमोजणी होते. फ्लेचर ८६०४ मते; नॅट कार्टराइट ८३७९ मते...



फेरमोजणीत मात्र मतांची बरोबरी होते... तेव्हा कनेटिकटच्या नियमाप्रमाणे छापकाटा टाकण्यात येतो. महापौर आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'माणसाला' म्हणतात : "नवीन गव्हर्नरसाहेब आपले सर्वप्रथम मी अभिनंदन करू का?"...

जेफ्री आर्चर स्वत: इंग्लंडमधील संसदेचे सदस्य असल्याने राजकारण आणि निवडणुका यांचे रहस्य त्यांना आता चांगले अवगत आहे. त्याचाच वापर करून त्यांनी शाळेपासून तो गव्हर्नरपदापर्यंतच्या राजकीय वाटचालीचा एक आलेखच जणू काढलेला आहे. दुरावलेल्या दोन भावांच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील वाटचालीचा स्वतंत्र आलेख काढत, शेवटी त्यांना एकत्र आणले आहे; आणि त्यांच्यातील रक्ताच्या नात्यापेक्षाही 'व्यावसायिक' प्रतिमेला व स्पर्धेला झुकते माप दिले आहे. या दोघांच्या प्रेमप्रकरणांची, वैवाहिक जीवनाची आणि व्यावसायिक संघर्षाची ही नाट्यपूर्ण कहाणी वाचताना पुढे काय अशी उत्कंठा प्रत्येक क्षणी लागून राहते.

**पृष्ठे : ५००● किंमत : ३५०रु. ● सभासदांना : २६३रु. ● पोस्टेज : २५रु.**


**टी बुक क्लब १४ची नोंदणी चालू!**

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

**सभासद फी ५०रु.**

**टी बुक क्लब १४ मधील पुस्तक उपलब्ध !**

**फॉर युअर आईज ओन्ली**




**किंमत : १२० रु.**

इयान फ्लेमिंग
अनुः अनिल काळे




**मूनरेकर**

**किंमत : १५० रु.**

इयान फ्लेमिंग अनु : उदय नारकर

**साऊथ बाय जावा हेड**




**किंमत : २५० रु.**

ॲलिस्टर मॅक्लीन
अनु : अशोक पाध्ये

**एकत्रित पोस्टेज ३० रु.**

**टी बुक क्लब १४ मधून प्रकाशित होणारी आगामी पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| ४. मयादा | जीन सॅसन | अनु. भारती पांडे |
| ५. द दा विंची कोड | डॅन ब्राऊन | अनु. अजित ठाकूर |
| ६. द लायन्स गेम | नेल्सन डेमिली | अनु. अशोक पाध्ये |

# समृद्ध अमेरिकेची वाचनसंस्कृती आणि आपण

**डॉ. सुवर्णा दिवेकर**

आता केलेली अमेरिकावारी ही माझी दुसरी वारी. पहिल्यांदा मी मिनेसोटा स्टेट मध्ये गेले होते आणि आताचा मुक्काम 'प्राईम अमेरिके'त म्हणजे न्यूयॉर्क, न्यू जर्सी, वॉशिंग्टन, बॉस्टन, कनेटिक, अशा ठिकाणी होतो. अमेरिकेतली अवघी समृद्धी, संस्कृती या भागात नांदते आहे. अमेरिका! विश्वातला प्रत्येक बाबतीत नंबर एकवर असलेला महादेश! अमेरिकेची समृद्धी, सुधारणा, शिस्तबद्ध जनजीवन, आलिशान गाड्या, मोटारी, उत्तुंग इमारती, विज्ञान हे जगज्ञात वास्तव आहे. परंतु जगातले सर्वोत्कृष्ट होण्यासाठी त्या त्या देशाला भौतिक गोष्टींखेरीज अनेक बाबींची गरज असते. त्यापैकी एक गोष्ट म्हणजे वाचनसंस्कृती.

अमेरिकेतली वाचनसंस्कृती अतिशय समृद्ध आहे. वाचनसंस्कृतीच्या ऱ्हासाचे खापर पाश्चात्त्य जगावर फोडून आपण आपली कमतरता दुसऱ्यावर सोयीस्करपणे ढकलतो आहोत, असे मत तिथल्या समृद्ध वाचनसंस्कृतीच्या दर्शनाने झाले.

वाचनापैकी सर्वसामान्य माणसांना जवळचा किंवा आवश्यक वाटणारा प्रकार म्हणजे वृत्तपत्रे. 'न्यूयॉर्क टाईम्स' म्हणजे वृत्तपत्रांचा राजा. रविवारची मुख्य पुरवणी शंभर पानांची आणि किंमत साडेतीन डॉलर्स. रविवारच्या चर्चभेटीनंतर अमेरिकन्स आवडीने आणि सवडीने न्यूयॉर्क टाईम्स वाचणार. तर भारतीय माणूस (त्यातूनही नव्याने एनआरआय झालेला) साडेतीन डॉलर्स इतकी महागाई न पटून या महापेपरच्या फारसा वाटेस जात नाही. अमेरिकेतला प्रत्येक पेपर सुबक प्लॅस्टिक बॅगमधून पहाटे तीन वाजताच दाराशी असतो. एखाद्या दारापाशी काही किंवा कित्येक दिवस न उचललेली पेपर्सची पाकिटे दारापाशी दिसतात. पण दुसरी कुठलीही व्यक्ती पेपर उचलत नाही. ढीग वाढत जातो किंवा कधी उचलला जातो. प्रत्येक 'स्टेट'मध्ये एक-दोन महावृत्तपत्रे असतात. त्यातल्या पुरवण्या अतिशय परिपूर्ण असतात. किंमत वाजवी असते. इंटरनेटवर बुकिंग-बिलिंग (किंवा कॅन्सलिंग) होते. मुख्य पेपर्स किंवा पुरवण्यांमधून जाहिरातींनी जागा अडवलेली नसते. जाहिरातींची पत्रके किंवा बुकलेट्स स्वतंत्रपणे येतात. आपण ज्या देशात राहतो, राहणार असतो, तिथले राजकारण-समाजकारण-साहित्य-संस्कृती-व्यक्ती-स्थिती दाखवणारा आरसा म्हणजे वृत्तपत्रे. तरीही अमेरिकेत गेलेली ७५% मराठी कुटुंबे अमेरिकन पेपर्स विकत घेत नाहीत. वाचत नाहीत. या बाबत काहीजणांशी बोलल्यावर 'वेळ नाही- रस नाही- आपल्या त्या



देशाशी काय करायचे? महाग वाटतो-' इथपासून 'रद्दी विकली जात नाही' इथपर्यंतची उत्तरे मिळाली. आणि परत एकदा आवश्यकतेखेरीज (नोकरी) अमेरिकन जनजीवनात फारसे न मिसळता भारतीय, त्यातही मराठी-तामिळ-गुजराथी-पंजाबी असे स्वतंत्र कळप करून राहतात या निष्कर्षाला पुष्टी मिळाली.

अमेरिकेत 'बार्न्स अॅन्ड नोबल्स' ही पुस्तकांची साखळी पद्धतीची बुक-स्टोअर्स (कम लायब्ररीज) म्हणजे वाचनाचा अतिशय श्रीमंत अनुभव असतो. मला तो अनुभव घेता आला, हे मी माझे भाग्य मानते. अतिशय प्रशस्त वातानुकूल दालन (बहुतेककरून मॉलमध्ये असते.) आणि अत्यंत आकर्षक सजावट असलेल्या बार्न्स अॅन्ड नोबल्समध्ये सर्वांना मुक्त प्रवेश असतो. वेळ सकाळी ९ ते रात्री ९. कितीही वेळ बसा. हवा तेवढा वेळ वाचन करा. हवे ते पुस्तक विकत घ्या किंवा नका घेऊ. एरो टेक्नॉलॉजीपासून कुकरीपर्यंतची सर्व विषयांवरची (सर्व) इंग्रजी भाषेतली पुस्तके अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने रॅकवरती मांडलेली असतात. अमेरिका 'माणसांवर विश्वास' या सूत्रावर विश्वास ठेवते. आणि माणसेही तो विश्वास सार्थ करतात. त्यानुसार बॅगचेकिंग तपासणी असे काहीही होत नाही. जगातले यच्चयावत ज्ञान आणि ललित साहित्य इथे उपलब्ध आहे. कुठलेही किंवा कुठलीही पुस्तके घ्या आणि सोफ्यांवर निवांत बसून वाचा. नोट्स घ्या. रिलॅक्सेशन (किंवा भुकेसाठी) कॉफी अॅन्ड स्नॅक्स शॉप स्टोअर्स मध्येच असते. मुलांसाठी तर असंख्य पुस्तके आणि खेळणी सुद्धा. अमेरिकन वाचन जागरूक पालक मुलांना घेऊन निश्चितपणे या शॉपमध्ये येतात. मात्र! इथेही मराठी माणसे अगदी विरळाच दिसतात. आमच्यासारखे पाहुणेही कमीच. इंडियन स्टोअर्स, इंडियन हॉटेल्स आणि इंडियन सिनेमा कॅसेट्सच्या दुकानांतून दिसणारी गर्दी 'बार्न्स अॅन्ड नोबल्स' मध्ये का दिसू नये? (मी अमेरिकन थिएटर्स पाहावे या उद्देशाने तिथे 'सलाम-नमस्ते' पहायला गेले होते. तिथे मात्र अनेक भारतीय कुटुंबे आली होती.) खरोखरीच ज्ञानगंगा (किंवा 'विजडम हडसन' म्हणा) वाहते आहे, त्यात पवित्र होणे न होणे आपल्याच हातात असते.

प्रकाशन संस्थांची कार्यालये आणि कारभारही सुनियोजित. अनेकदा लोकप्रिय लेखक/लेखिका प्रकाशन संस्थेत उपस्थित असतात. आणि पुस्तकांवर स्वाक्षरी करून पुस्तक विक्रीस प्रारंभ करतात. त्यावेळी अमेरिकेत वाचक रांग लावून पुस्तके विकत घेतात. (अर्थात लेखक आणि पुस्तक त्या तोडीचे हवे.) कधी कधी 'बार्न्स अॅन्ड नोबल्स'मध्ये किंवा एखाद्या कॉफी-शॉपमध्येही असा कार्यक्रम असतो. लेखकाची प्रकट मुलाखतही होते मात्र अशा कार्यक्रमाला भारतीयांची उपस्थिती कमीच. अमेरिकेतर जपानी (अलीकडे इंग्लिश शिकलेले) आणि युरोपियन्स वाचन संस्कृतीत सामावून जातात.

मात्र भारतीय (मराठी) जनतेची मुळे अद्याप इकडेच असल्याने (चांगलेच आहे) भारतातून आणलेली पुस्तके आणि इंटरनेटवरचा टाईम्स-सकाळ-लोकसत्ता (ते संध्यानंद) वाचनात इंटरेस्ट जास्त आहे. साहजिक आहे. (पण त्या खेरीज आपण ज्या जगात राहतो त्याची माहिती घ्यायला काय हरकत असावी?) इंडियन एक्सप्रेस गटाची सर्व वृत्तपत्रे, पुरवण्या हार्ड कॉपी रूपात उपलब्ध असल्याने (९९ डॉलर्स लाईफ मेंबरशिप

फॉर इंडियन एक्सप्रेस) बरेच भारतीय हे पेपर्स घरी विकत घेऊन वाचतात. मात्र इंडियन स्टोअर्स मधून मराठी मासिक किंवा मराठी पेपर उपलब्ध नाही. कारण ग्राहक नाही. याउलट ग्राहक भरपूर आहे, म्हणून 'मल्याळम् मनोरमा' हे मासिक आणि मल्याळी तामिळी पेपर्स तेथे उपलब्ध आहेत. न्यूजर्सीतून तर गुजराथी डेली पेपर निघतो आणि गुजराथी पुस्तकेही तिथे उपलब्ध आहेत. कारण आपली प्रादेशिक भाषा जपण्याची आणि त्यासाठी खर्च करण्याची त्यांची इच्छा आहे. मात्र 'मराठी जपण्याची' इच्छा मराठी समाजाची आहे. ती फक्त शब्दश: बोलण्यापुरती आणि बोलीभाषेपुरती. आज अमेरिकेत सॉफ्टवेअर कंपनीतर्फे लाँग टर्म असाइनमेंटवरती अनेक तरुणतरुणी अमेरिकेत वास्तव्य करून आहेत. बरेच ठिकाणी एकाच परिसरात (कॉप्लेक्स) जवळजवळ अपार्टमेंट्स, घरे घेऊन राहतात. मात्र समाईकपणे एखादा पुस्तक ग्रुप केला आहे, असे दिसत नाही. (वेळ नाही यापेक्षाही डॉलर्स खर्च करण्याची इच्छा नाही.)


समृद्ध अमेरिकेतल्या समृद्ध लायब्ररीज (प्रत्येक एरियात) या 'फ्री' असतात. प्रशासनामार्फत यांचा कारभार होतो. तीन ते चार मजली भव्य, वातानुकूल इमारत, बसण्यास आरामदायी आसनव्यवस्था, कॉम्प्युटर्स आणि इंटरनेटची मोफत सुविधा. शिवाय सीडीज उपलब्ध. जगभरातली यच्चयावत इंग्रजी पुस्तके उपलब्ध असतात. डायरेक्ट रॅकवरून काढा. वाचा. हवी तर कॉम्प्युटर्सवर टिपणे काढा. हवी तेवढी पुस्तके घरी नेता येतात. परत करण्याला मुदत नाही. हवे ते पुस्तक इंटरनेटवरून नोंदवू शकता. पुस्तक ताबडतोब मागवले जाते. तशी ई-मेल नोंददात्याला केली जाते. पुस्तके परत करताना पोस्टबॉक्स सारख्या बॉक्समध्ये टाकली तरी जाते. (कोडिंग असते.) लायब्ररीमध्ये 'स्टाफ' अगदी मोजका. तरीही शिस्तबद्ध कारभार. या लायब्ररीजचा उपयोग बहुतेक भारतीय करतात. (फ्री + सोय + इंग्लिशवरती प्रभुत्व...) अलीकडे दहा वर्षांत तिकडे गेलेल्या लोकांची भारतातली वाचन संस्कृती इंग्रजीचे (९०%) असल्याने तिकडेही ते इंग्रजीच वाचतात. मात्र त्यापूर्वी गेलेल्या भारतीयांना मात्र उत्तम मराठी वाचावे असे वाटते. मात्र नेमके काय वाचावे? कुठले वाचावे? सध्याचा वाङ्मयीन प्रवाह कोणता? याबद्दल मात्र संभ्रम आहे. पु.ल. किंवा व.पुं.च्या नंतर मराठी साहित्यातली वाटा वळणे त्यांना ठाऊक नाहीत. मी महाराष्ट्र मंडळाचा एक कार्यक्रम जॉईन केला. आणि एका छोट्या मराठी ग्रुपमध्ये माझाही एक साहित्यविषयक कार्यक्रम केला. त्यामुळे मला ही निरीक्षणे नोंदवता आली. मी नवीन साहित्य प्रवाहांची, क्रॉसवर्ड सारख्या दुकानांची, अद्ययावत प्रकाशन संस्थांची, हाऊस मॅगझिनची आणि इंटरनेट सेवेची माहिती दिली. इंटरनेट शॉपिंग वरून पुस्तके खरेदी करण्याची उत्सुकता मराठी श्रोत्यांमध्ये दिसली.

काळाची पावले ओळखून नियोजनपूर्वक ग्रंथनिर्मिती-प्रसार करणाऱ्या संस्थांसाठी आशादायक चित्र आहे हे निश्चित. शिवाय उत्तम मराठी ग्रंथ इंग्रजीत आणले गेले, तर मराठी सीमापार पोहोचेल आणि विश्वपरिचित होईल. हे आवाहन कोण घेणार? एवढाच प्रश्न आहे. ❒



# केतकरवहिनी उमा कुलकर्णी

**गेल्या शतकातील स्त्री-जीवन आणि तिची आंतरिक शक्ती यांचं मनोज्ञ दर्शन घडवणारी वास्तव कहाणी!**




गेल्या शतकाचा पूर्वार्ध. स्त्री-शिक्षणाची सुरवात.
शहरातली एक मुलगी लग्न करुन कोकणातल्या एका दुर्गम खेड्यात गेली, उराशी सुंदर संसाराची स्वप्नं बाळगून.
कडू-गोड अनुभवांमधून जाताना तिच्या जीवनात वादळ आलं आणि मग सुरू झाला तिचा प्रतिकूल परिस्थितीशी झगडा. त्यातच मिसळली कायद्याची लढाई!
ज्या कायद्याच्या लढाईत पतीची हत्या झाली, त्या युद्धभूमीला पाठ न दाखवता यशस्वीपणे लढत-झगडत राहणाऱ्या केतकरवहिनींची कहाणी!
उमा कुलकर्णींच्या ओघवत्या शैलीत, त्यांची पहिलीच स्वतंत्र कलाकृती.

# सार्धंसुधं...

## भातुकलीच्या खेळामधली...

प्रमोदिनी वडके-कवळे

नुकतीच एक बातमी वाचली. कॅनडात एका दहा वर्षाच्या मुलीने आपल्या तीन वर्षाच्या भावाला पोहोण्याच्या तलावात फेकून दिले. कारण काय तर म्हणे त्याने तिची आवडती डिश फोडली. त्या मुलीने असा दुष्टपणा करायला नको होता हे खरंय, पण तरीही मला तिचं हे कृत्य अगदीच असमर्थनीय वाटलं नाही. कारण लहानपणी माझ्या हातूनही अशा प्रकारचं वर्तन घडलं होतं. .

मध्यमवर्गी घरात सरसकट कल्हई केलेली पितळी भांडी वापरली जाण्याचे ते दिवस. त्या दिवसात मला मामांनी कौतुकाने स्टीलची छोटी ताटली दिली होती. त्या चकचकीत ताटलीवर माझा फार जीव होता. माझ्या धाकट्या बहिणीला पण ती ताटली फार आवडायची. ती त्यातच जेवण्यासाठी हट्ट धरून बसायची. आणि लहान असल्यामुळे साहजिकच आईही तिला त्याच ताटलीत वरणभात द्यायची. मात्र मी हट्ट धरला की, अग कुठच्याही ताटात जेवलं तरी जेवण तेच गं अशी समजूत घातली जायची. शेवटी एक दिवस चिडून मी तीच ताटली तिच्या अंगावर जोराने फेकून मारली. तिच्या गालावर त्या ताटलीची कोर लागून खोक पडली. भरपूर रक्त गेलं. रक्ताची भीती वाटत होती तरी, मी तिच्याभोवती नाचत माझी ताटली घेतलीस ना म्हणून देवाने तुला शिक्षा दिली. घेशील पुन्हा माझी ताटली? असं चिडवलं.

अजूनही तिच्या उजव्या गालावर ती जन्मखूण आहे.

आपल्या जन्माबरोबर आपलं नातं जसं माणसांशी जडतं तसंच ते घराशी घरातल्या वस्तुंशीही जडतं. विशेषतः भांड्यांशी!

कारण भांडी हा अन्न - वस्त्र - हवेइतकाच आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. लहान मुलं आपली दुधाची वाटी चमचा बरोब्बर ओळखतात. कारण त्या इवल्याशा वस्तूंशी त्यांचं भुकेचं नातं जडलेलं असतं.

संसार म्हणजे काय याची जाण यायच्या आधीपासून मुली भातुकलीच्या खेळात रंगून जातात. दाण्याची पोळी आणि पोह्याचा भात असल्या लुटुपुटीच्या सैंपाकासाठी त्यांना चिमुकली का होईना, पण खरीच भांडी लागतात.

भांडी! लक्षात येत नाही पण प्रत्येकाच्या आयुष्यातलं महत्त्वाचं स्थान पटकावलेलं असतं अशी जीवनावश्यक वस्तू.... कारण सर्वसंग परित्याग करून माणूस विजनवासात निघून गेला तरी. कमंडलूच्या रूपाने भांडं त्याची साथ देतंच.



आपल्या व्यसनापुढे जिवलग माणसांचीही फिकीर न बाळगणाऱ्या मद्यप्याला या भूतलावरची सर्वात प्यारी चीज असते चषक! दारूचा प्याला.

भांड्याला पर्यायी शब्द आहे पात्र..

हाच शब्द नदीच्या विस्तारालाही वापरला जातो. त्यामागची व्युत्पत्ती मला ठाउक नाही. पण या दोन्हीच्या अर्थात मात्र मला साम्य जाणवतं. नदीचं पात्र जे जे प्रवाहाबरोबर वहात येईल ते ते क्षमाशीलपणे आपल्या उदरात सामावून घेतं. भांडीही तेच करतात. .

म्हणूनच धातू बदलला तरी भांड्यांच्या परंपरेचा हा प्रवाह पुढे पुढे वहातोच आहे.

वैभवाच्या, संस्कृतीच्या, स्मृतींच्या आणि सौंदर्याच्याही खुणा बरोबर घेऊन !

माझं लग्न ठरलं तेव्हा मी पुण्यात होस्टेलला रहात होते. माझं सासरही पुण्यातच. साहजिकच सणासुदीला 'घरचं बोलावणं ' यायला लागलं. माझ्या सासुबाई अतिशय सुगरण होत्या. वेगवेगळे पदार्थ करण्याची आणि ते सगळ्यांना पोटभर खाउ घालण्याची त्यांना फार हौस होती.

एकदा कसल्या तरी सणाला त्यांनी मला दुपारी जेवायला बोलावलं. पण नेमकी त्या दिवशी मला सुटी नसल्याने मला जेवायला जाता आलं नाही. संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर मी घरी गेले.

हं आता जराशी खीर तरी खाऊन जा. हं म्हणत सासुबाई लगबगीने सैंपाकघरात गेल्या. त्या दिवशीचं पक्वान्न होतं खीर.

मला वाटलं काचेच्या बाउलमधे नाहीतर स्टीलच्या वाटीत त्या थोडीशी खीर आणून देतील. पण त्या बाहेर आल्या तेव्हा त्यांच्या हातात लहानशी ताटली होती आणि त्यात पितळेचा छोटा वाडगा.

ही खीर मला एकटीला? मी घाबरून विचारलं.

मग काय झालं? 'वाटीभर' तर आहे. दणकून खावंप्यावं चांगलं म्हणजे तब्येत सुधारेल. सासूबाईनी (त्यांच्या मते ) आरोग्याची गुरूकिल्ली सांगितली.

वाडग्याच्या आकाराची ती 'वाटी' बघून माझं धाबंच दणाणलं. होस्टेलवर राहून आवडेल तेवढंच खाण्याची आणि न आवडलेल्या पदार्थाचा पंगतीतच जाहीर पंचनामा करण्याची सवय लागली होती. मी या घरातली भावी सून असल्याने इथे तीही मुभा नव्हती. अर्थात नावं ठेवण्याची गरजही नव्हती म्हणा. . दूध आटवून आणि गूळ- जायफळ घालून केलेली खमंग वासाची खीर माझ्या नाकाला आमंत्रण देत होती खरी, पण एवढी सगळी खीर संपवायला हवी या कल्पनेने पोटात मात्र भला मोठा खड्डा पडला होता.

लग्नानंतर लक्षात आलं, पितळेच्या त्या भरभक्कम वाट्या म्हणजे आमच्या

घराण्याची शान आहे. माझ्या सासूबाईचं नाव अन्नपूर्णा ! ते सार्थ वाटावं अशीच चव होती त्यांच्या हाताला. . आणि सासऱ्यांना खाण्या-खिलवण्याची फार आवड. सासूबाईनी केलेला चविष्ट पदार्थ छोट्या छोट्या वाटीत वाढला की तो लगेच संपतो. आणि पाहुणा संकोची स्वभावाचा असेल तर दुसरी वाटी ठीक आहे, पण तिसरी आणि त्यापुढच्या वाट्या मागणं त्याला फार अवघड जातं. हे लक्षात घेऊन माझ्या सासऱ्यांनी मुद्दाम अशा वाडग्याच्या आकाराच्या पंचवीस वाट्या बनवून घेतल्या होत्या. आणि त्यावर स्वतःची नावं कोरली होती. ती नावंही त्या वाट्यांना शोभतील अशा मोठाल्या अक्षरात आणि 'शांताराम रावजी कवळे' अशा संपूर्ण स्वरूपात होती.

भांड्यासारखंच भांड्यावरच्या या नावाचंही एक वेगळं महात्म्य आहे. फार पूर्वी तांब्यापितळेच्या भांड्यांवर नावं घालण्यासाठी ठराविक प्रकारचे खिळे असायचे. . आणि त्या खिळ्यांनी नांवं घालणं हे खास कौशल्याचं काम समजलं जायचं ते कुणाही येरागबाळ्याला जमायचं नाही. तन्मयतेनं भांड्यावर नाव घालणारा कारागिर आणि त्या खिळ्यांची एका लयीत चाललेली ठकठक हे मामाच्या दुकानातलं नेहमीचं दृश्य होतं. पुढे नावं घालण्याचं मशीन आलं आणि टिर्रर्र असा आवाज करीत कोणीही सोम्यागोम्या नाव घालायचं काम करू लागला. पण तरी ही मामाच्या दुकानात येणारी कितीतरी गिऱ्हाईकं लग्नाकार्यात भेट द्यायच्या भांड्यावर नावं घालण्यासाठी खिळ्याचाच वापर करण्याचा आग्रह धरायची. आणि मग त्या कारागिराला बोलावून आणावं लागायचं. त्यावेळी त्या कारागिरासाठी उडणारी मामाची धांदल मी जवळून पाहिली होती

एखाद्या अढळ शिलालेखासारखी भांड्यावर कोरलेली ही नावं.. ती मालकी हक्क तर जाणवून देतातच, पण आठवणी आणि भावनांची साक्षीदारही होतात. अगदी गेल्या दशकापर्यंत लग्नाकार्यात तांब्यापितळेचीच भांडी आंदण म्हणून दिली जात. त्या भांड्यांच्या आकारास्वरूपावरून देणाऱ्याची सांपत्तिक स्थिती आणि वधूशी असणाऱ्या नात्यातली जवळीक समजून यायची. आंदणाच्या भांड्यांवरची नावं अगदी लग्नपत्रिकेच्या मजकूरासारखीच ठराविक छापाची असायची....श्री मुरलीधर नारायण जोशी यांजकडून चि. सौ. का. शालिनी हिस, शुभविवाहानिमित्त सप्रेम भेट.

दिनांक १५।०२।१९६८ माघ शुद्ध नवमी. .

एवढं साग्रसंगीत नाव घालायचं म्हणजे त्याखालचा पृष्ठभागही तसाच ऐसपैस हवा. म्हणूनच हंडा, घडा अशा मोठमोठ्या भांड्याचा विचार आंदणासाठी केला गेला असावा की काय. . अशी मिश्कील कल्पना कधीकधी मनात येऊन जाते.

आंदणाच्या भांड्यात सासरी नांदणाऱ्या मुलीच्या सुखाचाच विचार प्रामुख्याने केला गेला असावा. कारण विहीरीवरून पाणी भरण्याच्या त्या अवघड काळात



माहेरची हंडाकळशी एखाद्या मैत्रिणीसारखी वाटत असेल यात शंकाच नाही. शिवाय अशी मोठमोठी भांडी आंदणात देताना जशी माहेरची सुस्थिती दर्शवली जायची, तशीच आमची मुलगी लेचीपेची नाही. एवढ्या मोठया हंड्याने पाणी भरण्याइतकी तिची तब्येत ठणठणीत आहे. हेही सासरच्या माणसानाही अप्रत्यक्षरीत्या सुचवलं जायचं.

वैभवाचं प्रदर्शन करण्यासाठी भांडी हे आज बदललेल्या युगातलंही सर्वमान्य साधन आहे. भले ती भांडी तांब्यापितळेची नसतील, पण आजही न्युप्लस किचनच्या जमान्यातली सॉफ्टवेअर कंपनीत नोकरी करणारी आणि जीन्स-टीशर्ट घालणाऱ्या गृहिणी सुद्धा माझ्याकडे अमक्यातमक्या कंपनीची वेअर्स आहेत अशा बढाया मारायचा मोह आवरत नाही. आणि तारांकित हॉटेलमधे होणारे घरगुती समारंभ अंगवळणी पडलेले असूनही केळवणाला आम्ही हे हॉटेल बुक केलंय. कारण तिथे चांदीच्या ताटातली पंगत असते. हे वाक्य ऐकणाराच्या मनावर जादू करून जातंच.

आमच्याकडे भांडी घासायला येणाऱ्या सरस्वतीचं अवघं विश्वच या भांड्यांभोवती गुंफलेलं होतं. नवऱ्याचं नाव घेतानाही हंड्यावर हंडे सात..त्यावर ठेवली परात.. 'हा तिचा आवडता उखाणा! ती म्हणायची 'जिची भांडी लखलखीत आणि भाजी झणझणीत तीच बाई खरी सुगरण.'

सुगृहिणीपदासाठीचे हे निकष आजच्या जमान्यातल्या गृहिणीना परवडणारे नसले तरी, लखलखीत भांडी हा मात्र अजूनही कित्येक घरांचा मानबिंदू आहे. म्हणूनच 'वर्षभराची भांड्याची पावडर फ्री' हे बक्षीस कुठल्याही बाईला मोहवून जातं.

भांड्यांबद्दल विचार करायला लागल्यावर लक्षात आलं घरातल्या वेगवेगळ्या भाड्यांशी एखाद्या जिवलग माणसारखे बंध जुळलेले असतात आपले सहज म्हणून भांड्यावर लेख लिहायला घेतला आणि एक मोठ्यातून छोटं भाडं निघावं तशा भाड्यांबद्दलच्या कितीतरी आठवणी बाहेर आल्या

आजवर न जाणवलेली आणखी एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे माझ्या बालपणीच्या आणि आजोळच्या आठवणीत भांड्यांना फार महत्त्वाचं स्थान आहे. आजेळी पोचले की, आधी मी सैपाकघराच्या मागच्या बाजूला असलेल्या अंधाऱ्या खोलीत जायची. तिथे एका लाकडी शेल्फमधे सगळे डबे ठेवलेले असायचे. त्यामुळे त्या खोलीत पाय टाकताच लाडवाच्या गोड , चिवड्याच्या तिखट आणि शंकरपाळ्यांच्या तुपकट वासांचं मिश्रण नाकाला जाणवायचं. हे सगळे जिन्नस मोठाल्या पितळी डब्यात ठेवलेले असायचे. आणि त्या डब्यांच्या झाकणांना जुन्या लाकडी दरवाजांना असतो तसा भक्कम कडीकोयंडा असायचा. आतल्या पदार्थापेक्षा मला या कडीकोयंड्याचंच जास्त अप्रूप वाटायचं.

मी मध्यमवर्गी कुटुंबात वाढलेली आमचे अण्णा नोकरी करत असल्याने

आमच्या सांपत्तिक स्थितीच्या आलेखाचा चढउतार एक ते तीस या आकड्यांमधेच मर्यादित असायचा. पण माझ्या आजोळी गायीगुरं होती. घरात पुरून शिवाय बाहेर रतीब घालण्याइतकं दूध निघायचं. बाप्पू आणि दत्ता नावाचे दोन गडी सकाळी सकाळी धार काढायला यायचे. आजीच्या सैंपाकघरात चारपाच मोठाल्या पितळी कासंड्या रात्रीच स्वच्छ घासून, पालथ्या घालून ठेवलेल्या असायच्या. सकाळी ते दोघं आले की त्या कासंड्या उचलून तडक गोठ्यात जायचे आणि मग दुधाने भरलेली एकएक कासंडी थोड्या थोड्या वेळाने आत आणून ठेवायचे. अरुंद तोंडाच्या त्या कासंडीला तोंडापाशी ताज्या दुधाचा फेस लागलेला असायचा म्हणून माझा मामा त्या कासंड्यांना मांजरी म्हणायचा. अच्छेर पावशेर या हिशोबानेच दूध पाहिलेल्या आणि मोजलेल्या मला धारोष्ण दुधाने भरलेल्या त्या कासंड्या नुसत्या पहायलासुद्धा फार आवडायचं. (आता प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधून ठेवलेलंच दूध पहायची सवय डोळ्यांना लागून गेली आहे.)

आजोळचं दुसरं वैशिष्ट्य मला आठवतंय ते म्हणजे देवांच्या खोलीतली पूजेची तयारी. माझ्या आजोळी देवपूजेचा फार मोठा बडिवार माजवला जात नसे. माझे आजोबा विज्ञानालाच जास्त महत्त्व देणारे असल्यामुळे त्यांचा देवावर फारसा विश्वास नव्हता. पण ते इतरांच्या विश्वासाला धक्का लावत नसत. त्यामुळे देवपूजेचं काम घरातल्या बायका आणि मुलं यांच्यावरच सोपवलेलं होतं. म्हणूनही असेल कदाचित घरातला भलामोठा देव्हाराही पितळेचा होता आणि पूजेची सगळी उपकरणीही पितळीच होती. सकाळी पूजेच्या आधी देव्हा-यापुढची आरास पहाण्यासारखी असायची. जाळीदार पितळी परडीतून डोकावणारी जास्वंद, तगरी, बिट्टी., प्राजक्त अशी विविधरंगी फुलं, पितळेचं चिंचमीठानं घासलेलं लखलखीत तांब्याताम्हन, शेजाररच्या नक्षीदार तबकात ठेवलेल्या चंदनअक्षतांच्या छोटया ताटल्या आणि नक्षीदार घाटाची नैवेद्याची चिमुकली पितळी वाटी... देव्हाऱ्यापुढच्या काळया फरशीवर रेखलेला पांढऱ्याशुभ्र रांगोळीचा कणा या भाविक सौंदर्याची शोभा आणखी वाढवायचा.

मीही फार देवभोळी किंवा नित्यनेमाने पूजाबिजा करणारी नाही. पण आजोळच्या देव्हाऱ्यापुढची ती लखलखीत पितळी उपकरणी अजूनही माझ्या स्वप्नात येतात. आता लाईटवेटच्या युगात ते कडीकोयंडावाले डबे, त्या एका हातात न पेलणाऱ्या कासंड्या आणि ती पितळी देवपूजा यातलं काहीच पहायला मिळत नाही. पितळेची भांडी दिसायला कितीही सुंदर असली तरी ती चिंचमीठ लावून घासायला आजकालच्या मोलकरणीही तयार होत नाहीत. त्यापेक्षा साबणाच्या पाण्यानेही स्वच्छ होणारी हलकीफुलकी भांडीच घरात दिमाखाने मिरवत असतात.

पिकापासून अन्न तयार होण्याचा जो प्रवास आहे, त्यातलं वाहन आहे पात्र.. भांडी..!

म्हणूनच संस्कृतीच्या अभ्यासात ग्रंथाइतकंच, किंबहुना कणभर अधिकच महत्त्व भांड्यांना दिलं गेलंय. गृहस्थधर्मातल्या काही प्रथा माणसाच्या जगण्यातलं भांड्यांचं महत्त्वाचं स्थान सांगून जातात. पूर्वी -किंवा खेड्यातून अगदी आजही- बाळाच्या बारशाला आईला खण आणि बाळासाठी चमचावाटी नेण्याची पद्धत आहे. काही कारणाने बाळाला वरचं दूध प्यावं लागलं, तर त्यासाठी ही चमचावाटीची सोय.

आयुष्याला सुरुवात करताना जशी भांड्यांची साथसोबत असते, तशीच नव्या संसारात पाऊल टाकतानाही ती असतेच. आंदणाच्या रूपाने वधूला भांडी देण्याची प्रथा वेगवेगळ्या स्वरूपात का होईना पण सगळ्याच जातीजमातीत आहेच. शिवाय या प्रथेला सरकारी संरक्षणही लाभलेलं आहे. जातीभेद विसरून एखाद्या उच्चवर्णीयाने काही विशिष्ट जातीच्या जोडीदाराशी संसार मांडायचा ठरवला तर, सरकारकडून त्याला मिळणाऱ्या आहेरात भांड्यांचाच समावेश असतो.

जन्मापासून सुरू होणाऱ्या या भांड्यांच्या सोबतीला पूर्णविराम मिळतो तो अर्थातच मृत्यूने. काही जमातीत मृतदेहाला अग्नी देण्यासाठी जेव्हा घरातून स्मशानाकडे नेलं जातं, त्यावेळी या महाप्रवासाला निघालेल्या प्रवाशाला ओवाळण्यात येतं आणि ओवाळणीनंतर ते आरतीचं तबक पालथं टाकण्यात येतं. ही प्रथा या जगातल्या शेवटच्या वस्तूची साथ सुटल्याचं दर्शवणारी तर नसेल ?

जन्मापासून मांडलेल्या या भातुकलीच्या डावामधे एकवेळ राजाराणीची साथ सुटते. पण भांड्यांची साथ मात्र कायम रहाते.

———————————— ***प्रमोदिनी वडके-कवळे***

प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८




* **राज्य सरकारचे साहित्य पुरस्कार जाहीर**
**वर्ष २००३ - २००४**

| **पुरस्कार** | **पुस्तकाचे नाव** | **लेखक** |
|---|---|---|
| **काव्य** | | |
| केशवसुत पुरस्कार | व्यवहाराचा काळा घोडा | अजीम नवाज राही |
| बालकवी पुरस्कार | कोसो मैल दूर आहे चांदणी | अरुण म्हात्रे |
| **नाटक** | | |
| गडकरी पुरस्कार | मित्र | डॉ. शिरीष आठवल |
| किर्लोस्कर पुरस्कार | दमण | श्याम पेटकर |
| **कादंबरी** | | |
| ह. ना.आपटे | इन्किलाब विरुद्ध जिहाद | लक्ष्मीकांत देशमुख |
| वि. स.खांडेकर | हिंदू | शरणकुमार लिंबाळे |
| **कथा** | | |
| दिवाकर कृष्ण | धर्मयोद्धा | लक्ष्मण लोंढे |
| पु.भा.भावे | राज्य राणीचं होतं | सतीश तांबे |
| **ललित गद्य** | | |
| अनंत काणेकर | रानसूय | भास्कर चंदनशिव |
| वि.द. घाटे | अश्विन : एक विलापिका | रागिणी पुंडलिक |
| **इतिहास- अर्थशास्त्र- समाजशास्त्र** | | |
| म. फुले | गोवा कुळमी : पर्यावरणीय संस्कृतीचे जनक, रक्षक | विनायक विष्णू खेडेकर |
| डॉ. आंबेडकर | विवेक आणि विद्रोह | अरुणा ढेरे |
| **तत्त्वज्ञान मानसशास्त्र आणि शिक्षणशास्त्र** | | |
| भाऊराव पाटील | विज्ञान शिक्षण : नव्या वाटा | डॉ. हेमचंद्र प्रधान |
| यशवंतराव चव्हाण | पंचपदवी ज्ञानदेवी | मा. ना. आचार्य |
| **इतर वाङ्मय** | | |
| ना. गो. कालेलकर | अहिराणी- बोली, साहित्य आणि संस्कृती | डॉ. सुधीर कोठावदे |



| | | |
|---|---|---|
| दादोबा पांडुरंग | काव्यशास्त्रविनोदेन- भाग एक | ना. भा. दातार |
| सी. डी. देशमुख | बिजलीदेवीची कहाणी | गोविंद लक्ष्मण परांजपे |
| डॉ. तावडे | आइन्स्टाइनचे विश्व | डॉ. निवास पाटील |
| मामा वरेरकर | पक्षीतीर्थ | वसुधा पाटील |
| कोल्हटकर/अत्रे | माझी पोटदुखी | गंगाधर जयपूरकर |
| र.धो. कर्वे | विज्ञानकथा | सुधीर थत्ते- नंदिनी थत्ते |
| भाई बागडे | बुडताहेत जन | प्रा. विनायक बंगाळ |
| राजर्षी शाहू महाराज | कसोटी क्रिकेट ते एकदिवसीय क्रिकेट | आदिनाथ हरवंदे |
| लक्ष्मणशास्त्री जोशी | वाईज ॲण्ड अदरवाईज | लीना सोहोनी |
| वि. भि. कोलते | स्त्रीविकासाच्या पाऊलखुणा | स्वाती कर्वे |
| संत गाडगेमहाराज | लोकसाहित्य:शब्द आणि प्रयोग | डॉ. साहेब खंदारे |
| ग. त्र्यं. माडखोलकर | मराठवाड्यातील दलितांचे लोकसाहित्य | डॉ. परशुराम गिमेकर |
| पु. ल. देशपांडे | आस्वादक संगीत समीक्षा | श्रीरंग संगोराम |
| वसंत नाईक | दूध व्यावसायिका | सुधाकर जोशी |
| अण्णाभाऊ साठे | सैतानाच्या खांबावर | धम्मपाल रत्नाकर |
| रँग्लर परांजपे | वाघ | अतुल धामणकर |
| वि. रा. शिंदे | इये सयाजिचिये नगरी | स्मिता भागवत/कप्तान |
| सयाजी गायकवाड | दहशतवादाची कथा | ललिता गंभीर |
| **प्रथम प्रकाशन उपविभागातील पुरस्कार** | | |
| बहिणाबाई चौधरी | कुणब्याची कविता | लक्ष्मण महाडिक |
| लोटू पाटील | उरलो उपकारापुरता | प्रमोद मनोहर कोपर्डे |
| अण्णाभाऊ साठे | दैना | भास्कर ज्ञानदेव भोसले |
| ग. ल. ठोकळ | टीपकागद | अनिल दाभाडे |
| ताराबाई शिंदे | किवी कांगारूंच्या देशात | प्रा. अंबुजा सोनटक्के |
| वा. रा. कान्त | तंट्या भिल्ल आणि शेतकरी आदिवासी उठाव-संदर्भ साहित्य | विश्वनाथ देशपांडे |
| रा.ना.चौहान | गोमंतकीय वाङ्मयाचा इतिहास | नाडकर्णी/ कोमरपंत |
| कुसुमावती देशपांडे | दलित समीक्षेचे स्वरूप | डॉ. शत्रुघ्न जाधव |
| इंदिरा संत | स्त्री गणेशा | नीरजा |
| वि. वा. शिरवाडकर | काळोखाच्या वर, प्रकाशाच्या खाली | किशोर पाठक |
| उद्धव शेळके | बुरूज | ग. पी. मणुरकर |

| | | |
|---|---|---|
| बी. रघुनाथ | हिरवा चुडा | दिलीप पाटील |
| मधुकर केचे | गंगेमध्ये गगन वितळले | अंबरीश मिश्र |
| जयवंत दळवी | एका देशाचा शिल्लक इतिहास | डॉ. सतीश साळुंखे |
| दत्तू बांदेकर | राजकारणाच्या मांडवाखालून | संजय वरकड |
| कृष्णराव भालेकर | प्रभावी सूत्रसंचालन | शिवाजी जवरे |
| तुकडोजी महाराज | आकाशभाकिते | सुबोध जावडेकर |
| धनंजय कीर | कहाणी वगसम्राटाची | प्रभाकार ओव्हाळ |
| वा. ल. कुलकर्णी | खेळ नाटकाचा | राजीव नाईक |
| नाना पाटील | राष्ट्रीय एकात्मता व धार्मिक मूलतत्त्ववाद | डॉ. दिलीप खैरनार |
| नाथ पै | ताणतणावांचे नियोजन | डॉ. आनंद नाडकर्णी |
| ना. गो. नांदापूरकर | निबंध व लेखन | गोपाळ/निर्मला किराणे |
| पंजाबराव देशमुख | मुकाबला मधुमेहाशी | डॉ. अच्युत बन /वर्षा बन |
| भा. रा. तांबे | बगळ्या बगळ्या पाटी दे | रवीचंद्र हडसनकर |
| वा. गो. मायदेव | डिंग डिंग डिंगी | श्याम कुरळे |
| राम गणेश गडकरी | गोष्ट गोधराजाची | दत्ता भगत |
| शाहीर अमरेख | अंगठेबहाद्दर झिंदाबाद | प्रा. सय्यद अल्लाउद्दीन |
| गोपीनाथ तळवलकर | अनोळखीचा गाव | सुमन फडके |
| साने गुरूजी | निवडुंगाची फुलं | मथू सावंत |
| कवी दत्त | कॅलेंडरबाबाची मुलं | लीला धनपलवार |
| ना.धो. ताम्हनकर | लोककथा | प्रा. चंद्रकुमार नलगे |
| वा. गो. आपटे | नाटकच नाटक | गिरिजा कीर |
| वि. को. ओक | जे. आर. डी. टाटा | सुभाषचंद्र जाधव |
| ग. ह. पाटील | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे | वि. दा. पिंगळे |
| रेव्हरंड टिळक | पंख येती पक्ष्याला | लीला शिंदे |
| यदुनाथ थत्ते | भारतीय रेल्वेची कहाणी | अनुराधा फाटक |
| राजा केळकर | वाचन एक चमत्कार | केशव बा. वसेकर |
| दि. के. बेडेकर | श्रीकृष्ण गंधे यांचे बालसाहित्य : एक समालोचन | प्रा. शिरीष गंधे |

**वर्ष २००४ - २००५**

| **पुरस्कार** | **पुस्तकाचे नाव** | **लेखक** |
|---|---|---|
| **काव्य** | | |
| केशवसुत पुरस्कार | रेषा | ब्रम्हसोपान |
| बालकवी पुरस्कार | मेघवृष्टी | जयराम खेडेकर |



| | | |
|---|---|---|
| **नाटक** | | |
| राम गणेश गडकरी | घुसमट | सा. द. सोनसळे |
| किर्लोस्कर पुरस्कार | सेलिब्रेशन | प्रशांत दळवी |
| **कादंबरी** | | |
| हरी नारायण आपटै | वारूळ | बाबाराव मुसळे |
| दिवाकर कृष्ण | आसूडवळ | प्रा. केशव मेश्राम |
| वि. स. खांडेकर | निशाणी डावा अंगठा | रमेश इंगळे |
| **कथा** | | |
| पु. भा. भावे | परिव्राजक | प्रा. गौतमीपुत्र कांबळे |
| अनंत काणेकर | कवडसे पकडणारा कलावंत | विजय पाडळकर |
| **चरित्र आत्मचरित्र** | | |
| लक्ष्मीबाई टिळक | महर्षी वि रा शिंदे जीवन व कार्य | गो. मो. पवार |
| **समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र** | | |
| श्री. के. क्षीरसागर | सृजनात्मक लेखन | डॉ. आनंद पाटील |
| नरहर कुरुंदकर | भालचंद्र नेमाडे यांची कविता | डॉ. किशोर सानप |
| म. जोतिराव फुले ____ | भटक्या विमुक्तांची जातपंचायत-खंड २ | रामनाथ चव्हाण |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर | लेणी महाराष्ट्राची | डॉ. दाऊद दळवी |
| कर्मवीर भाऊराव पाटील | अष्टवक्रीगीता निरुपण | अरुण गोडबोले |
| यशवंतराव चव्हाण | काय तुझ्या मनात | मंगला गोडबोले |
| **भाषाशास्त्र व व्याकरण** | | |
| कालेलकर पुरस्कार | मराठी भाषेचा इतिहास | डॉ. गं. ना. जोगळेकर |
| दादोबा पांडुरंग | भाषा : स्वरूप, सामर्थ्य व सौंदर्य | डॉ. वामन केशव लेले |
| **भौतिकशास्त्र व तंत्रविज्ञान** | | |
| सी. डी. देशमुख | नवे शतक | निरंजन घाटे |
| डॉ. तावडे पुरस्कार | ऐसी प्रमेये रसिके | रवींद्र बापट |
| कोल्हटकर/अत्रे | दुसरा मधुचंद्र | चंद्रकांत महामिन |
| र. धों. कर्वे | सॅप | माधुरी शानभाग |
| भाई माधवराव बागल | चिंतनयात्रा | डॉ. जनार्दन वाघमारे |
| राजर्षी शाहू महाराज | ऑलिंपिकमधील ॲथलॅटिक्स | हेमंत जोगदेव |

| | | |
|---|---|---|
| तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | द अल्केमिस्ट | नितीन कोत्तापल्ले |

**संपादित**

| | | |
|---|---|---|
| डॉ. वि. भि. कोलते | संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ- | प्रा. रा. तु. भगत |
| संत गाडगेबाबा | लोकसंस्कृती :स्वरूप आणि विशेष- | डॉ. द. ता. भोसले |

**संशोधन**

| | | |
|---|---|---|
| ग. त्र्यं. माडखोलकर | तंजावर आणि महाराष्ट्र : साहित्य व शोध- | डॉ. माणिक धनपलवार |

**ललितकला आस्वादपर**

| | | |
|---|---|---|
| पु. ल. देशपांडे | रागदारी : संगीतातील सौंदर्यस्थळे- | रोचना भडकमकर |
| वसंतराव नाईक | शेती व शेतीपूरक लेखन- जैव तंत्रविज्ञान | प्रा. पु. के. चितळे |
| लोकशाही अण्णाभाऊ साठे | दलित-पददलित साहित्य गँगमन- | सदानंद पुंडगे |
| रँग्लर परांजपे | पर्यावरण आणि संस्कृती- | डॉ.मधुकर केशव ढवळीकर |

**बृहन्महाराष्ट्र लेखक पुरस्कार**

| | | |
|---|---|---|
| विठ्ठल रामजी शिंदे | अल तमिर- | विश्राम गुप्ते |
| सयाजी गायकवाड | एक द्रौपदी- | मीरा |

**प्रथम प्रकाशन उपविभाग**

| | | |
|---|---|---|
| बहिणाबाई चौधरी | दहशतीची दैनंदिनी | सुहास जवळीकर |
| अण्णाभाऊ साठे | बारदाना | प्रकाश देशपांडे काजवारे |

**इतर पुरस्कार**

| | | |
|---|---|---|
| लोटू पाटील | वास्तुशांती- | राजन बने |
| ग. ल. ठोकळ | मातीतली माणसं- | पांढरे |
| ताराबाई शिंदे | शिल्पायन- | परेन शिवराम जांभळे |
| वा. रा. कांत | मधुशाळा- | डॉ. सौ. जुल्फी शेख |
| रा. ना. चव्हाण | जीवनाचे झरे- | नीलिमा भावे |

**समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| कुसुमावती देशपांडे | महात्मा जोतीराव फुले : पूर्वसुरी आणि प्रभावळ- | प्रा. कृष्णा चौधरी |



| | | |
|---|---|---|
| वि. वा. शिरवाडकर | योद्धा भीमसेन देठे | |
| मधुकर केचे | मुठीतले आकाश | सिसिलिया कार्व्हालो |

**अन्य पुरस्कार**

| | | |
|---|---|---|
| इंदिरा संत | तारी- | वृषाल किन्हाळकर |
| उद्धव शेळके | संभूती- | बाबू बिरादार |
| बी. रघुनाथ | महाद्वार उघडताना- | माधवी कुंटे |
| दत्तू बांदेकर | हास्यजीवन- | डॉ. पी. एन. कुंभारे |
| कृष्णराव भालेकर | भारतीय अनुबोधपट- काल आणि आज- | पुरुष बावकर |
| संत तुकडोजी महाराज | मनाचे मनोगत- | साधना कामत |
| धनंजय कीर | तमाशा विठाबाईच्या आयुष्याचा- | योगीराज बागूल |
| वा. ल. कुलकर्णी | पंचधारांचा प्रदेश- | डॉ. प्रल्हाद लुलेकर |
| क्रांतिसिंह नाना पाटील | जागतिक अर्थकारणाचे नवे संदर्भ- | सी. पं. खेर |
| बॅ. नाथ पै | महात्मा गांधी विचारविमर्श- | डॉ. ग. ना. जोशी |
| ना. गो. नांदापूरकर | हरवलेली वस्तूसंस्कृती | शंकर सखाराम |
| तळवलकर | टुणटुण बेडकाचा प्रवास | भारत सासणे |

**इतर पुरस्कार**

| | | |
|---|---|---|
| भा. रा. तांबे | वाघोबाच्या शाळेत- | निवृत्ती शिंदे |
| वा. गो. मायदेव | प्रांजळ मन- | बबन शिंदे |
| राम गणेश गडकरी | पहिला माझा नंबर- | डॉ. विद्याधर करंदीकर |
| सानेगुरुजी | आपल्या सेनादलातील महावीर | कॅ. राजा लिमये |
| कवी दत्त | अंधश्रद्धेचे भूत- | प्रभाकर सोनकांबळे |
| ना. धों. ताम्हणकर | कोआलाचे सोबती- | डॉ. सुरुची पांडे |
| वा. गो. आपटे | मोकळा तास आणि इतर | संजीव राऊत |
| वि. कों. ओक | जोहडचे जलनायक डॉ. राजेंद्र सिंह- | सौ. लीला शहा |
| रेव्हरंड ना. वा.टिळक | लोहितांगाच्या संगतीत- | मालती देशपांडे |
| राजा केळकर | विज्ञानातील वेचक आणि वेधक | डॉ. रतिकांत हेंद्रे |
| यदुनाथ थत्ते | खेळणीच खेळणी | डी. एस. इटोकर |

## * उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीचे १७ पुरस्कार जाहीर

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीसाठी प्रकाशकांना पुरस्कार देण्यात आले. कॉन्टिनेन्टल, पॉप्युलर, राजहंस, मॅजेस्टिक, मनोविकास आदी प्रकाशकांच्या दोन किंवा त्याहून अधिक पुस्तकांना पुरस्कार मिळाले.

यंदा पुरस्कारासाठी ५१ प्रकाशकांनी २५० पुस्तके या उपक्रमात पाठवली होती. त्यातून ११ प्रकाशकांच्या १६ पुस्तकांची. गजानन क्षीरसागर, मंदार ठाकूरदेसाई, अविनाश पंडित यांनी निवड केली. प्रदीप चंपानेरकर यांनी संयोजन केले. १९ डिसेंबर रोजी पत्रकार भवन येथे 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक-संपादक प्रतापराव पवार यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले.

पुरस्कारांसाठी निवडलेली पुस्तके पुढीलप्रमाणे (वाङ्मयप्रकार, पुस्तकाचे नाव, लेखक, प्रकाशक या क्रमाने) :

ललित साहित्य : प्रथम- मौनाची भाषांतरे, संदीप खरे, कॉन्टिनेन्टल,

द्वितीय- 'ट्युसडेज विथ मॉरी', सुनंदा अमरापूरकर, मॅजेस्टिक.

ललितेतर : प्रथम- कवडसे पकडणारा कलावंत, विजय पाडळकर, मॅजेस्टिक,

द्वितीय- आमचा काय गुन्हा, रेणू गावसकर, मनोविकास.

संदर्भग्रंथ : प्रथम- वाक्यकोश, संपादन- वा. के. लेले, राजहंस.

उपयुक्त/माहितीपर : प्रथम- कापडावरील कलाकुसर, प्रतिभा काळे, रोहन;

द्वितीय : वेळ बहुमोल, अनिल शिदोरे, मनोविकास.

कलाविषयक : प्रथम- रेखांकन ते रेखाचित्र, वासुदेव कामत, ज्योत्स्ना प्रकाशन.

शिशु साहित्य : प्रथम- टिक-टॉक, प्रभाकर ओवळेकर, इंद्रायणी साहित्य.

बालसाहित्य : प्रथम- माझे जीवन, अंजन सरकार, अनुवाद- सुषमा सोनक, नॅशनल बुक ट्रस्ट.

मुखपृष्ठ (अ) प्रौढ वाङ्मय : प्रथम- स्टुडिओ, सुभाष अवचट (चित्रकार), पॉप्युलर;

द्वितीय- श्रीमंत गोपिकाबाईंची बखर, चंद्रमोहन कुलकर्णी (चित्रकार), राजा प्रकाशन.

मुखपृष्ठ (ब) बालवाङ्मय : प्रथम- मासोळी आणि चिमुकलं पाखरू, मेधा सदुंबरेकर (चित्रकार), ज्योत्स्ना प्रकाशन;

द्वितीय- अक्षर संस्कार, रामदास बवले (चित्रकार), जीवन प्रबोधिनी प्रकाशन.

बोधचित्रे : प्रथम- ज्येष्ठ, रवी परांजपे (चित्रकार), कॉन्टिनेन्टल;

द्वितीय- स्टुडिओ, सुभाष अवचट (चित्रकार), पॉप्युलर.

जाहिरातीचे साहित्य : प्रथम- पोस्टर (बहुगुणी वनौषधी), मनोहर दांडेकर (डिझाईन), रोहन प्रकाशन.

## * डॉ. रघुनाथ माशेलकर यांना 'स्टार ऑफ एशिया' पुरस्कार

वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन मंडळाचे महासंचालक प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. रघुनोथ माशेलकर यांना बीजिंग येथे 'स्टार ऑफ एशिया' पारितोषिक अमेरिकेचे



माजी अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या हस्ते देण्यात आला. आपापल्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केलेल्या आशियातील वेगवेगळ्या क्षेत्रातील २५ व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित केले जाते. भारतीय शास्त्रज्ञास हा पुरस्कार प्रथमच मिळत आहे.

## * सौ. वैशाली भालसिंग यांना जनसारस्वत पुरस्कार

अमरावतीच्या मराठी जनसाहित्य परिषदेने सौ. वैशाली भालसिंग यांच्या 'फकिरा- एक आकलन' या समीक्षाग्रंथास जनसारस्वत जाहीर केला आहे. अण्णाभाऊ साठे यांचे जीवन आणि वाङ्मय, कादंबरी या वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये आणि ग्रामीण व दलित या नव्या वाङ्मयप्रवाहांची परंपरा यांच्या पार्श्वपटावर 'फकिरा'चे मूल्यमापन करण्यात आले आहे.

## * 'तुका म्हणे' साहित्य पुरस्कार २००५

बुलढाणा येथील तुका म्हणे परिवार आणि महाराष्ट्र अनुवाद परिषद यांच्या वतीने १ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५ या कालावधीमध्ये प्रकाशित झालेल्या विविध पुस्तकांची 'तुका म्हणे साहित्य पुरस्कार २००५' साठी निवड करण्यात आली. या पुरस्काराचे हे पाचवे वर्ष आहे. मेहता पब्लिशिंग हाउसतर्फे प्रकाशित सुप्रिया वकील यांच्या उत्सव या कवितासंग्रहाला पुरस्कार प्राप्त झाला आहे.

कवितासंग्रह :

(१) सर्च इंजिन : संजीव खांडेकर (मुंबई), ग्रंथाली, मुंबई

(२) माझं इवलं हस्ताक्षर : संजय चौधरी (नाशिक), राजहंस प्रकाशन, पुणे

(३) शरणागताचे स्तोत्र : शशिकांत शिंदे (राहुरी), मानसी प्रकाशन, पुणे

(४) उत्सव : सुप्रिया वकील (कोल्हापूर), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

(५) आदीम प्रकाश चित्रे : लखनसिंह कटरे (गोंदिया), हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर

(६) मनाच्या ओंजळीत : प्रिया श्रीकांत सावरकर (मुंबई), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

(७) वांझोटी वाट : शालीग्राम वाडे (चांदुरबिस्वा), अंकुर प्रकाशन, अकोला

अनुवादित कवितासंग्रह :

(१) अमृता वर्षा : नीला सत्यनारायण (मुंबई), ऋचा प्रकाशन, नागपूर

(२) रंग तुझा कोणता : प्रा. दिनकर बोरीकर (औरंगाबाद), सुहासिनी प्रकाशन, औरंगाबाद

(३) कविता आवडलेल्या : प्रा. एकनाथ धांडे (बुलढाणा), युनिक प्रिंटर्स, डोंबिवली

कादंबरी/कथासंग्रह :

(१) वारुळ : बाबाराव मुसळे (वाशीम), साकेत प्रकाशन, औरंगाबाद

(२) गझल चर्चा : शिवाजी जवरे (भुसावळ), कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद

ललित :

(१) अव्यय : अनघा वैद्य (नाशिक), आथेन्टिकोज मीडिया (नाशिक)

(२) मोरपिसं : अनुराधा गानू (यू.एस.ए.), ग्रंथाली, मुंबई

अनुवादित कथा/कविता :

(१) पर्वत के पार : अनु. एलाइबम विजयलक्ष्मी (इम्फाळ), राय प्रविणा ब्रदर्स (मणिपूर)

(२) गझल रंग : मेहबूब राही (बार्शीटाकळी), राही प्रकाशन, बार्शी टाकळी

*** डॉ. सुनील सावंत यांच्या काव्यसंग्रहाला पुरस्कार**

कोकण मराठी साहित्य परिषद २००५ चा विशेष पुरस्कार साहित्यिक डॉ. सुनील सावंत यांच्या 'सूर्य दिसत राहील तोपर्यंत...' काव्यसंग्रहाला प्राप्त झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा ११ डिसेंबर २००५ रोजी कवी केशवसुत स्मारक, मालगुंड (रत्नागिरी) येथे सुप्रसिद्ध साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते संपन्न झाला. डॉ. सुनील सावंत यांची चौदा पुस्तके प्रकाशित झाली असून त्यात एक हिंदी काव्यसंग्रह, एक इंग्लिश ललितसंग्रह, पाच काव्यसंग्रह व दोन कथासंग्रह आहेत.

*** प्रभाकर पाध्ये पुरस्कार वितरण**

राजकारणाला समाजकारणाची जोड देण्याचे कार्य करताना राजकारणासह सामाजिक क्षेत्रातही कार्य करण्याची आवश्यकता आहे, असे मत ज्येष्ठ समाजवादी नेत्या मृणाल गोरे यांनी व्यक्त केले.

प्रभाकर पाध्ये, कमल पाध्ये विश्वस्त निधीच्या वतीने आणि प्रशांत पाध्ये शैक्षणिक सांस्कृतिक पुरस्काराचे वितरण मोहन धारिया यांच्या हस्ते झाले. कार्याध्यक्ष सरोजिनी वैद्य यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. भानू काळे, पुरुषोत्तम पाटील, शांताबाई मालेगावकर, शोभा भागवत, सुमित्रा भावे, डॉ. मिलिंद वाटवे आदींना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

मृणाल गोरे म्हणाल्या की, आज राजकारण करताना केवळ राजकारण करू नये तर त्याच्या जोडीला समाजकारण करणे गरजेचे आहे. राजकारणाला समाजकारणाची जोड नसेल तर ते राजकारण हा दिखाऊपणा आहे. ते राजकारण करण्यासारखे नाही. समाजातील रोगांवर काम करता येईल या कल्पनेने मी राजकारणात आले. संघर्ष करताना त्या मागची भूमिका समजून घेण्याची गरज आहे. सर्व प्रश्नांचा अभ्यास करण्याची गरज आहे. समाजकारण करताना लोकप्रतिनिधींनी जनतेचा विश्वास संपादन करण्याची गरज आहे. सामाजिक आणि इतर क्षेत्रांत भरीव कामगिरी करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी शांताबाई मालेगावकर, सुमित्रा भावे, डॉ. मिलिंद वाटवे, शोभा भागवत, पुरुषोत्तम पाटील, वर्षा काळे आदींची भाषणे झाली. स्वागत आणि सूत्रसंचालन प्रमोदिनी वडके यांनी केले.



*** लक्ष्मीकांत देशमुख यांना पुरस्कार**

राज्य सरकारचा पुरस्कार आपल्याला मिळाल्याने खूप आनंद झाला असून या पुरस्काराने आपल्याला राजमान्यता मिळाली आहे, अशी प्रतिक्रिया 'इन्कलाब विरुद्ध जिहाद' कादंबरीचे लेखक व सांगली जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केली.

देशमुख यांच्या या कादंबरीस राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. या कादंबरीला यापूर्वी पाच पुरस्कार मिळाले आहेत. साम्यवाद व इस्लाम या दोन कडव्या तत्त्वज्ञानाच्या जीवघेण्या संघर्षात सर्वस्व गमावून बसलेल्या अफगाणिस्तानची 'आकांत कथा' देशमुख यांनी या कादंबरीत मांडली आहे. देशमुख यांचे 'कथांजली', 'अंतरीच्या गूढगर्भी', 'उदक' हे तीन कथासंग्रह, तसेच 'सलोनी', 'अंधेरनगरी', 'होते करूप वेडे' या तीन कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. 'उदक'ला राज्य सरकारचे कथासंग्रहाचे पारितोषिक मिळालेले आहे. 'दूरदर्शन हाजीर हो' हे बालनाट्य, त्याचप्रमाणे 'मुक्तिसंग्राम' ही पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. 'ऑक्टोपस', 'तळहाताच्या रेषा', 'पाचवी शहाबानो' आणि 'प्रशासननामा' ही त्यांची पुस्तकेही प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

*** 'वाङ्मय चर्चा मंडळा'चे पुरस्कार**

बेळगावच्या 'वाङ्मय चर्चा मंडळा'तर्फे देण्यात येणारे साहित्य पुरस्कार जाहीर झाले असून 'इन्किलाब वि. जिहाद' या लक्ष्मीकांत देशमुख यांच्या पुस्तकास दोन हजार रुपयांचा 'वाङ्मय चर्चा मंडळ साहित्य पुरस्कार' घोषित झाला आहे.

एक हजार रुपयांचा 'वि. ना. मिसाळ साहित्य पुरस्कार' स्टीफन परेरा यांनी लिहिलेल्या 'वारमोड' ग्रंथास मिळाला आहे.

तर नवोदितांना दिला जाणारा विशेष साहित्य पुरस्कार स्टॅनली गोन्सालविस यांच्या 'मातीची सावली' या पुस्तकास जाहीर करण्यात आला आहे.

*** मिलिंद बोकील, संदीप खरे, रा. ना. पवार पुरस्काराचे मानकरी**

कविवर्य रा. ना. पवार प्रतिष्ठानतर्फे यंदाच्या वर्षीचा साहित्य पुरस्कार डॉ. मिलिंद बोकील आणि संदीप खरे यांना देण्यात आला. प्रत्येकी १५०० रुपये रोख, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. साहित्य समीक्षक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या हस्ते व ज्येष्ठ सहकारनेते, माजी आमदार वि. गु. शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पुरस्काराचे यंदाचे पाचवे वर्ष आहे. यापूर्वी डॉ. श्रीराम लागू, डॉ. अलका मांडके, आमदार यशवंतराव गडाख, सुरेखा शहा, राजेंद्र दास यांच्या साहित्य कृतींना पुरस्कार देण्यात आले आहेत.

डॉ. बोकील यांची कादंबरी 'शाळा' या पुरस्कारासाठी निवडण्यात आली. डॉ. बोकील हे समाजशास्त्राचे अभ्यासक आणि लेखक असून सर्वोदय नेते

जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती चळवळीतून त्यांनी सामाजिक क्षेत्रात प्रवेश केला आहे. सह्याद्री डोंगररांगांत वस्तीला असलेल्या आदिवासी भागात त्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. 'उदकाचिया आर्ती' आणि 'झेन गार्डन' हे कथासंग्रह, 'समुद्रापारचे समाज' हा परदेशी समाज चित्रणाचा तर 'जनाचे अनुभव पुसता' हा त्यांचा सामाजिक लेखसंग्रह प्रसिद्ध आहे.

श्री. खरे हे काव्यविश्वातील आश्वासक नाव आहे. 'कॅलिडोस्कोप' या काव्यवाचनाचे त्यांनी दोनशे कार्यक्रम सादर केले आहेत. 'दिवस असे की' आणि 'मी गातो एक गाणे' या त्यांच्या स्वत:च्या दोन ध्वनिफिती प्रकाशित आहेत. 'मौनाची भाषांतरे' हा त्यांचा काव्यसंग्रह अल्पावधीतच लोकप्रिय झाला.

*** उषा देशमुख यांना डॉ. हे. वि. इनामदार पुरस्कार**

'साहित्यप्रेमी भगिनी मंडळा'तर्फे देण्यात येणारा 'डॉ. हे. वि. इनामदार गौरव पुरस्कार' यंदा डॉ. उषा देशमुख यांच्या 'अवघी दुमदुमली पंढरी' या वैचारिक ग्रंथाला देण्यात आल्याचे मंडळातर्फे कळविण्यात आले आहे.

*** पुरस्कारासाठी आवाहन**

यशवंतराव दाते स्मृती संस्थेद्वारे कादंबरी, कथा-काव्य पुरस्कारांसाठी ३१ डिसेंबरपर्यंत साहित्य मागविले आहे. सर्वोत्कृष्ट मराठी कादंबरीस बाबा पद्मनजी तर कथासंग्रहास सहकार महर्षि बाबुराव देशमुख कथासंग्रह पुरस्कार दिला जातो. दोन्ही पुरस्कारांसाठी १ जानेवारी २००४ ते ३० डिसेंबर २००५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या साहित्याचा विचार केला जाईल. काव्यसंग्रहाला 'संत भगवानबाबा काव्य पुरस्कार' दिला जाणार असून १ जानेवारी २००० ते ३१ डिसेंबर २००५ या कालावधीतील संग्रहांचा विचार केला जाईल. **संपर्क :** आपले साहित्य संयोजक, पुरस्कार समिती द्वारा, प्रदीप दाते, साबळे प्लॉट्स, बॅचलर रोड, वर्धा.

*** 'अक्षरधारा'चा सर्वोत्तम ग्रंथपाल पुरस्कार पुष्पा वाणी यांना**

'अक्षरधारा'च्या वतीने देण्यात येणारा 'सर्वोत्तम ग्रंथपाल पुरस्कार' चिपळूण येथील लोकमान्य टिळक स्मारक वाचनालयाच्या ग्रंथपाल पुष्पा वाणी यांना देण्यात झाला आहे.

'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक-संपादक प्रतापराव पवार यांच्या हस्ते तो प्रदान केला गेला. पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. श्रीमती वाणी गेली दहा वर्षे टिळक स्मारक वाचनालयात कार्यरत आहेत. विविध उपक्रमासाठी त्यांचे मोलाचे योगदान आहे. गेली १४२ वर्षे हे ग्रंथालय कार्यरत आहे.

सकाळ रिलीफ फंडातर्फेही या ग्रंथालयाला याच वेळी एक लाख रुपयांची देणगी देण्यात आली. पुरामुळे या ग्रंथालयाचे बरेच नुकसान झालेले आहे.

*** काका हाथरसी पुरस्कार डॉ. संगोराम यांना प्रदान**

हिंदीतील ज्येष्ठ लेखक व हास्यकवी काका हाथरसी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ देण्यात येणारा पुरस्कार संगीत समीक्षेच्या क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल सुप्रसिद्ध संगीत समीक्षक डॉ. श्रीरंग संगोराम यांना नुकताच प्रदान करण्यात आला. काका हाथरसी पुरस्कार ट्रस्टतर्फे श्री. मुकेश गर्ग यांनी ही पुरस्कार प्रदान केला.

मानपत्र व पंधरा हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

'अमूर्त संगीताला शब्दात बांधणे हे काम सोपे नाही. डॉ. संगोराम यांनी ते चांगल्या प्रकारे केले आहे. संगीताच्या क्षेत्रात कलावंतांना मान मिळतो, मात्र समीक्षकांची उपेक्षा होती, हे लक्षात घेऊन हा पुरस्कार देण्याची योजना आखण्यात आली,' असे श्री. गर्ग यावेळी म्हणाले.

हिंदीत विनोद आणि उपरोध यासाठी हाथरसींनी विपुल काव्य लेखन केले, ते हास्य कवितेचे मंच कलाकार होते, त्यांच्या नावाने देण्यात येणारा हा पुरस्कार मिळाल्याने आपण धन्य झालो आहोत, असे डॉ. संगोराम यावेळी म्हणाले.

या कार्यक्रमास श्री. समीर दुबळे, डॉ. स. म. परळीकर, डॉ. मुकुंद महाजन आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

*** गजाननराव वाटवे यांना 'गदिमा पुरस्कार'**

गदिमा प्रतिष्ठानचा 'गदिमा पुरस्कार' ज्येष्ठ भावगीत गायक गजानन वाटवे यांना ४ डिसेंबरला समारंभपूर्वक देण्यात आला.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे होते. दहा हजार रुपये, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

प्रतिष्ठानतर्फे विद्या माडगूळकर यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा 'गृहिणी सखी सचिव पुरस्कार' 'कास्प'चे अध्यक्ष व ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. शरच्चंद्र गोखले यांच्या पत्नी रोहिणी गोखले यांना देण्यात आला. पाच हजार रुपये, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. 'चैत्रबन पुरस्कार' साहित्यिक राजेंद्र खेर यांना तर 'गदिमा स्नेहबंध पुरस्कार' छायाचित्रकार बाळ बापट यांना देण्यात आला.

*** संजीवनी बोकील यांना 'काव्यप्रतिभा पुरस्कार'**

''कविता ही कवीच्या भावना व्यक्त करतानाच, त्याला भावनांपासून मुक्तीही मिळवून देते. संजीवनी बोकील यांच्या कविता अशाच असून, त्यांचे शब्दांकन उत्कृष्ट असते,''असे मत कवयित्री आसावरी काकडे यांनी व्यक्त केले.

रंगत संगत प्रतिष्ठानतर्फे संजीवनी बोकील यांना येथे 'काव्यप्रतिभा पुरस्कार' देण्यात आला. एक हजार रुपये, सन्मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. प्रतिभा मोडक, प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, कवी संदीप अवचट या वेळी उपस्थित होते.

आसावरी काकडे म्हणाल्या, ''बोकील यांच्या कवितेत आत्मनिष्ठा, प्रामाणिकपणा आहे. कष्ट, अभ्यास, जिद्द, शिस्त या गुणांमुळे त्यांनी यश मिळवले आहे.''

संजीवनी बोकील म्हणाल्या, ''आयुष्यभर विखुरलेल्या क्षणांचे ओरखडे माझ्या कवितेत व्यक्त होतात. माझ्यातील सूक्ष्म आवाजांचे संशोधन माझी कविता करत असते.''

# श्रद्धांजली

*** प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख**

एक होता डांगोरा या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबरीचे लेखक प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख (वय ८६) यांचे सोलापूर येथे दि. १२ डिसेंबर रोजी निधन झाले.

२२ नोव्हेंबर १९१९ रोजी अक्कलकोट येथे त्यांचा जन्म झाला होता. एमए,बीटीपर्यंत शिक्षण झाले होते. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि कन्नड या चार भाषा त्यांना अवगत होत्या. प्रारंभी चंडक हायस्कूलमध्ये आणि नंतर निवृत्तीपर्यंत दयानंद महाविद्यालयात त्यांनी अध्यापन केले. त्यांना २००४ मध्ये मानाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. 'बखर : एक राजाची', 'डांगोरा : एका नगरीचा' आणि 'उच्छाद' या त्यांच्या तीनही कादंबऱ्यांना राज्य पुरस्काराबरोबरच इतरही अनेक पुरस्कार मिळाले होते. त्यात दमाणी साहित्य पुरस्कार, केशवराव कोठावळे पुरस्कार, फाय फौंडेशन पुरस्कार, रंगतसंगत प्रतिष्ठान पुरस्कार, व. दि. कुलकर्णी स्मृती पुरस्कार यांचा समावेश आहे. 'अंधारयात्रा', 'शारदीय चंद्रकळा', 'गडकऱ्यांची संसारनाटके' 'रामदास : प्रतिमा आणि प्रबोध', 'धुके आणि शिल्प', 'प्रदेश साकल्याचा', 'गडकऱ्यांची संसारनाटके', 'स्फटिकदिवे' हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. 'उत्तररात्र' आणि 'कविता चंद्रकेतूची' हे त्यांचे कवितासंग्रह आहेत, तर 'देवदूत', 'सिद्धार्थ,' 'पूर्वेची यात्रा' ही त्यांनी केलेली अनुवादित पुस्तके आहेत. कवी, कादंबरीकार, नाटककार, समीक्षक, अनुवादक म्हणून प्रा. सरदेशमुख यांची साहित्यविश्वाला ओळख होती.

सरदेशमुख यांनी कविता, कादंबरी, नाटक, समीक्षा, ललित अशा विविध साहित्याची निर्मिती केली. स्वत:च्या प्रतिभावैशिष्ट्यांची प्रभावी मुद्रा उमटविली. आध्यात्मिकतेच्या स्पर्शाने त्यांच्या समीक्षेसह सर्व लेखनाला श्रेष्ठ गुणवत्ता प्राप्त झाली. व्यावहारिक संकटावर मात करीत आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी आपले लेखनकार्य व्रतस्थपणे चालविले.

*** संस्कृत व प्राच्यविद्या अभ्यासक डॉ. ग. बा. पळसुले**

संस्कृत तसेच प्राच्यविद्येचे गाढे अभ्यासक डॉ. गजानन बाळकृष्ण तथा उर्फ अण्णासाहेब पळसुले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.

कवी, व्याकरणकार, नाटककार आणि सावरकरप्रेमी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या पळसुले यांचा व्यासंग जर्मन तसेच फ्रेंच या भाषांमध्येही होता. विद्यापीठात प्रगत अध्ययन केंद्रात ते प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणूनही काम करत होते.



भांडारकर प्राच्यविद्या संस्थेत महाभारत संशोधन विभागात, तसेच डेक्कन कॉलेजातील संस्कृत कोष विभागात त्यांचा सहभाग होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांवर 'वैनायकम्' हे संस्कृत महाकाव्य डॉ. पळसुळेनी रचले होते.

*** ज्येष्ठ रंगकर्मी व लेखक वालावलकर**

ज्येष्ठ रंगकर्मी व लेखक जयवंत वालावलकर (वय ७५) यांचे ३० नोव्हेंबर रोजी निधन झाले. श्री. वालावलकर मूळचे आजऱ्याचे (जि. कोल्हापूर) होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी भाग घेतला होता. चित्रपट व रंगभूमीशी सुमारे चार दशके ते संबंधित होते. पुण्यात त्यांनी 'बहुरूपी' ही नाट्यसंस्था स्थापन केली होती. या संस्थेतर्फे त्यांनी 'बेलभंडार' नाटक रंगमंचावर आणले. ते खूप गाजले. याच नाटकाद्वारे अरुण सरनाईक, उषा चव्हाण आदी कलाकारांना श्री. वालावलकर यांनी प्रथमच रंगमंचावर आणले. आणीबाणीच्या काळात अभिनेते यशवंत दत्त यांच्याबरोबर 'हुकमाची राणी' हे नाटक त्यांनी केले. अभिनेते निळू फुले यांच्याबरोबरचे त्यांचे 'राजकारण गेलं चुलीत' हे नाटकही लोकप्रिय ठरले.

*** अभिनेते सुधीर जोशी**

वेड्यावाकड्या अंगविक्षेपांचा आधार न घेता केवळ सहजत्स्फूर्त शाब्दिक विनोदावर रंगभूमी, चित्रपट आणि छोटा पडदा गाजविणारे विनोदी अभिनेते सुधीर जोशी यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ५७ वर्षांचे होते.

'लफडं सोवळ्यातलं', 'टूरटूर', 'शांतेचं कार्ट चालू आहे', हिमालयाची सावली', 'श्रीमंत', 'पर्याय', 'एकदा पाहावं करून', 'लग्नाची बेडी', 'अश्वमेघ', 'घर श्रीमंताचं', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई', 'प्रिय पपा', 'स्माईल प्लीज', 'सविता दामोदर परांजपे', 'घनदाट', 'काचेचा चंद्र', 'जोडीदार', 'शहजादा', 'पाहू कशाला कुणाकडे' आदी वैविध्यपूर्ण नाटकांतून आपल्या निखळ भूमिकांनी त्यांनी रसिकांच्या हृदयात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. कारुण्याची झालर असलेला त्यांचा विनोद प्रेक्षकांच्या डोळ्यांतून प्रसंगी पाणीही काढे. अनेक गंभीर नाटकांतून कामे करूनही ते विनोदी नट म्हणूनच अधिक लोकप्रिय झाले. 'कलावैभव', 'सुयोग', 'नाट्यसुमन' या नाट्यसंस्थांतून त्यांनी प्रामुख्याने कामे केली. आपल्यावरील विनोदी अभिनेत्याचा शिक्का पुसून टाकण्याकरिता त्यांनी 'हॅम्लेट'ही केलं, परंतु त्याचे अवघे तीनच प्रयोग झाले. 'आय ॲम नॉट बाजीराव', विजय तेंडुलकरांचं 'कमला' आदी इंग्रजी नाटकांतूनही त्यांनी भूमिका केल्या. 'गंमत जंमत', 'भुताचा भाऊ', 'अशी ही बनवाबनवी', 'माझा पती करोडपती', 'तू तिथं मी', दादा कोंडकेंचा 'सासरचं धोतर' आदी बऱ्याच मरोठी चित्रपटांतूनही त्यांनी विनोदी व्यक्तिरेखा साकारल्या. छोटा पडदाही त्यांनी बराच काळ व्यापला. 'एक हा असा धागा सुखाचा', 'इंद्रधनुष्य', 'प्रपंच', '४०५ आनंदवन', 'बंधन' आदी मालिकांतील त्यांच्या भूमिका लक्षवेधी ठरल्या होत्या. 'दै. सामना'मध्ये त्यांनी लिहिलेले 'वाट्टेल ते' हे विनोदी सदरही वाचकप्रिय ठरले होते.

# दीपयोजना

कमीत कमी १००० रु.ची आमच्या प्रकाशनाची कोणतीही पुस्तके घ्या व त्यावर ३५० रु.ची पुस्तके मोफत मिळवा. आमच्या सभासदांसाठी १००० रु.च्या पुस्तकांवर ५००रु.ची पुस्तके मोफत!

**मुदत २८ फेब्रुवारी २००६ पर्यंत!**

पोस्टखर्च वेगळा पाठवावा (अंदाजे १००रु.)
एकूण रक्कम ड्राफ्ट अथवा मनिऑर्डर ने पाठवावी

## दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| समिधा | रणजित देसाई | १०० |
| बारी | रणजित देसाई | १२० |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ८० |
| आलेख | रणजित देसाई | १२० |
| मेघ | रणजित देसाई | १०० |
| आषाढ | रणजित देसाई | ८० |
| वैशाख | रणजित देसाई | ९० |
| पंख जाहले वैरी | रणजित देसाई | ५० |
| पांगुळगाडा | रणजित देसाई | ६० |
| तुझी वाट वेगळी | रणजित देसाई | ६० |
| स्नेहधारा | रणजित देसाई | ९० |
| संचित (निवडक अध्यक्षीय भाषणे) | रणजित देसाई | ६० |
| नवी स्त्री | वि. स. खांडेकर | १०० |
| अबोली | वि. स. खांडेकर | ५० |
| दवबिंदू | वि. स. खांडेकर | ६० |
| ढगाआडचे चांदणे | वि. स. खांडेकर | ६० |
| समाधीवरली फुले | वि. स. खांडेकर | ६० |
| अश्रु आणि हास्य | वि. स. खांडेकर | ९० |
| प्रसाद | वि. स. खांडेकर | १५० |
| क्षितिजस्पर्श | वि. स. खांडेकर | ८० |
| सांजसावल्या | वि. स. खांडेकर | ८० |
| वन्हि तो चेतवावा! | वि. स. खांडेकर | ७० |
| सहा भाषणे | वि. स. खांडेकर | ७० |
| तारका | वि. स. खांडेकर | ४० |
| नटरंग | आनंद यादव | १४० |
| माळावरची मैना | आनंद यादव | ११० |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९० |
| झाडवाटा | आनंद यादव | ९० |
| स्पर्शकमळे | आनंद यादव | १०० |
| का रे भुललासी | व. पु. काळे | १२० |
| तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७० |
| दुनिया तुला विसरेल | व. पु. काळे | ५० |
| प्रेममयी | व. पु. काळे | १०० |
| रंगपंचमी | व. पु. काळे | २०० |
| सांगे वडिलांची कीर्ती | व. पु. काळे | ७० |
| माणसं | व. पु. काळे | १७० |
| एक एक पाऊल : ओशो | अनु. भारती पांडे | ८० |
| मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही : ओशो | अनु. मृणालिनी गडकरी | ९० |
| साक्षात्काराची देणगी : ओशो | अनु. प्रज्ञा ओक | १५० |
| वुइ दि नेशन (नानी पालखीवाला) | वि. स. वाळिंबे | २०० |
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | ३०० |
| लज्जा (कादंबरी) | अनु. लीना सोहोनी | १२५ |
| निर्बाचित कबिता (कविता) | अनु. मृणालिनी गडकरी | ७० |
| आंधळी : कॅथरीन पियर्स | शान्ता शेळके | १०० |
| गोंदण | शान्ता शेळके | ५० |
| सांगावेसे वाटले म्हणून... | शान्ता शेळके | ९० |
| सुवर्णमुद्रा | शान्ता शेळके | ८० |
| मजल दरमजल | अनु. भारती पांडे | ८० |
| व्हॉट वेंट रॉंग? | अनु. लीना सोहोनी | २०० |






| | | |
|---|---|---|
| रंग सुखाचे | डॉ. रमा मराठे | ८० |
| निसर्गपुत्र (अनुवादित) | निरंजन घाटे | ८० |
| पर्यावरण प्रदूषण | निरंजन घाटे | १३० |
| वसुंधरा | निरंजन घाटे | २५० |
| विज्ञानाचे शतक | निरंजन घाटे | २०० |
| युगंधर (विज्ञान) | निरंजन घाटे | १०० |
| नवे शतक | निरंजन घाटे | १५० |
| पोलिसकथा | व. कृ. जोशी | १५० |
| भीषण हत्याकांड | व. कृ. जोशी | ९० |
| खेकडा | रत्नाकर मतकरी | ८० |
| तनमन | रत्नाकर मतकरी | ४० |
| मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : रोहिणी सिंग | अनु. आशा परुळेकर | ६० |
| मायक्रोवेव्ह ओव्हन | राजश्री नवरे | ७० |
| अंतराळ : शांतिनाथ देसाई | उमा कुलकर्णी | १०० |
| अवस्था : यु. आर. अनंतमूर्ती | उमा कुलकर्णी | ११० |
| सीमारेषा | माधवी देसाई | २०० |
| हरवलेल्या वाटा | माधवी देसाई | ८० |
| धुमारे | माधवी देसाई | ७० |
| सागर | माधवी देसाई | ६० |
| वडवाई | अंजनी नरवणे | २०० |
| तत्वमसि | अंजनी नरवणे | १४० |
| टेक् २५ : भावना सोमय्या | अंजनी नरवणे | ४०० |
| गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस | अंजनी नरवणे | १२० |
| काँगो : मायकेल क्रायटन | अनु. अरुण मांडे | १६० |
| ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २५० |
| द लास्ट डॉन : मारिओ पुझो | अनु. अनिल काळे | ३५० |
| क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक | अनु. वैशाली जोशी | ३५० |
| दि फिस्ट ऑफ गॉड : फ्रेडरिक फोरसिथ | अनु. अनिल काळे | ३०० |
| डॉ. झिवागो : बोरिस पास्तरनाक | अनु. आशा कर्दळे | २५० |
| ३००१ द फायनल ओडिसी : आर्थर सी. क्लार्क | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | १६० |
| काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस | अनु. सरिता पदकी | १५० |
| देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय (बंगाली) | अनु. मृणालिनी गडकरी | ९० |
| संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती | अनु. लोकापूर/कानिटकर | ८० |
| द्वंद्व : विजयदान देथा (राजस्थानी कथा) | अनु. वनिता सावंत | १५० |
| रावीपार : गुलजार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५० |
| फुलांचे बोल : आन्ना साक्से (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १०० |



| | | |
|---|---|---|
| द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा) | अनु. मीना वैशंपायन | १३० |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १०० |
| भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया :नवाझ मोदी | अनु. वासंती फडके | ३०० |
| योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम | माधव मोर्डेकर | ४० |
| सेक्स, स्कॉच, अँड स्कॉलरशिप : खुशवंतसिंग | अनु. अनिल किणीकर | १२५ |
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६० |
| मदर टेरेसा : ॲन सेबा | अनु. अनंत बेदरकर | २५० |
| टाईमपास : प्रोतिमा बेदी | अनु. सुप्रिया वकील | १८० |
| देव जो भूवरी चालिला : साईबाबा रंगास्वामी पार्थसारथी | अनु. लीना सोहोनी | १२० |
| द जॉय ऑफ कॅन्सर : अनुप कुमार | अनु. माधुरी शानभाग | १५० |
| मनावर विजय : एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५ |
| मुलांवरचे संस्कार (राज्य पुरस्कार) | शं. व्यं. काश्यपे | ९० |
| प्रियाराधन आणि विवाह : डॉ. विजय नागस्वामी | अनु. भारती पांडे | १५० |
| सुखद मातृत्व | डॉ. रत्नावली दातार | ७० |
| डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी | डॉ. विकास/विनीता गोगटे | २५० |
| हसता हसता आरोग्य | अनु. दिगंबर गाडगीळ | ९० |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९० |
| आपले सौंदर्य आणि त्याची निगा | अनु. मीना टाकळकर | १०० |
| प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू | यशोधरा भोसले | १५० |
| शिवणकला एक छंद : सलवार कमिज, स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी | हेमा कळके | ८० |
| विज्ञान गमती | डॉ. अरुण मांडे | ५० |
| विज्ञान जमती | डॉ. अरुण मांडे | ६० |
| विश्वातील सजीवसृष्टी | अनु. डॉ. बाळ फोंडके | ६० |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : कुलकर्णी/भागवत/गंभीर | अनु. मीना किणीकर | ७० |






| | | |
|---|---|---|
| हिरवे जनुक : शाकुंतला भट्टाचार्य | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ६० |
| संभव असंभव | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ८० |
| बिजलीदेवीची कहाणी | गोविंद लक्ष्मण परांजपे | ८० |
| नामशेष झालेले प्राणी | डॉ. किशोर पवार | ५० |
| शरीरातील विविध संस्था - | | |
| फुफ्फुसे, हृदय, मेंदू | वैशाली जोशी | २५ |
| अंतःस्राव, गर्भाशय, जठर | वैशाली जोशी | २५ |
| स्नायू, अस्थि | वैशाली जोशी | २५ |
| व्हर्च्युअल रिॲलिटी (कथा) | डॉ. बाळ फोंडके | १५० |
| पृथ्वीवर माणूस उपराच! (संशोधन) | सुरेशचंद्र नाडकर्णी | ७० |
| अज्ञाताचे विज्ञान (संशोधन) | सुरेशचंद्र नाडकर्णी | १३० |
| सुंदर आपली फुलबाग | आ. बा. पाटील | १०० |
| सुंदर आपला रोपमळा | आ. बा. पाटील | १२० |
| एकवचनी | संजय राऊत | ३५० |
| ख्यातनाम इतिहासकार : अरुण शौरी | अनु. सुधा नरवणे | १५० |
| बिग इगोज, स्मॉल मेन | | |
| : राम जेठमलानी | अनु. माधव मोर्डेकर | ८० |
| द अदर साईड ऑफ सायलेन्स : | | |
| उर्वशी बुटालिया | अनु. नारायण आवटी | २५० |
| महात्मा (जोतीराव फुले) | डॉ. रवींद्र ठाकूर | ३०० |
| फॅक्टरी गेट | रंगा मराठे | १५० |
| तीन दगडाची चूल | विमल मोरे | १५० |
| मृद्गंध | इंदिरा संत | १६० |
| आठवणींचा मोहर | राजाभाऊ गवांदे | १६० |
| बंजाऱ्याचे घर | यशोधरा भोसले | १५० |
| धागे : गुलजार | संपादन : अनंत दीक्षित | ६० |
| ओसरलेले वादळ | कुमार केतकर | १२० |
| गज़ल | प्रा. डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी | १८० |
| रिवणावायली मुंगी | राजन गवस | १३० |
| कावळे आणि माणसं | उत्तम कांबळे | १०० |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १३० |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५ |
| गुंता सोडविताना | अनुराधा गुरव | ११० |
| पाणी कुठंवर आलं गं बाई... | दया पवार | २५ |
| नको स्वातंत्र्य स्त्रीला | दिलीप परदेशी | ५० |
| मराठी कादंबरीचा इतिहास | चंद्रकांत बांदिवडेकर | १७० |
| मराठी रोमँटिक काव्यप्रतिभा | रमेश तेंडुलकर | १३० |



# बालनगरी

**कोणाला म्हणतात?**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महात्मा | - | मोहनदास करमचंद गांधी, जोतिबा फुले |
| २) | लोकमान्य | - | बाळ गंगाधर टिळक |
| ३) | स्वातंत्र्यवीर | - | विनायक दामोदर सावरकर |
| ४) | नेताजी | - | सुभाषचंद्र बोस |
| ५) | पंडितजी | - | जवाहरलाल नेहरू |
| ६) | आचार्य | - | विनोबा भावे, प्रल्हाद केशव अत्रे |
| ७) | पोलादी पुरुष | - | सरदार वल्लभभाई पटेल |
| ८) | महर्षी | - | धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे |
| ९) | राष्ट्रपिता | - | महात्मा गांधी (मोहनदास करमचंद गांधी) |
| १०) | गुरुदेव | - | रवींद्रनाथ टागोर |



# बेडकाची चतुराई

एक घनदाट जंगल होतं. त्या जंगलातले एक हरीण दिसायला खूप सुंदर आणि स्वभावाने खूप गरीब होते. त्यामुळे जंगलातल्या सर्व प्राण्यांशी त्याची मैत्री होती.

मात्र उन्हाळा आला की त्या हरणाची पंचाईत होई. त्याला खाण्यासाठी लागणारे लुसलुशीत गवत उन्हामुळे करपून जाई आणि त्याच्यावर उपाशी राहण्याची पाळी येई. त्यामुळे जंगलाच्या बाजूलाच असणाऱ्या नदीकाठच्या भागात ते हरीण जात असे. नदीकाठी भरपूर हिरवे गवत असल्याने खाण्यापिण्याची सोय होत असे.

असेच एकदा उन्हाळ्यात हरीण नदीकाठी जात होते. तेवढ्यात त्याची वाट एका सिंहाने अडवून ठेवली. तो सिंह हरणाला म्हणाला,



''ए, काय रे कुठे चाललास...?''

हरीण खूप घाबरले. ते म्हणाले, ''मी...? मी... नदीकाठी चाललो आहे!''

''कशाला...?'' सिंह गरजला.

हरीण म्हणाले, ''महाराज, उन्हाळ्यात मला या जंगलात काही खायला मिळत नाही म्हणून मी त्या नदीकाठच्या प्रदेशात जात असतो... कारण तिथे भरपूर गवत असतं...''

''पण मला तर आता तुला खायचंय. तेव्हा कसं करशील?'' सिंहाने हरणाला घाबरवत म्हटले.

हरीण घाबरले. पण थोडासा धीर एकवटून ते म्हणाले, ''महाराज, जरा माझ्याकडे पहा, माझ्या अंगात काहीच मांस नाही. नुसती हाडं... हाडं... राहिली आहेत. मी उन्हाळा संपेपर्यंत त्या नदीकाठचे गवत खातो, भरपूर लठ्ठ होतो, मग तुम्ही मला खा!'' थोडा विचार करून सिंह म्हणाला, ''पण... पण तू पळून जाशील. पुन्हा परत येण्याची काय खात्री...? तेव्हा तुला आत्ताच मारावं... हेच योग्य आहे!''

हरणाने खूप गयावया केली. ते म्हणाले, ''महाराज, हे जंगल सोडून मी कुठे जाणार? माझे सर्व नातेवाईक, मित्रमंडळी इथेच तर आहेत. त्यामुळे कृपा करून मला फक्त दोन महिन्यांसाठी सोडा, मी नक्की परत येईन.''

सिंहानेही मनाशी म्हटले, काय हरकत आहे? नाहीतरी हा दोन महिन्यांनी चांगला गुबगुबीत होऊन येणार. मग याचं लुसलुशीत मांस खायला खूप मजा येईल! असा विचार करून सिंह म्हणाला, ''ठीक आहे. पण दोन महिन्यांनी नक्की ये. नाहीतर तुला शोधून काढणं मला काही अवघड नाही. कळले का...?''

''ठीक आहे महाराज...!'' हरीण घाबरत म्हणाले.

त्यानंतर हरीण आणि सिंह दोघेही आपापल्या वाटांनी निघून गेले.

इकडे हरिणाची झोपच उडाली. सिंह आपल्याला दोन महिन्यांनी खाणार याची प्रचंड भीती त्याच्या मनात होती. नदीकाठी पोहोचल्यावर तो उदास मनाने बसून राहिला.

हरीण दर उन्हाळ्यात त्या नदीकाठी जात असल्याने त्या नदीतील एका बेडकाशी त्याची छान दोस्ती जमली होती. तो बेडूक खूप चलाख होता. तो त्या नदीतला सर्वांत हुशार बेडूक असल्याने इतर सर्व बेडूक त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागत. आज या उदास हरणाला बघितल्यानंतर तो बेडूक टण्दिशी उडी मारून हरणाजवळ आला.

तो बेडूक हरणाला म्हणाला, "काय रे? असा उदास का दिसतोस? बोलत का नाहीस?"

हरणाने बेडकाला सर्व काही सांगून टाकले. सांगता सांगता हरीण रडू लागले. बेडकाने हरणाला शांत करण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, "अरे, तू का रडतोस? मी आहे ना! मी तुला मदत करीन. संकटात जो मदत करतो तोच खरा मित्र!"

हरणाला शांत केल्यावर तो बेडूक तडक त्या सिंहाकडे निघाला. त्याच्या चलाख डोक्यात अनेक विचार घोळत होते.



शेवटी त्याला एक उपाय सुचला आणि तो मनोमन आनंदी झाला.

सिंहाच्या गुहेजवळ तो बेडूक पोहोचला. सिंह गुहेच्या बाहेरचा बसला होता. बेडूक सिंहाजवळ गेला. सिंहाने लक्ष देऊनही दुर्लक्ष असल्यासारखे केले, 'एका बेडकाला काय भाव द्यायचा?' असे सिंहाला वाटले. पण बेडूक हात जोडून सिंहाला म्हणाला, "महाराज, माझे नाव सूचक. तुम्हाला एक विनंती करायची आहे."

"आँ... काय रे? कसली विनंती...?" सिंह घुश्श्यात म्हणाला.

बेडूक न घाबरता म्हणाला, "महाराज, या कडक उन्हाळ्यात माझी उपासमार होत आहे. माझ्या डबक्यातील पाणी आटल्यामुळे मी नदीत राहतो. पण तेथील मोठे मासे मला जगू देत नाहीत. म्हणून काही दिवस तुमच्या गुहेजवळ राहू द्या. इथे आसपास खूप कीटक आहेत. ते खाऊन माझी सहज भूक भागेल."

सिंहाने विचार केला. एका बेडकाकडून आपल्याला काय त्रास होणार? तेवढाच गुहेजवळचा परिसरही स्वच्छ होईल! मग सिंहाने बेडकाला म्हटले, "ए बेडका, तू इथं राहू शकतोस! पण हा परिसरही तू स्वच्छ ठेवत जा. ती जबाबदारी तुझ्याकडे... कळले का...?"

"खूप उपकार झाले महाराज..." बेडकाने सिंहाला धन्यवाद दिले.

मग बेडूक रोज सिंहाच्या गुहेजवळचा परिसर स्वच्छ ठेवू लागला.

सिंहालाही ते आवडू लागले. त्यामुळे बेडूक सिंहाजवळचा विश्वासू प्राणी बनला.

सिंहाच्या मनात ते हरीण कायम घर करून बसले होते. तो उन्हाळा संपण्याची वाट पाहत होता. कारण तोपर्यंत ते हरीण चांगले गुबगुबीत बनेल याची त्याला खात्री वाटत होती.

बेडकालाही सिंहाचे मन कळत होते मात्र आपल्या प्रिय हरणाचा जीव वाचवण्यासाठीही त्याचे प्रयत्न चालू होते.

एके दिवशी सिंह विश्रांती घेत होता. बेडूक तेथे आला व सिंहाला म्हणाला, ''महाराज, तुमची आयाळ किती हो छान...! त्यामुळे तुम्ही किती भारदस्त दिसता. पण त्या आयाळीत खूप कीटक दिसत आहेत. ते जरा बाजूला करू का?''

सिंह म्हणाला, ''अरे कर की! अताशा मी अंघोळच केली नाही, अंघोळ होऊनही चांगले दोनएक महिने झाले असतील! त्यामुळेच कीटक झाले आहेत.''

बेडकाने सिंहाच्या आयाळीवरील कीटक खाण्यास सुरुवात केली. सिंहालाही मजा वाटू लागली, कारण त्याला चांगल्याच गुदगुल्या होत होत्या. त्या गुदगुल्यांमुळे त्याला झोपच लागली.



एकदोन तासांनंतर सिंह उठून पाहतो ते काय? त्याची संपूर्ण आयाळच गायब झालेली. अगदी एकही केस नावाला उरला नाही. तो भयंकर गोंधळून गेला. नक्की काय झाले?

हळूहळू त्याच्या लक्षात आले, आयाळीवरील कीटक खाण्याच्या उद्देशाने त्याची आयाळदेखील बेडकानेच कुरतडून टाकली होती.

सिंह खूप विद्रूप दिसू लागला. आयाळ म्हणजे सिंहाची शान असते. त्याची ओळख असते. मात्र ती आयाळच बेडकाने चतुराईने कापून काढली होती.

तो सिंह आता सिंह राहिला नाही. त्याच्या इतर जातभाईंनी आपल्या गटातून त्याला दूरवर दुसऱ्या जंगलात हाकलून दिले.

इकडे बेडकाने त्या गरीब हरणाला घडलेली सर्व कथा सांगितली. सिंहाची फटफजिती करून त्याला इतरांनी कसे हाकलले, तो कसा पळून गेला हे ऐकून हरणाला हसू आवरले नाही.

त्याने आपल्या मित्राला, बेडकाला आपले प्राण वाचवल्याबद्दल धन्यवाद दिले.

आणि बेडकानेही आपल्या मित्राचे प्राण वाचवून आपले कर्तव्य बजावले.

# वाचनालयांना आवाहन

आज वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळवण्याचे विविधमार्ग उपलब्ध झालेले आहेत. इंटरनेटच्या प्रसाराने हवी ती माहिती तयार मिळण्याचा 'रेडिमेड' मार्गही खुला आहे. त्यामुळे माहिती म्हणजेच ज्ञान व हे ज्ञान हवे तेव्हा मिळवता येते असा गैरसमज सर्वत्र प्रत्ययास येतो.

परंतु मानवी जीवन, मन, प्रगल्भ, आनंदी व विचारी होण्यासाठी वाचनाला आजही कोणताही पर्याय नाही. वाचनाने मानवी मनाची, बुध्दीची मशागत होते व व्यक्ती अधिक सृजनशील, क्रियाशील बनते. वाचनाचा सार्वत्रिक प्रसार झाला तर सारा समाजच प्रगत बनेल.

यासाठी आज वाचनसंस्कृतीची वाढ करण्याची नितांत आवश्यकता आहे. या कार्यात वाचनालयांनी फार मोठे योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृतीची वाढ होण्यासाठी वाचनालयातून उत्तम दर्जेदार पुस्तके वाचकांना उपलब्ध झाली पाहिजेत- अशी पुस्तके कित्येक वाचनलयांतून आज उपलब्ध होत नाहीत.

जादा कमिशन मिळते म्हणून दर्जाहीन, पुस्तके वाचनालयांकडून खरेदी केली जातात आणि अशी पुस्तकेच गावोगावीच्या वाचकांना दिली जातात.

मनोरंजनाच्या भुलभुलैय्यात अडकलेल्या आजच्या युवापिढीला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व मनाला प्रगल्भ बनवणाऱ्या पुस्तकांचा प्रसार अधिकाधिक होणे गरजेचे आहे. यासाठीच सर्व वाचनालयांना आम्ही आवाहन करीत आहोत, फक्त उत्तमच पुस्तके घ्या आणि समाजाच्या बौद्धिक विकासाचे पाईक बना, काही ज्येष्ठ नामवंतांनी नावाजलेल्या दर्जेदार पुस्तकांची माहिती आम्ही सादर करीत आहोत. प्रत्येक वाचनालयात ही पुस्तके असलीच पाहिजेत, असे आम्हाला वाटते. वाचनालयांनी ही पुस्तके घ्यावीत व आपले वाचनालय समृद्ध करावे ही अपेक्षा.



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




उपलब्ध पण दुर्लक्षित सच्च्या कागदपत्रांनी सांगितलेली शिवपुत्राची अदभुत, चित्तथरारक पण वास्तव महागाथा

**संभाजी**

विश्वास पाटील ४८०रु.

ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील पहिलीच वास्तववादी चरित्रात्मक कादंबरी




**लोकसखा ज्ञानेश्वर**

डॉ. आनंद यादव

३५०रु.




रामायणकालापासूनची स्त्रीत्वाची दाहक कहाणी

**समर्पिता**

शरद दळवी २२०रु.

पोस्टखर्च वेगळा पाठवावा

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे


## नामवंतानी नावाजलेली दर्जेदार पुस्तके




सामान्य माणसांच्या जगण्यातले असामान्य क्षण उजळून टाकणारे प्रकाशाचे कवडसे पकडणाऱ्या तेजस कथा

**कवडसे** **१२०रु.**

योगिनी वेंगुर्लेकर




वपुंच्या मुलीच्या, वडिलांचाच संवेदनशील लेखनाचा वारसा घेऊन अवतरलेल्या तरल कथा

**गोल गोल राणी** **१००रु.**

स्वाती चांदोरकर

पोस्टखर्च वेगळा पाठवावा




रवींद्रनाथांच्या अजरामर साहित्यातील अवीट गोडीच्या कथा

**काबुलीवाला आणि इतर कथा**

रवींद्रनाथ टागोर

अनु. मृणालिनी गडकरी **१००रु.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके





स्वप्नांचे विश्व उलगडणारे अनोखे लेखन

**स्वप्नी जे देखिले**

संकलन अरुण शेवते

**१२०रु.**




कबीरांच्या भावात्म दोह्यांचे रसाळ विवेचन

**मुग्ध कहाणी प्रेमाची**

ओशो

अनु. मीना टाकळकर

**१२०रु.**




हे आहे दक्षिण अमेरिका खंडाचे विशाल दर्शन... एक महान अनुभूती

**दक्षिणायन**

केपहॉर्न ते कॅरेबियन

डॉ. रणजित मिरजे

**२५०रु.**

पोस्टखर्च वेगळा पाठवावा मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके





उच्च ध्येय गाठण्यासाठी तुमचे बोट धरून तुमचे बोट धरून नेणारा महान मार्गदर्शक

### द मॅजिक ऑफ थिंकींग बिग


डेव्हिड श्वार्झ

अनु. प्रशांत तळणीकर २००रु.




स्वतःला टप्प्याटप्प्याने ओळखत, गुणांना उजळवत यश मिळवण्याचे खात्रीशीर उपाय

१२०रु.




श्रीमंत व्हायचंय?
मग हा मंत्र तुमच्याकडे हवाच!

### मंत्र श्रीमंतीचा

श्याम भुर्के १३०रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

**पोस्टखर्च वेगळा पाठवावा**



## नामवंतांनी नावाजलेली दर्जेदार पुस्तके

भारतीय संस्कृतीचा एक अभिमानास्पद घटक म्हणून योगशास्त्राला महत्व आहे. योगासने नियमित व शास्त्रशुद्ध रीतीने केल्यास आपले आरोग्य निरामय राहते. शरीर कार्यक्षम राहते. आपला देह आणि आपले मन यांच्यामध्ये उत्तम संतुलन राहते. शास्त्रशुद्ध योगसाधनेचे महत्व उलगडून सांगणारी ही छोटेखानी पुस्तके म्हणूनच उपयुक्त आहेत. आपल्या संग्रही ही पुस्तके असलीच पाहिजेत.


### कार्यमग्न व्यस्त लोकांसाठी योगसाधना

बिजयालक्ष्मी होता
अनुवाद
अरुंधती महाम्बरे
५०रुपये





### तणावमुक्तीसाठी योगसाधना

भरत ठाकूर
अनुवाद
डॉ. सुभाष दांडेकर
५०रुपये




### वजन कमी करण्यासाठी योगसाधना

भरत ठाकूर
अनुवाद
डॉ. सुभाष दांडेकर
५०रुपये




**पोस्टखर्च वेगळा पाठवावा**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

## मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे
## २००५ साली प्रकाशित झालेली पुस्तके


| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **शिवा डान्सिंग** : भारती कर्चनर | अनु : मंजूषा गोसावी | २५०/- |
| **आभाळझुंज** | अनंत भोयर | २००/- |
| **सिटी ऑफ बोन्स: मायकेल कॉनेली** | अनु : अजित ठाकूर | २४०/- |
| **चाइल्ड ऑफ द होलोकॉस्ट:** जॅक कुपर | अनु : सिंधू विजय जोशी | १३०/- |
| **ओमेर्ता : मारिओ पुझो** | अनु : अनिल काळे | २२०/- |
| **गॉन फॉर गुड :** हार्लन कोबेन | अनु : अजित ठाकूर | २५०/- |
| **द डार्क क्रुसेडर :** ॲलिस्टर मॅक्लीन | अनु : अशोक पाध्ये | २४०/- |
| **ययाति** | वि. स. खांडेकर | २००/- |
| **अमृतवेल** | वि. स. खांडेकर | ८०/- |
| **सन्स ऑफ फॉर्च्यून :** जेफ्री आर्चर | अनु. अजित ठाकूर | ३५०/- |
| **समर्पिता** | शरद दळवी | २२०/- |
| **लेडीज कूपे :** अनिता नायर | अनु : अपर्णा वेलणकर | २५०/- |
| **टॉक्सिन** : डॉ. रॉबिन कुक | डॉ. प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| **मूनरेकर** : इयान फ्लेमिंग | अनु. उदय नारकर | १५०/- |
| **संभाजी** | विश्वास पाटील | ३८०/- |
| **लोकसखा ज्ञानेश्वर** | आनंद यादव | ३५०/- |








| | | |
|---|---|---|
| **कथासंग्रह** | | |
| **काबुलीवाला आणि इतर कथा** : रवीन्द्रनाथ टागोर | अनु : मृणालिनी गडकरी | १००/- |
| **दोस्त** | व. पु. काळे | १२०/- |
| **का रे भुललासी** | व. पु. काळे | १२०/- |
| **निरपराध बळी** | व. कृ. जोशी | १००/- |
| **खेकडा** | रत्नाकर मतकरी | ८०/- |
| **कबंध** | रत्नाकर मतकरी | १००/- |
| **निर्मनुष्य** | रत्नाकर मतकरी | १००/- |
| **मध्यरात्रीचे पडघम** | रत्नाकर मतकरी | १००/ |
| **पाऊलवाटेवरले गाव** | आशा बगे | ११०/- |
| **प्रतिद्वंद्वी** | आशा बगे | १२०/- |
| **चित्तचित्रे** | संपा. अरुण शेवते | ९०/- |
| **शोधकथा** इन्स्पेक्टर व्ही.अनंतांच्या | प्रा.अनंत वासुदेव वाईकर | १६०/- |
| **सिरसी** | सतीश सुरवसे | ७०/- |
| **गोल गोल राणी** | स्वाती चांदोरकर | १००/- |
| **कवडसे** | योगिनी वेंगुर्लेकर | १२०/- |
| **ऑक्टोपसी :** इयान फ्लेमिंग | अनु. जयमती दळवी | ८०/- |
| **ललित** | | |
| **स्वप्नी जे देखिले** | संपा. अरुण शेवते | ९०/- |






### वैचारिक

| | | |
|---|---|---|
| **मुग्ध कहाणी प्रेमाची** | अनु. मीना टाकळकर | १२०/- |
| **विज्ञानाच्या समाजधारणेवरील परिणाम : बर्ट्रांड रसेल** | कमलाकर दीक्षित | १००/- |
| **बंडखोर** | अनु. माधुरी काबरे | ९०/- |

### चरित्रे

| | | |
|---|---|---|
| **छत्रपती राजर्षी शाहू महाराज** | तु. बा. नाईक | १००/- |

### माहिती

| | | |
|---|---|---|
| **प्रवास - पर्यटनाचे नवे पैलू** | यशोधरा भोसले | १५०/- |

**खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ**

| | | |
|---|---|---|
| **तारकांच्या विश्वात** | पराग महाजनी | ३५०/- |
| कथारूपी खगोलशास्त्र | लीना दामले | १००/- |

### कलाविषयक


| | | |
|---|---|---|
| **भारतीय शिल्प वैभव - प्राचीन मध्ययुगीन** | डॉ. सु. र. देशपांडे | १५०/- |

### प्रवासवर्णन

| | | |
|---|---|---|
| **दक्षिणायन :** केप हॉर्न ते कॅरिबियन | डॉ. रणजित मिरजे | २५०/- |

### विज्ञान विषयक

| | | |
|---|---|---|
| **विज्ञान प्रपंच (लेख)** | डॉ. बाळ फोंडके | १५०/- |
| **नवे शतक** | निरंजन घाटे | १५०/- |
| **खेळणीच खेळणी** | डी. एस्. इटोकर | ६०/- |
| **ग्यानबाचं विज्ञान** | डॉ. बाळ फोंडके | १३०/- |










### व्यक्तिमत्त्व विकसन

| | | |
|---|---|---|
| **द मॅजिक ऑफ थिंकींग बिग : डेव्हिड जोसेफ श्वार्त्झ** | अनु : प्रशांत तळणीकर | २००/- |
| **चला उठा कामाला लागा!** : स्वाती शैलेश लोढा | अनु: अंजनी नरवणे | १२०/- |

### आरोग्य

| | | |
|---|---|---|
| **पाणी** : ए. आर. हरी | अनु: सुभाष जोशी | ७०/- |
| **आरोग्यासाठी योग** | अनु.मंगेश कश्यप | ८०/- |
| **कार्यमग्न,व्यस्त लोकांसाठी योगसाधना** : बिजयालक्ष्मी होता | अरुंधती महाम्बरे | ५०/- |
| **तणावमुक्तीसाठी योगसाधना** : भरत ठाकूर | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५०/- |

### नाटक

| | | |
|---|---|---|
| **तन-मन** | रत्नाकर मतकरी | ४०/- |

### मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **चला जाणून घेऊ या! चालणे** | मोतिया बसर्गेकर | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! प्रथमोपचार** | मंगेश कश्यप | २५/- |
| **चला जाणून घेऊ या! वास्तुशास्त्र** | स्वाती शहा | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! योगविद्या** | मंगेश कश्यप | २५/- |
| **चला जाणून घेऊ या! अंकशास्त्र** | गंगाधर महाम्बरे | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! यशाचं रहस्य** | सुभाष जोशी | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! हस्तसामुद्रिक** | डॉ. वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! गुडघेदुखी** | सुषमा शाळीग्राम | ३०/- |







| | | |
|---|---|---|
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **रोग बरे करणारी पाण्याची अद्‌भुत** | | |
| **शक्ती :** डॉ. सावित्री रमैय्या | अनु. वैशाली जोशी | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **आध्यात्मिकता :** विकास मलकानी | अनु. प्रशांत तळणीकर | **३०/-** |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **मधुमेह :** डॉ. सावित्री रमय्या | अनु. प्रशांत तळणीकर | ३०/- |
| **२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी :** | | |
| शेली बात्रा | अनु: गंगाधर महाम्बरे | १३०/- |
| **मंत्र श्रीमंतीचा** | श्याम भुर्के | १३०/- |
| **क्रोशा विणकाम** | प्रभावती पुरम | २००/- |

**बाल वाङ्‌मय**

| | | |
|---|---|---|
| **टिंबक टू आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **जादूचं खीरपात्र आणि इतर कथा** | अरुंधती पंडित | ३०/- |
| **निद्राराणी आणि इतर कथा** | विजया देशपांडे | ३०/- |
| **चतुर बोकोबा आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **सुंठ-बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा** | चारुता पुराणिक | ३०/- |
| **नशिबवान शेखर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **मजेदार लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **आदर्श लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **धमाल गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **गम्मत गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३०/- |
| **मन्नो** | मंजूषा आमडेकर | २५/- |










# वाचकांचा प्रतिसाद

मेहता मराठी ग्रंथ जगतच्या दिवाळी अंकाबद्दल वाचकांच्या भरघोस प्रतिक्रिया आल्या. कित्येक पत्रं, अनेक फोन, प्रत्यक्ष भेटी यातून वाचकांचं प्रेम आणि प्रोत्साहन आम्हाला भरभरून मिळालं. 'वैविध्यपूर्ण आणि दर्जेदार' ही खास ओळख निर्माण केलेल्या 'ग्रंथजगत'चे वाचकांनी केलेले स्वागत आम्हाला दिलासा देणारे आहे. वाचकांच्या प्रतिसादाची ही एक झलक.....

मेहता मराठी ग्रंथ जगतचा दिवाळी अंक वाचला. पत्र पाठवायला उशीर झाला पण अंक खूप आवडला हे नक्की.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आपण अंकात वेगवेगळे विषय हाताळले आहेत. विविध क्षेत्र, स्तर आणि वाचक-लेखकांचा समावेश हे वेगळेपण निश्चितच जाणवलं.

श्री. चिं. स. लाटकरांसारखे यशस्वी मुद्रणक्षेत्रातलं व्यक्तिमत्व किंवा श्री. नाईक साहेबांचा हलकासा विनोदी पद्धतीनं पहिल्या दिवसांचा घेतलेला आढावा वाचकांना समृद्ध करतो. उषःप्रभा पागे , आशा कर्दळे, रजनी अपसिंगेकर, बाळ राणे यांचे लेख विशेष आवडले.

वाचकांबद्दल लेखकांनी लिहिलेल्या लेखांमध्ये शिरिष पै, रा. रं. बोराडे यांचे लेख आवडले.

'झेप नव्या क्षितिजाची' यातले चारही लेख चांगले झाले आहेत. यतीन तांबे यांच्याबद्दल केलेले शब्दांकन सुनीता दंडेकर यांनी चांगल्या प्रकारे केले आहे. ज्ञान घेण्याची यतीन यांची जिद्द प्रेरणादायक आहे. दीपा साठचे, पंकजा वल्ली या स्त्रियांची क्षेत्रं वेगळी आहेत पण त्यात पाय रोवून उभं राहण्याचा आत्मविश्वास नक्कीच वाचकांना भावतो.

मुलांविषयीचं सदर 'मोठ्यांनाही' वाचायला आवडणारं आहे.

यात मुलांसाठी शैक्षणिक प्रयोगातून त्यांचं भावविश्व फुलवणारे शिक्षक पालक आहेत. मंजुषा आमडेकर यांनी स्वतःच्या मुलीसाठी, तिची वाचनाची आवड वाढवण्यासाठी जे प्रयोग केले त्यापासून घरच्या घरी पालक असा प्रयोग करू शकतील. त्यांनी दिलेलं लॉर्ड बेकनचं वाक्यही महत्वाचं आहे. 'मुळाक्षरं ही जहाजासारखी आहेत. .....ती ग्रंथाच्या रूपाने ज्ञानाच्या मालाची देवाण घेवाण, ने आण करतात.' वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी पुस्तकांकडे वळायला हवं.

अंक चांगला आहे. आम्हा वाचकांना नेहमीच ग्रंथजगतमधून वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तकांची माहिती मिळत असते. त्यामुळे घरी बसून जगाच्या साहित्यक्षेत्रात फेरफटका मारता येतो.

सौ. सुजाता रानडे
सदाशिव पेठ, पुणे

---

मेहता मराठी ग्रंथ जगत मधील डॉ. प्रभा गोखले यांचा लेख मला मनापासून आवडला. मी डॉ. प्रभा गोखलेंना जवळून ओळखते. त्यांच्याबद्दल सर्व माहिती होतीच. पण त्यांचे शिक्षण, प्रगती, कारकीर्द आणि संपूर्ण जीवनपट शब्दरूपाने व एकत्रितपणे या लेखात साकार झाला आहे. अत्यंत साध्या, सोप्या भाषेत त्यांचा जीवनपट उलगडत जातो. त्यांच्याकडून नवीन पिढीलाही खूप बोध घेण्यासारखा आहे.

त्यांनी जिद्द, प्रचंड इच्छाशक्ती, सकारात्मक दृष्टिकोन व अंगभूत हुषारी याच्या जोरावर आपले ध्येय गाठले. केवळ वैद्यकीय क्षेत्रातच नव्हे तर कोणत्याही क्षेत्रातील व्यक्तींसाठी हा लेख मार्गदर्शक ठरणारा आहे. विशेष म्हणजे त्यांच्या जीवनपटाबरोबरच त्यांच्या व्यक्तीमत्वात असलेली प्रगल्भताही या लेखातून व्यक्त झाली आहे.

सौ. उर्मिला अत्रे
एरंडवणा, पुण